


जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १८ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# मी 20 जुलैपर्यंत जीवंत राहीन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे दिल्लीतील जंतर-मंतर येथे उपोषण सुरू आहे. २० दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणामुळे वांगचुक यांचे शरीर अत्यंत थकले असून त्यांची प्रकृती खालावली आहे. मात्र, तरीही त्यांचा विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा उपोषणाचा निर्धार कायम आहे.



सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. अनेक राजकीय नेते, कलाकार त्यांची भेट घेत आहेत. यादरम्यान सोनम वांगचुक यांनी जंतरमंतरवर उपस्थित विद्यार्थी आणि इतर समर्थकांना संबोधित केले. मी २० जुलैपर्यंत कोणत्याही परिस्थितीत जीवंत राहीन. मात्र, जर नागरिक या आंदोलनात सहभागी झाले नाहीत आणि २० तारखेचा मोर्चा यशस्वी झाला नाही तर, मी भूत बनून परत येईन, असे वक्तव्य त्यांनी केले.वांगचुक यांच्यावर सध्या डॉक्टरांचे पथक सतत लक्ष ठेवून आहे. आपल्या खालावत्या प्रकृतीबाबत बोलताना ते म्हणाले की, माझे शरीर बाहेरून नक्कीच कमजोर झाले आहे, पण मनातून खूप मजबूत आहेत. मला खात्री आहे की आमचे समर्थकही मनातून आणि शरीराने मजबूत आहेत. संसदेवर काढण्यात येणा-या शांततापूर्ण मोर्चासाठी या उर्जेची गरज असल्याचे सोनम वांगचुक म्हणाले. जनतेला लोकशाहीच्या मंदिरात एकत्र येउन आवाज उठवण्याचे आवाहन केले आहे.

**२० जुलैला संसदेवर भव्य मोर्चा-** या आंदोलनादरम्यान नीट पेपर लीक प्रकरणात कडक कारवाईची सुरु वात व्हावी आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, ही मुख्य मागणी लावून धरण्यात आली आहे. जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा आज २८ वा दिवस असून या आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून २० जुलै रोजी संसदेवर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. सोनम वांगचुक यांनी समर्थकांच्या आग्रहाखातर उपोषण मागे घेण्याची विनंती मान्य केली असली, तरी त्यांनी एक महत्त्वाची अट ठेवली आहे. त्यानुसार ते २० जुलैच्या आंदोलनानंतरच आपले उपोषण अधिकृतपणे सोडणार आहेत. परीक्षांमधील कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी पुकारलेल्या या आंदोलनाकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरु

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले जींद-सोनीपत दरम्यान धावणारी ही ट्रेन जगातील सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन आहे. या ट्रेनची रचना भारतातील अभियंत्यांनी केली आहे आणि भारतातीलच कंपनीने ती बनवली आहे. १० डब्यांची ही ट्रेन जींद-सोनीपत मार्गावर १४ स्थानकांदरम्यान जास्तीत जास्त ७५ किमी प्रति तास वेगाने धावेल. याचे भाडे ५ ते २५ रुपयांच्या दरम्यान ठेवण्यात आले आहे. ट्रेन ८९ किलोमीटरचा प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण करेल. पंतप्रधान मोदींनी एलिव्हेटेड रेल्वे ट्रॅक, दोन वैद्यकीय महाविद्यालयांसह ८ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली.

**स्वच्छतेला बनवा आपला संस्कार**

पंतप्रधानांनी जींद आणि हरियाणातील लोकांच्या स्वच्छता अभियानातील सहभागाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या एका आठवड्यापासून ते सोशल मीडियावर स्वच्छता अभियान पाहत होते. त्यांनी लोकांना सांगितले की, स्वच्छतेसाठी त्यांच्या येण्याची वाट पाहू नये. जर जींदच्या लोकांनी संकल्प केला, तर स्वच्छतेला आपला स्वभाव आणि संस्कार बनवून दररोजच्या जीवनाचा भाग बनवू शकतात.

**रेल्वेमध्ये मोठा बदल, डिझेलवरील अवलंबित्व कमी झाले-** पंतप्रधान म्हणाले की, १९२५ ते २०१४ पर्यंत सुमारे ९० वर्षांत देशाच्या रेल्वे नेटवर्कचे केवळ ३० टक्के विद्युतीकरण झाले होते, तर ७० टक्के भाग डिझेलवर अवलंबून होता. गेल्या १२ वर्षांत सुमारे ९९ टक्के रेल्वे नेटवर्कचे विद्युतीकरण झाले आहे. जर होर्मुज सामुद्रधुनीमध्ये युद्धासारखी परिस्थिती आधी निर्माण झाली असती, तर डिझेल पुरवठा बाधित झाल्याने रेल्वेही संकटात येउ शकली असती, पण आता परिस्थिती बदलली आहे.




# एसटीच्या भाड्यात झाली 13.56 टक्क्यांनी वाढ



## गणेशोत्सवात खिशाला पडणार कात्री

**मुंबई/प्रतिनिधी** :वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या भाड्यात १३.५६ टक्के वाढ करण्यात आली आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचा-यांच्या विविध भत्त्यांमध्ये केलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या ➪(पान २ वर)

# एकच लग्न करणारा मध्य प्रदेशात राहील:मोहन यादव

### रामने एकच लग्न करावे, तर रहीमने चार का?, तीन तलाक म्हणणारे थेट तुरुंगात जातील

**कटनी/वृत्तसंस्था** :मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव म्हणाले- मध्यप्रदेशात तोच राहू शकेल जो एकच लग्न करेल. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात समान नागरी संहिता (UCC) आणणार आहोत. मुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी कटनी येथे ही घोषणा केली. मुख्यमंत्री म्हणाले- हिंदू आणि मुस्लिमांसाठी वेगवेगळे कायदे का असावेत? सर्वांसाठी एकच कायदा असावा. जर राम एक लग्न करेल, तर रहीम दोन किंवा चार लग्न का करेल? मुस्लिम भगिनीही आपल्या भगिनी आहेत आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री म्हणाले- तिहेरी तलाकचा काळ संपला आहे. जर कोणी 'तलाक, तलाक, तलाक' असे म्हटले, तर त्याला तुरुंगात जावे लागेल. त्यांनी सांगितले की, पुढील मंत्रिमंडळ बैठकीत UCC च्या मसुद्याला मंजुरी दिली जाईल.मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, भोपाळच्या जगदीशपूर येथे होणा-या पुढील मंत्रिमंडळ बैठकीत UCC विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली जाईल. त्यानंतर सरकार ते विधानसभेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात सादर करेल. ते म्हणाले की, या कायद्याचा उद्देश सर्व नागरिकांसाठी समान व्यवस्था लागू करणे आणि भेदभाव संपवणे आहे. संविधानाच्या अनुच्छेद ४४ च्या भाग-४ मध्ये समान नागरी संहितेची चर्चा आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित या अनुच्छेदात म्हटले आहे की, 'राज्य देशभरातील नागरिकांसाठी एक समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करेल.'आपल्या




संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे सरकारांसाठी एका मार्गदर्शकासारखी आहेत. यात ती तत्त्वे किंवा उद्दिष्टे सांगितली आहेत, जी साध्य करण्यासाठी सरकारांना काम करावे लागते.

**उत्तराखंड, गुजरात आणि आसाममध्ये UCC लागू**

सध्या देशातील उत्तराखंड, गुजरात आणि आसाम या तीन राज्यांमध्येच छक्क लागू आहे. उत्तराखंडने २०२४ मध्ये सर्वात आधी याची अंमलबजावणी केली होती. याच वर्षी आधी गुजरातने आणि नंतर आसामने याची अंमलबजावणी केली. पश्चिम बंगालमध्ये सुवेंदू अधिकारी आणि बिहारमध्ये सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्री होताच छक्क लागू करण्याची घोषणा केली होती. आता मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनीही याच पावसाळी अधिवेशनात याची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे.

**UCC १९४८ मध्ये संविधान सभेत सादर करण्यात आले**

सन १८३५ मध्ये, ब्रिटिश सरकारने एक अहवाल सादर केला, ज्यामध्ये फौजदारी पुरावे आणि करारांच्या संदर्भात देशभरात एकसमान कायदा तयार करण्याचे आवाहन केले होते. तो सन १८४० मध्ये लागूही ➪(पान २ वर)

# गुजरात ATS ने जैश-ए-मोहम्मद मॉड्यूलचे आणखी 5 संशयित पकडले


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :गुजरात दहशतवादविरोधी पथकाने जैश-ए-मोहम्मद दहशतवादी माड्यूलशी संबंधित ५ संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. या सर्वांना पाटन जिल्ह्यातील सिद्धपूर तालुक्याच्या खाडियाल गावातून पकडण्यात आले.अटक करण्यात आलेल्या आरोपींची ओळख बिलाल आबिदभाई शेरा, मोहम्मद अयुब कादीवाला, मोहम्मद पालनपुरी उर्फ खाली अयुब सुनसारा, शफिया रईस मुख्ती आणि मोहम्मद हसन कार्डिया अशी झाली आहे. त्यांना मोहसाणा

## बॉम्ब बनवण्याचा प्रयत्न करत होते; 14 दिवसांपूर्वी 8 दहशतवादी पकडले

जिल्ह्यातील कढी शहरात न्यायिक दंडाधिकारी आर.एम. भाटिया यांच्यासमोर हजर करण्यात आले, जिथून त्यांना २४ जुलैपर्यंत एटीएसच्या ताब्यात पाठवण्यात आले. यापूर्वी ३ जुलै रोजी जैशशी संबंधित ८ संशयितांना पकडण्यात आले होते. त्यांच्या चौकशीनंतर या नावांचा खुलासा झाला. पकडलेले दहशतवादी बाम्ब बनवण्याचा प्रयत्न करत होतेसरकारी वकील पीआर दंतनी यांनी सांगितले की, एटीएसने न्यायालयाला माहिती दिली की आरोपींपैकी एकाने टाइम बाम्ब बनवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. पोलिसांना अजून बाम्ब बनवण्याचे साहित्य आणि उर्दूमध्ये लिहिलेले जैश-ए-मोहम्मदचे साहित्य जप्त करायचे आहे. दंतनी यांच्या मते, एटीएसला हे शोधायचे आहे की बाम्ब बनवण्याचे साहित्य कुठून आणले गेले आणि ते कुठे लपवले होते. तसेच, जिहादी पुस्तके कुठून मिळाली. ती कुठे ठेवली आहेत.

# शिक्षकाने मुलांसह आयुष्य संपवले

## दोन मुलांसोबत गोदावरी नदीत कार घालून आत्महत्या





**मुंबई/प्रतिनिधी** : 'मित्रांनो मला माफ करा... मी मझ्या मुलांना संपवून स्वतःला संपवत आहे...', शिक्षकाने स्वतःच्या दोन मुलांसोबत गोदावरी नदीत कार घालून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. व्हाटसअॅपवर स्टेटस ठेवत शिक्षकाने वरिष्ठांवर गंभीर आरोप केले आहेत. घडलेल्या प्रकरणानंतर सर्वत्र खळबळ माजाली आहे. समोर दिसणारी व्यक्ती उत्तम दिसत असली तरी, त्या व्यक्तीच्या मनात काय सुरु आहे, हे ओळखणं फार कठीण

### गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांच्या जाचाला कंटाळून घेतले टोकाचे पाउल

असतं. असंच काही एका शिक्षकासोबत झालं आहे. अखेर वरिष्ठांकडून सतत होणा-या त्रासाला कंटाळून शिक्षकाने स्वताला तर संपवलंच, पण स्वतःच्या दोन निष्पाप मुलांचं आयुष्य ➪(पान २ वर)

# मेगाभरतीचा फुगा फुटला !

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात ७० हजारांहून अधिक पदांसाठी भरती प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेब्रु वारी महिन्यात दिली होती. यातील २० हजार पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून भरण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र या गोष्टीला पाच महिने उलटून एकही नवीन पदाची जाहिरात प्रसिद्ध झालेले नाही. त्यात आता ऑनलाईन परीक्षा रद्द करण्यात आल्याने सरळ सेवा भरतीची शक्यता पुन्हा धूसर झाली आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात फेब्रु वारी महिन्यात बैठक झाली. यावेळी फडणवीस यांनी ७० हजार पदांसाठी भरती प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार असल्याचे सांगितले. राज्य प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात याव्यात, असे सांगत, मुख्यमंत्र्यांनी मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेला प्राधान्य असेल असे स्पष्ट केले. भरती प्रक्रियेबाबत युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणा-या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफार्मचे नवे माडेल उभे राहील. यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. यासाठी कोणत्याही विभागाने मागे न राहता सर्वांनी एकत्र येउन प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले होते. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होउ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. भरती प्रक्रिया राबवताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री ➪(पान २ वर)

# राज्यातील 'एसआयआर'ला 8 दिवसांची मुदतवाढ

## अनेक पक्षांच्या मागणीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेला ८ दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्लीसह अनेक राज्यात SIR प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी होती. महाराष्ट्रातही च्क्ड प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर राज्यात SIR प्रक्रियेला ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. पाउस आणि इतर बाबींमुळे SIR प्रक्रियेला वेळ वाढवून द्यावा अशी अनेक पक्षांनी मागणी केली होती. त्यानुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ दिवसाचा कालावधी वाढवून दिला आहे.दिल्लीतही एसआयआरला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार एसआयआर प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला. आता सुधारित कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल, यापूर्वी ही तारीख ७ ऑक्टोबर अशी होती. दिल्लीचे मुख्य निवडणूक अधिका-यांनी १४ जुलै रोजी अतिरिक्त वेळ देण्याची विनंती केली होती. त्यानंतर संपूर्ण




एसआयआर प्रक्रियेतील विविध टप्प्यांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. दिल्लीत सुधारीत वेळापत्रकानुसार, बुथ लेव्हल अधिकारी(BLO) ८ ऑगस्टपर्यंत घरोघरी जाउन मतदार याद्यांची पडताळणी करतील. यापूर्वी ही प्रक्रिया २३ जुलैपर्यंत पूर्ण करण्यात येणार होती. या प्रक्रियेसाठी दहा दिवसांचा अतिरिक्त कालावधी मिळाला आहे. मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख बदलली आहे. १७ ऑगस्ट रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध होईल. यापूर्वी ती ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार होती.

**महाराष्ट्रातूनही मुदतवाढीची मागणी-** राज्यातील एसआयआर प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत होती. ही प्रक्रिया अधिक क्लिष्ट असल्याने त्यासाठी एक महिन्याची मुदत अपुरी असल्याचे विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांनी म्हटले होते. तर संसदीय कामकाजमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यासंदर्भात भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहून सहा महिन्यांपर्यंत मुदत वाढ देण्याची विनंती करण्यात येईल असे सांगितले.➪(पान २ वर)



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# उसने दिलेले पैसे मागितल्याने तरुणावर चाकूने हल्ला -कुंभारवाडा परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-**

उसने दिलेले पैसे मागण्यासाठी घरी गेलेल्या २२ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला करून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना १५ जुलै रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील कुंभारवाडा परिसरात घडली. समीर मदार चौधरी (वय २२,रा. फ्रेजरपुरा ) असे जखमी तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार, समीर चौधरीचे मोठे भाऊ शाहरुख मदार चौधी यांनी आरोपी इकबाल बाबूलाल रायलीवाले (वय २५) यांना नागपूर जाण्यासाठी १० हजार रुपये उसने दिले होते. ते पैसे परत मागण्यासाठी समीर आरोपींच्या घरी गेला होता.पैसे मागितल्याच्या कारणावरून समीरचा आरोपींशी वाद झाला. वाद वाढताच आरोपी इकबाल बाबूलाल रायलीवाले आणि समीर लुचाईवाले यांनी समीर चौधरीवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. दरम्यान दोन्ही आरोपी तेथून पळाले. भाऊ शाहरुखने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे.घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा भारतीयांना आणखी एक धक्का
## दीड लाख ट्रक ड्रायव्हरच्या नोक-या धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दुस-यांदा राष्ट्राध्यक्ष बनल्यापासून बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात कडक पावले उचलत आहेत. तसेच एच-१बी व्हिसावर निर्बंध लादून त्यांनी व्हाईट कालर नोकरदारांना अडचणीत टाकले होते. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत मोठ्या संख्येने कार्यरत असलेल्या स्थलांतरित ट्रक चालकांच्या जागी अमेरिकन लष्करातील माजी सैनिकांना नियुक्त करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यामुळे भारतातून अमेरिकेत ट्रक चालक म्हणून काम करणा-या दीड लाख जणांचा रोजगार धोक्यात आला आहे. पेनसिल्व्हेनिया येथे बुधवारी व्हाईट हाउसच्या लष्करी गुंतवणूक परिषदेत बोलत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी हा दावा केला आहे. ट्रम्प यांच्या मते, स्थलांतरितांपैकी बहुतेक ट्रक चालक अमली पदार्थ आणि मद्याच्या आहारी गेलेले आहेत. ते गुन्हे करत आहेत.द न्यूयार्क टाइम्स वृत्तपत्राने यासंदर्भात बातमी दिली आहे. गुंतवणूक परिषदेत बोलत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, त्यांचे प्रशासन स्थलांतरित ट्रक चालकांवर देशव्यापी कारवाई करत



आहे. बरेच ट्रक चालक देशात बेकायदेशीरपणे आले आहेत. त्यांच्याकडे ट्रक चालविण्यासाठी योग्य कागदपत्रे आणि परवाने नव्हते.डोनाल्ड ट्रम्प पुढे म्हणाले, या स्थलांतरित चालकांना रस्त्यावरील फलक वाचता येत नाहीत. त्यांच्यापैकी अनेकजण अमली पदार्थांचे सेवन करतात. ते मद्याच्या नशेत असतात. अशा लोकांनी रस्त्यावर वाहने चालवणे धोक्याचे आहे. ते अवैधरित्या देशात आले असून आम्हाला ते नको आहेत. पण दुर्दैवाने ते सध्या अमेरिकेच्या सर्व रस्त्यांवर वाहन चालवत आहेत.

**माजी सैनिकांना चालक म्हणून आणणार-** स्थलांतरित ट्रक चालकांना बाजूला करून ट्रम्प यांना अमेरिकन लष्करातील माजी सैनिकांना हे काम द्यायचे आहे. याबाबत बोलताना ते म्हणाले, आम्हाला स्वाभिमानी अमेरिकन माजी सैनिकांना हे काम द्यायचे आहे. आम्ही आमच्या माजी सैनिकांना घेउ, त्यांना यासाठी तयार करू आणि त्यांना ट्रक चालविण्यासाठी बरेच काही शिकवू. लष्करात ज्या सैनिकांनी अवजड ट्रक चालवला आहे, असे अमेरिकन नागरिक व्यावसायिक चालक परवान्यासाठी आपोआप पात्र ठरतील, अशीही माहिती ट्रम्प यांनी दिली.

**किती भारतीय ट्रक चालक धोक्यात-** न्यूय?र्क टाइम्सने दिलेल्या बातमीनुसार, मार्च महिन्यात अवैध स्थलांतरितांविरु द्ध देशव्यापी मोहीम राबविण्यात आली होती. या कारवाई अंतर्गत अमेरिकेत राहण्याची आणि काम करण्याची परवानगी असलेल्या सुमारे दोन लाख स्थलांतरित चालकांचे परवाने रद्द करण्यात आले होते. अमेरिकेत अलीकडच्या काळात ट्रक चालविण्याचा व्यवसाय कायदेशीर आणि बेकायदेशीर अशा दोन्ही स्थलांतरितांच्या गटात लोकप्रिय झाला आहे. मूळ अमेरिकन नागरिक ट्रक चालविण्याच्या कामात रस दाखवत नसल्यामुळे या क्षेत्रात पोकळी निर्माण झाली होती.

# शेअर मार्केटच्या नावावर तरुणाची ४.६८ लाखांनी फसवणूक -चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात सायबर गुन्हेगारांच्या एका टोळीने आर्थिक अडचणीचा फायदा घेत २४ वर्षीय स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणाला गंडा घातला. त्याच्या नावाने बँक खाते उघडून त्याद्वारे ४.६८ लाख रुपयांची फसवणूक केली. माहिती नुसार, मार्च २०२६ मध्ये पीडित तरुणाची ४ अनोळखी तरुणांशी ओळख झाली. शेअर मार्केट साठी त्यांच्या बँकेची मर्यादा संपली आहे, म्हणून त्याच्या नावाने खाते उघडायचे आहे असे सांगून त्यांनी १५ मार्च रोजी बँक ऑफ महाराष्ट्रात खाते उघडले. खाते उघडताच पासबुक, एटीएम कार्ड आणि सिम कार्ड त्यांच्याकडे ठेवून घेतले. काही दिवसांनी रेल्वे भरतीचा फॉर्म भरताना ओटीपी मागितल्यावर त्याला संशय आला. बँकेत चौकशी केली असता त्याचे खाते सील असल्याचे आणि ४.६८ लाखांचा संशयास्पद व्यवहार झाल्याचे समोर आले. यामुळे घाबरलेल्या तरुणाने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

पोलिसांनी ४ अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय अनिकेत कासार करत आहेत. हा एक संघटित टोळीचा प्रकार असल्याचा संशय असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली आहे.

पान १ व १० वरून

## सोयाबीनचे निकृष्ट बियाणे

बाधित शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे, तर काहींना आर्थिक भरपाई देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. आमदार रवी राणा यांनी बियाण्यांच्या गुणवत्तेची तपासणी वेळेवर का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित करत गुणवत्ता नियंत्रण विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. आमदार संजय खोडके यांनी अशा निकृष्ट बियाण्यांवर राज्यभर बंदी घालण्यासाठी धोरणात बदल करण्याची गरज व्यक्त केली. आमदार बच्चू कडू यांनी बियाण्यांची उगवण क्षमता पेरणीनंतर तपासण्याची विद्यमान पद्धत बदलून पेरणीपूर्वीच चाचणी अनिवार्य करण्याची मागणी केली. महाराष्ट्रात अनुवंशिक (जेनेटिक) चाचण्या का होत नाहीत, याचाही प्रश्न उपस्थित केला. खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी अकोला जिल्ह्यात विक्रीबंदी असलेल्या 'बूस्टर' बियाण्यांची अमरावतीत विक्री कशी झाली, याची चौकशी करण्याची मागणी केली. बैठकिला खासदार बळवंत वानखडे, अमर काळे यांच्यासह आमदार रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, राजेश वानखडे, केवलराम काळे, प्रवीण तायडे, गजानन लवटे, उमेश यावलकर या आमदारांची उपस्थिती होती. पोलिस आयुक्त राकेश ओला, जिपचे सीईओ सत्यम गांधी, पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासह जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## अमरावतीत वाहतूक पोलिसांची

पोलीस आयुक्तालयाच्या आदेशानुसार २४ जुलै २०२६ पासून अमरावती शहर हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच सर्व ग्रामीण व शहरी रस्त्यांवर दुचाकी चालक आणि मागील आसनावरील प्रवाशासाठी प्रमाणित हेल्मेट घालणे अनिवार्य करण्यात आले आहे. वाहतूक विभागाने नागरिकांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देऊन स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेसाठी प्रत्येक वेळी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन केले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

## दुचाकी चोराला अटक

याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने दुचाकी चोरीची कबुली दिली. त्यानंतर आरोपीच्या ताब्यातून चोरीची होंडा ॲक्टिव्हा जप्त करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, सहाय्यक पोलीस आयुक्त नयन आलुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम पोलीस निरीक्षक प्रमोद इंगळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक नरेश गिरघुसे तसेच डीबी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल कैलास जाधव, ऐजाज शहा, शिवनाथ आंधळे, पोलीस कॉन्स्टेबल धिरज यादव आणि प्रमोद सायरे यांनी पार पाडली.

## चाकूच्या धाकावर महिलेची

गळ्यातील सुमारे १४ ग्रॅम २०० मिलीग्रॅम वजनाची सोन्याची साखळी जबरीने हिसकावून साथीदारासह पलायन केले. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ ने समांतर तपास सुरू केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची पडताळणी तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेण्यात आला. खात्रीशीर माहितीच्या आधारे सुमित ऊर्फ विक्की देवानंद ढोके (वय ३३, रा. केवल कॉलनी), सुशील प्रविण मेश्राम (वय २२, रा. आम्रपाली कॉलनी, शेगाव) आणि रोहित लोमेश काळे (वय २२, रा. विश्वप्रभा कॉलनी, अमरावती) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी संगनमताने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून १ लाख ९६ हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी, ८० हजार रुपये किमतीची ओला कंपनीची विना क्रमांक इलेक्ट्रिक मोपेड आणि १५ हजार रुपये किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल असा एकूण २ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) कैलास पुंडकर तसेच सहायक पोलीस आयुक्त (फ्रेजरपुरा विभाग) नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फिरोज खान, पोलीस हवालदार मंगेश लोखंडे, संभाजी केंद्रे, नाझिमोद्दीन व गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या पार पाडली.

## जिल्हा सहकारी बँक

लवणकर,उमेश उर्फ बबलू इंगोले,योगेश वडे,अर्जुनराव पुनसे,मारोतराव बूटे,बाबाराव ढोक,मनीष गाडगे,विलास मसलदी, दीपाली इंगोले, रंजना ढोक आदी संचालकांनी रामभाऊ बोकडे यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी माजी उपाध्यक्ष गोपाळराव नवले,प्रल्हादराव इंगोले, मुकूंद पूनसे,आनंदराव शिरसागर,अवधूत ढोक,सुनील उतखेडे,संदीप ढोक,राजेंद्रराव वडे,हैबतराव गाडगे,ज्ञानेश्वर इंगोले,सुभाष बोकडे,प्रमोद विघ्ने,सोमेश्वर इंगोले,मयूर शिरपूरकर,दिनेश गाडगे आदी उपस्थित होते.

## भटके कुत्रे व रस्त्यावरील

गैरसोय टाळण्यासाठी तात्काळ आपल्या पाळीव कुत्र्यांची नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे पूर्ण करावीत, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी स्वतः विविध भागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत मोहिमेत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नियोजनबद्ध आणि कठोर कारवाई करण्याचे आदेश देत प्रत्येक प्रभागात नियमित तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. अनेक भागांत नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत तसेच मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

महानगरपालिका, अमरावती तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, शहरातील मोकाट अथवा पिसाळलेल्या श्वानांच्या तक्रारी तसेच मोकाट जनावरांच्या तक्रारींसाठी पशुवैद्यकीय विभागाशी संपर्क साधावा. यासाठी निलेश सोळंके (पशुधन निरीक्षक) – मो. ७०३०९४०२२७ तसेच पंकज कल्याणकर (स्वा. निरीक्षक) – मो. ९८६०२३८९१४ या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महानगरपालिकेने नागरिकांना या मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, रस्त्यांवर जनावरे मोकाट सोडू नयेत, तसेच पाळीव कुत्र्यांची नोंदणी करून त्यांना सार्वजनिक ठिकाणी योग्य नियंत्रणाखाली ठेवावे, असेही सांगितले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध संबंधित कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

## झाशी राणी चौक परिसरात

झाशी राणी चौक आणि परिसरातील रस्त्यांच्या दुतर्फा असलेले बेकायदेशीर अतिक्रमण आज सकाळी जेसीबीच्या साहाय्याने पूर्णपणे हटवण्यात आले. प्रशासनाच्या या अचानक झालेल्या कारवाईमुळे अतिक्रमणधारकांमध्ये एकच खळबळ उडाली होती. बऱ्याच दिवसांपासून रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या अनधिकृत टपऱ्या आणि दुकानांचे वाढीव भाग भुईसपाट करण्यात आले, ज्यामुळे या परिसरातील मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

कारवाई दरम्यान कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी घटनास्थळी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या मोहिमेत स्वतः पोलीस ठाणेदार अजय आखरे यांच्यासह पोलीस कर्मचारी रस्त्यावर उतरले होते. तसेच नगर पालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी या संयुक्त मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी झाले होते.

**अपघातप्रवण क्षेत्रांवर पालिका आणि पोलिसांची 'नजर' -**

ज्या ठिकाणच्या अतिक्रमणामुळे भविष्यात मोठे अपघात घडू शकतात किंवा जिथे वाहतुकीची कोंडी वारंवार होते, अशा रस्त्यालगतच्या अतिक्रमणांना प्रामुख्याने लक्ष्य केले जात असल्याची माहिती पालिका व पोलीस प्रशासनाने दिली आहे. 'शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवरील वाढते अतिक्रमण अपघातांना निमंत्रण देणारे ठरत आहे. नागरिकांची सुरक्षा आणि सुरळीत वाहतूक ही प्राथमिकता आहे. त्यामुळे येत्या काळातही रस्त्यालगतची ही अनधिकृत अतिक्रमणे हटवण्याची मोहीम अशीच तीव्रतेने सुरू राहील.'

## मध्य‌‌ादेशातून परवान्याविना

एमएच-२७ बीएक्स-९७४७चा चालक पवन मोहन शर्मा (वय ३९, जयस्तंभ चौक), एमएच-२७ डीटी-७७९२चा चालक पवन सुखदेव नांदणे ( वय २७, खंबीत बेलोरा, ता. आष्टी, जि. वर्धा), एमएच-२७ डीटी-७५५३चा चालक प्रफुल अशोक खरबडे (वय ३५, खंबीत बेलोरा, ता. आष्टी, जि. वर्धा) आणि एमएच-२७ बीएक्स-९५५९चा चालक आर्यन गजाननराव परतेकी (वय २२, जिजाऊ नगर, मोर्शी) यांच्याकडून प्रत्येकी सात ब्रासप्रमाणे एकूण २८ ब्रास रेती (किंमत १ लाख ४० हजार रुपये) तसेच चार डंपर (किंमत १ कोटी ६८ लाख रुपये) असा एकूण १ कोटी ६९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालकांसह डंपर मालक मनीष सुरेशराव डांडे (मोर्शी), मोहित अविनाश लांडे (माळीपुरा, मोर्शी), गौरव रामभाऊ धोटे (सोलब बिल्डिंगजवळ, मोर्शी) आणि गोलू ऊर्फ शेख बशीर (पेठपुरा, मोर्शी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), पर्यावरण संरक्षण अधिनियमातील कलम ९ व १५ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या चारही चालकांना न्यायालयात हजर केले असता १८ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश गोपाळ चावडीकर करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटावाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक जाधव, पोलीस हवालदार संतोष वंजारी, मनोज वानखडे आणि पोलीस कॉन्स्टेबल राहुल केंडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## चायना चाकूसह आरोपी

तपासात आरोपी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण करत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्ट कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच पोलीस कर्मचारी मनीश करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवी लिखीतकर, शशी शेळके, अंकुश काळे, मंगेश कपीले, नरेश बावने, प्रशांत बेलोरकर, अर्जुन कदम, अमोल खंडेजोड, आकाश यादव, रफीक खान आणि यश ओगले यांनी पार पाडली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सहकार्याने व तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूकडून खालील दुर्मीळ आजारा वर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या अभियानात अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, ओपन हार्ट सर्जरी, हृदयाच्या झडपांवरील शस्त्रक्रिया, हृदयाशी संबंधित इतर सर्व शस्त्रक्रिया, संपूर्ण हिप रिप्लेसमेंट, गुडघा प्रत्यारोपण, बालहृदय शस्त्रक्रिया तसेच कॉक्लिअर इम्प्लांट यांसारख्या महागड्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून गरजू नागरिकांना कोणताही उपचार खर्च न करता उत्तम आरोग्यसेवा मिळावी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दीर्घायुष्य लाभावे, या सद्भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी सांगितले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सेवाभावी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. या मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी आमदार प्रवीण पोटे पाटील जनसंपर्क कार्यालय, इर्विन चौक, अमरावती येथे नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी समीर पाटील (मो. ९३२५४७११५२) यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार प्रविण पोटे पाटील यांच्यासह खासदार अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रविण तायडे, आमदार चंदू यावलकर, आमदार केवलराम काळे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, रवींद्र खांडेकर, किरण पातूरकर, तुषार भारतीय आदींनी केले आहे.

## बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे

की, पाऊस सुरु होताच शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी केली. मात्र वेळेत शासकीय आणि सहकारी संस्थांकडून बियाणे उपलब्ध न झाल्याने शेतकऱ्यांना बाजारातून कर्ज काढून महागड्या दरात सोयाबीन बियाणे खरेदी करावे लागले.

पेरणीनंतर ५ ते ६ दिवस उलटूनही बहुतांश शेतात बियाण्याची उगवणच झाली नाही. चौकशी केली असता खरेदी केलेल्या अनेक बियाण्यांची गुणवत्ता खराब असल्याचे आणि उगवण क्षमता अत्यंत कमी असल्याचे समोर आले. यामुळे बियाणे, पेरणी, शेत मशागत, कीटकनाशक आणि इतर शेती कामांवर केलेला सर्व खर्च वाया गेला आहे. बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला हेक्टरी १ लाख रुपयांची तातडीची नुकसानभरपाई द्यावी. बोगस बियाणे विकणाऱ्या दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई करावी.

राज्य सरकारने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना त्वरित दिलासा द्यावा.पालकमंत्री बावनकुळे यांनी या संदर्भात राज्य सरकारकडे शिफारस करावी, अशी विनंतीही संघटनेने केली आहे.निवेदन देताना जिल्हाध्यक्ष अमित अशोक आढाऊ, पुरुषोत्तम देवताळे, प्रफुल्ल बहुरूपी, मुरलीधर ढहाणे, मयूर सपाटे, यश सपाटे, सुभाष देशमुख, कार्तिक देशमुख, प्रतीक कुटे, दर्शन बुरघाटे, ऋषिकेश थारकर, शुभम पाटील, अक्षय ढवळे, दयाराम किरकटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## अमरावती जिल्ह्यातील ७५०

मिळाला आहे. अमरावती शहरात व ग्रामीण भागात सन २०२० नंतर मंजूर झालेल्या एकूण लेआउटपैकी जवळपास ७० टक्के लेआउट हे ७.५० मीटर रस्त्यावरील आहेत. ज्यामध्ये एकत्रित इमारत बांधकाम नियमावली मधील तरतुदीनुसार ७.५० मीटर रस्त्यावरील भूखंड हे आर्थिक दुर्बल घटकासाठी (ईडब्लूएस ) आरक्षित नसून सदर युडीसीपीआर नियमावली तरतुदीनुसार ३-३-२ मधील सी ग्रुप हाऊसिंग स्कीमसाठी १५० मीटर लांबीच्यावर देता येण्याबाबत स्पष्ट नमूद आहे. तसेच हे ७.५० मीटर रस्त्यावरील भूखंड हे केवळ ईडब्लूएस प्रवर्गाकरिताच राखीव ठेवावे ,असा कोणताहि उल्लेख हा एकत्रित इमारत बांधकाम नियमावलीमध्ये ( युडीसीपीआर ) नसतांना किंवा केंद्र अथवा राज्याच्या कोणत्याही कायद्यात नसतांनाही सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या कार्यालयाकडून दिनांक १३ मे २०२६ रोजी पत्र काढून ७.५० मीटर ले -आऊट मधील प्लॉट चे खरेदी -विक्री व दस्त नोंदणीचे काम अचानक थांबविण्यात आले होते. या अटींच्या तर्क वितर्कामुळे भूखंडधारकांना मोठ्या व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या असून त्यांच्यात रोष सुद्धा निर्माण झाला. याबाबत आ. खोडके यांनी नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये याबाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. तसेच अमरावती जिल्ह्यातील भूखंडधारक व सर्वसामान्य जनतेचे व्यापक हित लक्षात घेता , वर्ष २०२० नंतरच्या ले-आऊट मधील ७.५० मीटर लांबीच्या रस्त्यावरील भूखंडाची खरेदीखत नोंदणी पूर्वीप्रमाणे विना विलंब व नियमितपणे पुन्हा चालू करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना आदेश देण्यात यावे, अशी मागणी लावून धरली.

अशातच सदर लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या प्रश्नास अनूसरुन विभागीय आयुक्त,अमरावती यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार ७.५० मी व त्यापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे ईडब्लूएस भुखंड प्लॅाटचे दस्तऐवज नोंदणी संदर्भात रु. ८ लाखांचे आतील उत्पनाचे प्रमाणपत्र दस्तासोबत जोडून दस्तऐवजाची नोंदणीची कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त अमरावती यांनी निर्देश दिले आहेत.

त्यानुसार ७.५० मीटर व त्यापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावरील प्लॉटचे दस्तऐवज नोंदणीकरीता सादर केल्यास EWS प्रमाणपत्र / रु.८ लाखापेक्षा कमी उत्पन्नाचे प्रमाणपत्र दस्ताचा भाग करुन तसेच त्याअनुषंगाने आवश्यक त्या बाबी दस्तात नमूद करुन यामध्ये कोणत्याही नियमाचा भंग होणार नाही याची परिपुर्ण दक्षता घेवून दस्तऐवज नोंदणीची कार्यवाही नोंदणी अधिनियमाच्या तरतुदीनुसार पुर्ण करावी.असे निर्देश देण्यात आले आहे.त्यामुळे सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती द्वारा दस्त नोंदणी पूर्ववत करण्यात आल्याने शेकडो भूखंडधारकांना दिलासा मिळाला आहे. त्याबाबत अमरावतीमधील भूखंडधारकांनी आ. सुलभा खोडके यांचे आभार मानले आहे.

## एसटीच्या भाड्यात झाली

भाडेवाढीमुळे यापुर्वी केलेली साध्या बसेसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होणार आहे. एसटीची ही दरवाढ आज १७ जुलै २०२६ च्या मध्यरात्री १२ वाजल्यापासून लागू होणार आहे. एसटी महामंडळाच्या आर्थिक आधारासह प्रवाशांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड सेवा देण्यासाठी ही भाडेवाढ अपरिहार्य होती. वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना सेवा देणा-या एसटीच्या दैनंदिन कार्यावर आर्थिक ताण निर्माण होत असल्याने, सेवा सुरळीत ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय आवश्यक असल्याचे महामंडळाने म्हटले आहे. ही भाडेवाढ एसटीची सेवा अधिक सक्षम आणि टिकाउ बनविण्यासाठी करण्यात आली असून, प्रवाशांच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासासाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण सेवा कायम राखण्यास त्यामुळे मदत होणार आहे. एसटीची ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आली आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित, दर्जेदार आणि अखंडित सेवा देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांनी म्हटले आहे.

## एकच लग्न करणारा मध्य

करण्यात आला, परंतु धर्मानुसार हिंदू आणि मुस्लिमांचे वैयक्तिक्र कायदे वेगळे ठेवण्यात आले. येथूनच समान नागरी संहितेची मागणी सुरू झाली. १९४१ मध्ये बीएन राव समितीची स्थापना करण्यात आली होती, ज्याने हिंदूसाठी समान नागरी संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. स्वातंत्र्यानंतर, हिंदू संहिता विधेयक प्रथमच १९४८ मध्ये संविधान सभेत सादर करण्यात आले. याचा उद्देश हिंदू महिलांना बालविवाह, सती प्रथा आणि बुरखा यांसारख्या चुकीच्या प्रथांपासून मुक्त करणे हा होता.

## शिक्षकाने मुलांसह आयुष्य

देखील सोबतच संपवलं आहे. शिक्षकाने व्हाटसअॅपवर स्टेटस ठेवत स्वतःचा आणि दोन मुलांचा अंत केला आहे. मित्रांनो मला माफ करा मी मझ्या मुलांना संपवून स्वःला संपवत आहे, असं स्टेटस शिक्षकाने व्हाटसअॅपवर ठेवल्याचं समोर येत आहे. शिक्षकाने गोदावरी नदीत स्वतःची कार टाकून आत्महत्या केली आहे. पोलीस आता याप्रकरणी अधिक चौकशी करत आहेत.

वरिष्ठांना जबाबदार ठरवून मुलांसह स्वतःच्या आयुष्याचा अंत करणा-या शिक्षकाचं नाव सुनील मोरे असं आहे. सुनील मोरे हे मूळचे भोकर तालुक्यातील बेंबर गावचे राहणारे होते. तर पोटा बुद्रु क जिल्हा परिषद शाळेत मोरे शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्यावर वरिष्ठांचा दबाव होता. अशात सुनील मोरे यांनी मुदखेड तालुक्यातील पुणेगाव परिसरातील आमदुरा घाटावरू न कार गोदावरी नदीच्या पात्रात वेगाने टाकून टोकाचं पाउल उचलल.

यामध्ये सुनील मोरे यांचं निधन झालं असून, मुलगी सारा आणि मुलगा सुमित याचा देखील मृत्यू झाला आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे, स्वतःचं आयुष्य संपवण्यापूर्वी सुनील मोरे यांनी व्हाट्सअ?पवर स्टेटस ठेवलेलं. त्या स्टेटसमध्ये त्यांनी हदगावचे गटशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख यांच्याकडून सतत होत असलेल्या मानसिक जाचाला कंटाळून टोकाचं पाउल उचलत आहे असं लिहिलं.दरम्यान, पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तिघांना शोधण्यासाठी शोधकार्य सुरु केलं. अखेर एसडीआरएफ च्या पथकाने अनेक प्रयत्नांनंतर नदीच्या पात्रातून कार बाहेर काढली. कार बाहेर काढल्यानंतर शिक्षक आणि त्यांच्या दोन मुलांचे मृतदेह बाहेर काढले. अखेर या घटनेनंतर संबंधित व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात येईल हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे. शिवाय घडलेल्या घटनेमुळे शिक्षण वर्गात मोठी खळबळ उडाली असून सुनील मोरे यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घडलेल्या या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

## मेगाभरतीचा फुगा

देवेंद्र फडणवीस यांनी सचिवांना दिले होते. या बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

**मेगाभरती का शक्य नाही ?-** सरळ सेवा भरती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. या भरतीसाठी दहा लाखाहून अधिक उमेदवार अर्ज करतात. इतक्या उमेदवारांची महाराष्ट्रात एकच वेळी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेणे अशक्य आहे. त्यामुळे आयोगाने ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडला होता. मात्र ऑनलाईन परीक्षेला स्थगिती देण्यात आल्यामुळे इतक्या मोठ्या संख्येने असणा-या उमेदवारांची सरळ सेवा भरती घेणे अशक्य असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे तूर्तास एमपीएससी मार्फत सरळ सेवा भरती होण्याची शक्यता धूसर झाली.

## राज्यातील 'एसआयआर'ला

**शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त भार-** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, शिक्षकांना नियमित शैक्षणिक कामकाजासोबतच निवडणुकीची जबाबदारीही पार पाडावी लागत आहे. शाळेचे अध्यापन आणि मतदार पुनर्रचना अशी दोन्ही कामे करताना त्यांची तारेवरची कसरत होत आहे. शिक्षकांऐवजी इतर विभागातील कर्मचारी आणि स्वतंत्र मनुष्यबळ कामाला लावण्याची मागणीही करण्यात येत आहे. काही ठिकाणी शिक्षकांनी प्रशिक्षणालाही दांडी मारली. तर काही संघटना आणि राजकीय नेत्यांनी शिक्षकांना एसआयआरच्या कामाला जुंपू नये अशी मागणी रेटली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १८ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# २२ वर्षांनी खुनी महिला आरोपीला पकडण्यात वाशिम पोलीसांना यश

## प्रियकराचा खून करून फरार झालेली महिला आरोपी जेरबंद

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लिव्ह-इन रिलेशनशिपमधील वाद आणि फसवणुकीच्या रागातून २५ जून २००४ रोजी झालेल्या एका खळबळजनक खून प्रकरणातील गेल्या २२ वर्षांपासून फरार असलेल्या खुनी महिला आरोपीला अटक करण्यात वाशीम पोलिसांना अखेर यश आले आहे. पंचशीला उत्तम थोरात (वय ४२ वर्ष) रा. वाशीम, सध्या रा. खंबालिया, गुजरात) असे अटक करण्यात आलेल्या महिला आरोपीचे नाव आहे. सोशल मीडियावरील एका फोटोच्या सुगाव्यावरून पोलिसांनी अत्यंत हुशारीने या क्लिष्ट गुन्ह्याचा छडा लावला.



या प्रकरणाची पार्श्वभूमी अत्यंत नाट्यमय आहे. २००२ च्या सुमारास पंचशीला थोरात आणि तोंडगाव येथील रहिवासी तथा मृतक माधव सदाशिव गोटे (वय २० वर्ष) यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले होते. दोघेही घरून पळून गेले होते आणि लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. मात्र, माधव गोटे याने लग्नाचे आमिष दाखवून शरीरसंबंध ठेवले आणि नंतर पंचशीलाला सोडून दिले. या फसवणुकीमुळे संतप्त झालेल्या पंचशीलाने माधवविरुद्ध बलात्काराची तक्रार दाखल केली होती, जी केस वाशीम न्यायालयात सुरू होती. गुन्हा दाखल होऊनही माधवचा त्रास कमी झाला नव्हता. तो वारंवार पंचशीलाच्या घरी जाऊन जबरीने शरीरसंबंध ठेवत, बलात्काराची केस मागे घेण्यासाठी धमकावत आणि छळ करत होता. या रोजच्या त्रासाला आणि धमक्यांना कंटाळून पंचशीलाने त्याचा काटा काढण्याचे ठरवले. २५ जून २००४ रोजी माधव झोपेत असताना, पंचशीलाने त्याच्या गळ्यावर वस्तऱ्याने वार केले आणि डोक्यावर दगड मारून निर्घृणपणे त्याचा खून केला.

या खळबळजनक हत्याकांडानंतर वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७९/२००४, कलम ३०२ भारतीय दंडविधान (भादवी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडल्यानंतर पंचशीला हिला अटक झाली आणि ती सुमारे ६ महिने वाशीम जिल्हा कारागृहात होती. त्यानंतर तिची जामिनावर सुटका झाली. वाशिम सत्र न्यायालयाने तिला दोषी ठरवल्यानंतर तिने हायकोर्टात अपील केले, जिथे तिची जन्मठेपेची शिक्षा कमी करून १० वर्षे करण्यात आली. या निर्णयाविरोधात तिने सुप्रीम कोर्टात धाव घेतली, परंतु सुप्रीम कोर्टानेही १० वर्षांची शिक्षा कायम ठेवली. हा अंतिम निकाल लागल्याचे समजताच ती पोलिसांना चकमा देऊन फरार झाली होती.

फरार झाल्यानंतर पंचशीला थेट गुजरातमध्ये पोहोचली. तिथे तिने ओळख लपवून एका गुजराती तरुणाशी लग्न केले आणि संसार थाटला. ती कमालीची चतुर होती. मोबाईल वापरल्यास पोलीस आपले लोकेशन ट्रॅक करून आपल्याला पकडतील, याची तिला पूर्ण कल्पना होती. त्यामुळे पोलीस जाळ्यात अडकू नये म्हणून तिने स्वतः कधीच मोबाईल वापरला नाही.

परंतु, तिचा पती मोबाईल आणि सोशल मीडियाचा नियमित वापर करायचा. पतीने सोशल मीडियावर पंचशीलासोबतचे काही फोटो अपलोड केले होते. वाशीम सायबर पोलीस आणि तपास पथकाने याच फोटोंचा अचूक माग काढला आणि २२ वर्षांनंतर तिच्यापर्यंत पोहोचण्याचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले.

गुन्हा घडला आणि तिने लग्न केले, तेव्हा तिचे वय केवळ १९ वर्षे होते. आज तब्बल २२ वर्षांनंतर तिचे वय ४१ वर्षे झाले आहे. दोन दोन दशकांहून अधिक काळ लोटल्याने आणि वयानुसार तिच्या चेहऱ्यात प्रचंड बदल झाला होता. त्यामुळे समोर दिसणारी महिला हीच ती फरार पंचशीला थोरात आहे का, असा मोठा प्रश्न पोलिसांसमोर उभा ठाकला होता.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा महाउपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्राचे लाडके, विकासाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक आणि जनतेचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या २२ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने सेवा, समर्पण आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी नगराध्यक्ष जनसंपर्क कार्यालय, वाशीम येथे उत्साहपूर्ण नियोजन बैठक पार पडली.



बैठकीस भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, आमदार श्याम खोडे, भाजपा जिल्हा नेते राजू पाटील राजे तसेच नगराध्यक्ष अनिल केंदळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबवून 'सेवा हाच संघटनेचा संस्कार' हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. मनीष मंत्री (वाशीम शहर मंडळ अध्यक्ष), एकनाथ कड पाटील (वाशीम तालुका ग्रामीण अध्यक्ष) आणि संतोष उगले पाटील (अनसिंग मंडळ अध्यक्ष) यांच्या नियोजनाखाली पार पडलेल्या या बैठकीत २१ ते २५ जुलै २०२६ या कालावधीत तिन्ही मंडळांत विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

**२१ ते २५ जुलैदरम्यान विविध जनकल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन**

या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण अभियान, महाराज स्वाभिमान शासकीय सेवा शिबिर, आरोग्य सेवा शिबिर, वीरांचा सन्मान, शालेय साहित्य वाटप तसेच नि:शुल्क विमा नोंदणी व वितरण शिबिर अशा विविध लोकहितकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, समाजसेवेच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ५६ वा वाढदिवस प्रेरणादायी स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीस जिल्ह्यातील महिला व पुरुष मोर्च्यांचे अध्यक्ष, वाशीम शहर, वाशीम तालुका व अनसिंग मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्ते, नगरसेवक, नगरसेविका, जिल्हा परिषद सदस्य, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख तसेच भारतीय जनता पार्टीच्या विविध आघाड्या व मोर्च्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या सेवा अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून प्रत्येक उपक्रम यशस्वी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी गणेश खंडाळकर, प्रदीप देशमुख, रामेश्वर ठेंगडे, रामा इंगळे, सौ. कविता खरात, सुरेश मापारी, सुभाष नानोटे, जगदीश देशमुख, महादेव कवर आणि राहुल तुपसांडे यांनी मनोगत व्यक्त केले. सेवाभाव, पर्यावरण संवर्धन आणि जनकल्याण यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीचा नवा आयाम लाभणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# शासकीय वसतिगृहातील ५५ जागांसाठी प्रवेश

## २२ जुलैपर्यंत मुदतवाढ, पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, चिखली रोड, नालंदा नगर, वाशिम येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी रिक्त असलेल्या ५५ जागांवर ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू असून, पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. आवश्यक तेवढे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे तसेच कोणताही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शासकीय वसतिगृहाच्या सुविधेपासून वंचित राहू नये, यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

या वसतिगृहात प्रवेश जातनिहाय आरक्षण व गुणवत्ता यादीनुसार दिला जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक असून त्याने सन २०२६ मध्ये किमान ६० टक्के गुणांसह इयत्ता दहावी उत्तीर्ण केलेली असावी. तसेच वाशिम शहरातील महाविद्यालयात इयत्ता अकरावी, पॉलिटेक्निक किंवा दोन वर्षांच्या आयटीआय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला असावा. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत, तर इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न दीड लाख रुपयांपर्यंत असावे.

ऑनलाइन अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला (टीसी), इयत्ता दहावीचे गुणपत्रक, उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल), महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र तसेच राष्ट्रीयकृत बँक किंवा टपाल खात्याच्या पासबुकची प्रत स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती तसेच ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व मदत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, चिखली रोड, नालंदा नगर, वाशिम येथील कार्यालयात दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध करून दिली जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी मुदतवाढीचा लाभ घेऊन विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत.

# वसतिगृहात प्रवेश घेण्याकरीता अर्ज करण्यास मुदतवाढ

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे संपूर्ण महाराष्ट्रात चालविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्याकरीता यापुर्वी ऑनलाईन अर्ज करण्याची तारीख १५ जुलै २०२६ ही ठरविण्यात आलेली होती. आयुक्त कार्यालयामार्फत इयत्ता ११ वी व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रथम वर्षास प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्याकरीता ऑनलाईन अर्ज करण्याकरीता दि. २२ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतपूर्व अर्ज ऑनलाईन सादर करून त्याची एक प्रत वसतिगृहात सादर करावी, असे आवाहन गृहपाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह (नविन) यांनी केले आहे.

# विशेष सखोल पुनरीक्षणाला गती देण्यासाठी प्रभावी नियोजन करा

## विहित मुदतीत शंभर टक्के काम पूर्ण करण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाची कामे विहित मुदतीत शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने दैनंदिन नियोजन करून त्यानुसार काम करावे, तसेच प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.ष्तहसील कार्यालय, मंगरूळपीर येथे दि. १५ जुलै रोजी आयोजित एसआयआर कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी रवी काळे, अतिरिक्त मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार सुधाकर अनासुने, गटविकास अधिकारी सारिका कारले, नायब तहसीलदार रवी राठोड, अतिरिक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आदी उपस्थित होते.

बैठकीत मंगरूळपीर तालुक्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



विशेषतः ज्या मतदान केंद्रांवर कामाचा वेग कमी आहे, त्या केंद्रांबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक सूचना दिल्या. प्रत्येक अधिकाऱ्याने दररोजचे उद्दिष्ट निश्चित करून त्यानुसार काम पूर्ण करावे, नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवावा आणि कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी यादी भाग क्रमांक ३७, नागी येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी डी. व्ही. राऊत यांनी गणना प्रपत्रांचे शंभर टक्के वितरण आणि माहितीचे शंभर टक्के संगणकीकरण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सत्कारानंतर श्री. राऊत यांनी आपल्या कामाचे नियोजन, नागरिकांशी समन्वय, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष क्षेत्रात अवलंबिलेल्या कार्यपद्धतीबाबत अनुभव कथन केले. त्यांच्या कार्यपद्धतीचा आदर्श घेऊन इतर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनीही नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. मंगरूळपीर तालुक्यात एकूण १६० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कार्यरत असून तालुक्यातील एकूण मतदारसंख्या १ लाख ४९ हजार ६४० आहे. आतापर्यंत १ लाख २४ हजार २४५ गणना प्रपत्रांचे वितरण पूर्ण झाले असून उर्वरित गणना प्रपत्रांचे वितरण व संगणकीकरणाची प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक नियोजन आणि समन्वयाबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रारंभी उपविभागीय अधिकारी रवी काळे यांनी प्रास्ताविक करून तालुक्यातील एसआयआर मोहिमेच्या प्रगतीची माहिती दिली. नायब तहसीलदार रवी राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शंभर टक्के डिजिटायझेशन पूर्ण करणाऱ्या बीएलओंचा गौरव

■ प्रतिनिधी | वाशिम ■


दविशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत शंभर टक्के गणना प्रपत्रांचे डिजिटायझेशन पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान करण्यात आला. यावेळी



उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव तसेच जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटुडे उपस्थित होत्या. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत वाशिम जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार पडताळणी, गणना प्रपत्रांचे वितरण आणि माहितीचे शंभर टक्के संगणकीकरण अल्पावधीत पूर्ण करण्यात आले. या मोहिमेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वाशिम विधानसभा मतदारसंघातील दीपक राऊत व सिद्धार्थ भगत, कारंजा मतदारसंघातील दीपक वासनिक व सुदर्शन गुल्हाने, तसेच रिसोड मतदारसंघातील संतोष शिंदे, शिवशंकर कवर, रेणुका काटकर आणि संदीप मुंडे यांचा जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. यावेळी बीएलओंनी आपल्या अनुभवांना उजाळा दिला. शालेय अध्यापनाची जबाबदारी सांभाळत राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना सुरुवातीला काही ठिकाणी पालक व नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते.

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष सपकाळ यांची भेट



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राजू चौधरी यांची वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याच्या नंतर प्रथमच हर्षवर्धनजी सपकाळ अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान बाबत जिल्ह्यामधील पक्ष संघटन बांधणी बाबत आढावा घेण्यात आला तसेच नवीन जिल्हा कार्यकारिणी बाबत व तालुका कार्यकारणी व पक्षाच्या विविध सेलच्या बाबत चर्चा झाली.

# मतदार यादी त्रुटीमुक्त करण्यासाठी राजकीय पक्षांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लोकशाही व्यवस्थेचा पाया असलेली मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक असणे अत्यंत आवश्यक आहे. कोणताही पात्र मतदार यादीतून वंचित राहू नये, यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या प्रक्रियेत जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी सकारात्मक भूमिका घेत सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या 'मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात सर्वमान्य राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते. या बैठकीत पुनरीक्षण प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला, तसेच आगामी विविध टप्प्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव व सहायक महसूल अधिकारी (निवडणूक) रवि महाले उपस्थित होते. तसेच विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींमध्ये युवक काँग्रेस अध्यक्ष नयन कऱ्हे, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस उज्ज्वल देशमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे जिल्हाध्यक्ष बालाजी वानखेडे, तालुका संघटक आनंदा काळे व प्रतिनिधी गणेश इंगोले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष पवन राऊत, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष विजय खानझोडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष आकाश लोलप, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष धनंजय रणखांब तसेच आम आदमी पार्टीचे प्रतिनिधी राम पाटील डोरले उपस्थित होते.त्रुटीमुक्त मतदार यादीसाठी 'बीएलए'चा समन्वय महत्त्वाचा जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर म्हणाले की, सध्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करीत आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह ही प्रपत्रे वेळेत भरून द्यावीत. तसेच, राजकीय पक्षांनी आपल्या बूथ लेव्हल एजंट (बीएलए) यांच्या माध्यमातून मतदार यादीतील नावे, तपशील आणि आवश्यक दुरुस्तींची पडताळणी करून प्रशासनाशी समन्वय ठेवावा, जेणेकरून अंतिम मतदार यादी अधिक विश्वासार्ह व अचूक होईल.


# नगर परिषद कार्यालय, वाशिम.

## ई – निविदा सूचना २०२६–२७ क्र. ०८ ( Open Tender)

मुख्याधिकारी नगर परिषद, वाशिम खालील कामांची ई - निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागवित आहेत. कामाच्या निविदा केवळ ई- निविदा पध्दतीने (On line) सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या विस्तृत नमुना व निविदा बाबत

**अटी** - शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या असून त्याबाबतचे Tender ID पुढील प्रमाणे आहेत.

1) 2026_DMA_1319082_1 2) 2026_DMA_1319054_1

वरील संकेतस्थळावर पहावयास उपलब्ध आहेत.

प्रसिध्द करणेत आलेल्या वेळापत्राका नूसार व ई-निविदा प्रपत्रातील अटी शर्ती नूसार निविदाकारांनी कार्यवाही करावी.

-स्वा-
(अरविंद मुंढे)
मुख्याधिकारी नगर परिषद, वाशिम

जा.क्र. क्र. नपवा/कार्या-१७/२११७/२०२६

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३१ ■ शनिवार, १८ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रोठा प्रकरणातील नराधमाला २१ जुलैपर्यंत पोलिस कोठडी

## न्यायालयाचा आदेश, तपासाला वेग

**वर्धा जनमाध्यम :** रोठा परिसरात १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार व निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपी राहुल राजू मडावी (३०, रा. रोठा) याला पोलिसांनी अटक केली असून शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला २१ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू असून आरोपीकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे,

पीडिता ही वर्धा शहरातील कावळे यांच्या रोठा भागातील शेतातील बंड्यात आई-वडील व दोन बहिणींसह राहत होती. घटनेच्या दिवशी १२ वर्षीय पीडिता शाळेतून घरी लवकर परतली. तर तिची आई शेजारील शेतात काम करीत होती. याच संधीचा फायदा आरोपी राहुल राजू मडावी (३०) रा. रोठा याने घेतला. घटनेच्या दिवशी दुपारी सुमारे ३ वाजेपर्यंत तो पीडितेच्या झोपडी पासून काही अंतरावर असलेल्या एका शेतात काम करीत होता. त्यानंतर त्याने कामात थोडी विश्रांती घेत थेट पीडितेची झोपडी गाठली. याच ठिकाणी त्याने पीडितेवर पूर्वी लैंगिक अत्याचार केला तर नंतर दगडाने मारहाण करून तिची हत्या केलीचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात पुढे आले आहे.

### आरोपी पीडित कुटुंबाच्या परिचयातीलच

या प्रकरणातील आरोपी राहुल राजू मडावी हा पीडित कुटुंबाच्या परिचयातीलच व्यक्ती आहे. कधी कधी तो पीडितेच्या कुटुंबियांनी सांगितल्यावर पीडितेच्या झोपडी परिसरात येत पाळीव जनावरांना चारा टाकत. शिवाय पाणीही पाजत होता. त्यामुळे पीडिताही त्याला ओळखत होती. पण घरातील एकटी मुलगी बघून राहुल याच्यातील सैतान जागा झाला. त्याने क्रूरतेचा कळस गाठत अवघ्या १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केला. शिवाय घटनेची माहिती कुणालाही मिळू नये म्हणून दगडाने वार करून पीडितेला ठार केले. तसेच घटनास्थळावरून यशस्वी पोबारा केल्याचेही पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात पुढे आले असल्याचे खात्रीदायक सूत्रांकडून सांगण्यात आले.

### पीडितेची ओळख उघड करू नका : पोलिसांचे नागरिकांना आवाहन

रोठा येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्या प्रकरणानंतर पीडितेबाबतची माहिती सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब आदी माध्यमांवर पीडितेची ओळख उघड होईल असा मजकूर, छायाचित्र किंवा व्हिडिओ प्रसारित करणे कायद्याने गुन्हा असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोक्सो कायदा, भारतीय न्याय संहिता तसेच अल्पवयीन न्याय कायद्यानुसार पीडितेचे नाव, छायाचित्र, शाळेचे नाव, पत्ता किंवा कुटुंबाची ओळख पटेल अशी कोणतीही माहिती सार्वजनिक करता येत नाही. अशा प्रकारचे कृत्य संबंधित कायद्यांचे उल्लंघन ठरू शकते. नागरिकांनी जबाबदारीचे भान ठेवून पीडितेच्या गोपनीयतेचा सन्मान करावा, अप्रमाणित माहिती किंवा ओळख उघड करणारा मजकूर सोशल मीडियावर प्रसारित करू नये. तसेच जिल्ह्यात शांतता व कायदा-सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वर्धा पोलिसांनी केले आहे.

# आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत वर्धा येथे पहिले महाआरोग्य शिबिर

## नियोजनासाठी विविध प्रकारच्या समित्या गठीत

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त जिल्ह्यात आरोग्य अमृत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवांतर्गत जिल्ह्यात चार ठिकाणी महा आरोग्य शिबिरे घेण्यात येत आहे. त्यातील पहिले शिबिर वर्धा येथे होणार असून या शिबिराच्या तयारीचा जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी आढावा घेतला. विभागांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीप्रमाणे प्रत्येकाने काम करावे, असे निर्देश त्यांनी केले.

बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी आणि शिबिराच्या नियोजनासाठी नेमण्यात आलेल्या समित्यांचे प्रमुख उपस्थित होते.

### शिबिर तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



गेल्यावर्षी राबविण्यात आलेल्या मोतीबिंदू विरहीत वर्धा अभियाच्या धर्तीवर आरोग्य अमृत महोत्सव राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत जिल्ह्यातील पहिले महा आरोग्य शिबिर दि.२२ ते २४ जुलै रोजी बच्छराज सभागृह, वर्धा येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन दि.२२ जुलै रोजी होणार असून पालकमंत्री व अन्य मंत्री यावेळी उपस्थित राहणार आहे. त्यानंतर आर्वी येथे दि.३१ जुलै ते १ ऑगस्ट, हिंगणघाट येथे दि.८ व ९ ऑगस्ट तर देवळी येथे १३ व १४ ऑगस्ट रोजी आरोग्य शिबिरे पार पडणार आहे.

या शिबिराच्या तयारीचा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला. वर्धा येथे आयोजित शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तेथे वाहतूक व्यवस्थापन, गर्दी व्यवस्थापनावर विशेष लक्ष देण्यात यावे. तेथे येणाऱ्या नागरिकांना विनामुल्य भोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छता, मंडप, स्टेज तसेच रुग्णांची तपासणी करण्यासाठी महिला व पुरुषांकरीता वेगवेगळे तपासणी कक्ष व त्यासाठी पुरेशे डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी याचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला.

उशिरापर्यंत रुग्ण तपासणी चालण्याची शक्यता असल्याने त्या प्रमाणात डॉक्टरांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्याचे बारकाईने नियोजन केले जावे. वर्धा येथील शिबिराच्या पहिल्या दिवशी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे, त्याचे देखील चांगले नियोजन करण्याच्या सूचना बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

वर्धा येथील शिबिराच्या उद्घाटनाला पालकमंत्री उपस्थित राहणार आहे. सोबतच आणखी काही मंत्री, राज्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता आहे, त्यामुळे सुरक्षाविषयक बाबी, मान्यवर व आलेल्या नागरिकांची बैठक व्यवस्था आदी बाबींचा देखील आढावा घेण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी नियोजनाची माहिती सादर केली.

# चिमुरडीला न्याय द्या, महिला काँग्रेसची मागणी

## पीडित कुटुंबाला न्याय मिळाला नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील १२ वर्षीय आदिवासी अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्येच्या घटनेचा निषेध करत वर्धा जिल्हा महिला काँग्रेसने जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन सादर केले. या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष अरुणा प्रभाकर धोटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

निवेदनात राज्याचे वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन तपासावर स्वतः लक्ष ठेवावे तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. कोणत्याही प्रकारच्या दबावाशिवाय तपास पूर्ण करून दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी भूमिका महिला काँग्रेसने मांडली.

यावेळी महिला काँग्रेसच्या



कार्यकर्त्यांनी पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे, दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे आणि पालकमंत्री हाय हाय अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे, धर्मपाल ताकसांडे यांच्यासह महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयूआयचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोषींवर तातडीने कठोर कारवाई करून पीडित कुटुंबाला न्याय न मिळाल्यास महिला काँग्रेसच्या वतीने आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरुणा प्रभाकर धोटे यांनी प्रशासनाला दिला.

# अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्ते किरण पट्टेवार यांचे निधन

**वर्धा जनमाध्यम :** अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील सक्रिय सहकारी, उत्कृष्ट निवेदक आणि तबलावादक म्हणून परिचित असलेले किरण लक्ष्मण (आप्पा) पट्टेवार (वय ५२) यांचे शुक्रवारी (दि. १७ जुलै) दुपारी १२ च्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक, सांस्कृतिक आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.



किरण पट्टेवार यांनी अनेक सामाजिक, सांस्कृतिक तसेच प्रबोधनपर कार्यक्रमांत निवेदक म्हणून प्रभावी भूमिका बजावली होती. तबलावादनातील त्यांचे कौशल्य आणि समाजजागृतीसाठीचे कार्य यामुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार निर्माण झाला होता.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली तसेच मोठा आप्तपरिवार परिवार आहे.

त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधन चळवळीतील एक संवेदनशील व अभ्यासू व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# रोठा हत्या कांड, निषेधार्थ आज वर्धा बंद

**वर्धा जनमाध्यम :** शाळकरी अल्पवयीन १२ वर्षीय मुलीवर शेत मजूर असलेल्या नराधम आरोपीने तिच्यावर अत्याचार करीत तिची दगडाने हत्या केली. जलद गती न्यायालयात प्रकरण सुरु करीत आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी आणि या घटनेच्या निषेधार्थ आज दिनांक १८ जुलै रोजी वर्धा बंद ची हाक सर्व सामाजिक व राजकीय संघटनांनी घेतली अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यवतमाळ जिल्ह्यातील कुटुंब गेल्या पाच वर्षांपासून वर्ध्यातील रोठा येथील एका शेतात वास्तव्यास आहेत.हसत खेळत असलेल्या कुटुंबातील १२ वर्षीय अल्पवयीन पिडीत चिमुरडी वर शेत मजूर असलेल्या नराधम आरोपी राहुल मडावी (३०) रा रोठा याची नजर पडली. त्या घटनेत आरोपीने तिच्यावर अमानुषपणे अत्याचार केला आणि नंतर तिची दगडाने हत्या केली.पोलीस विभागाने सतर्कता दाखवून आरोपीला अवघ्या दोन तासात अटक करण्यात आली. त्यानंतर चिमुरडीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन जिल्हा सामान्य रुग्णालयात होत असताना,आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर सामाजिक संघटनांनी उद्रेक केला होता.

अनेक अल्पवयीन मुलींचे संरक्षण व्हावे आणि नराधमांना वचक बसावा यासाठी आरोपीला फाशी शिक्षा व्हावी यासाठी चिमुरडी हत्याकांड प्रकरण जलदगती न्यायालयात सुरु करावे या मागणीसाठी वर्धेकरांनी एकत्र येऊन वर्धा बंदची हाक दिली आहेत.या घटनेच्या निषेधार्थ सर्व सामाजिक संघटनांच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात येणार आहेत. मोर्चाचे स्वरूप छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बजाज चौक डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक असा राहणार आहेत.त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात मागण्यांचे निवेदन देण्यात येणार अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.यावेळी काँग्रेसचे प्रदेश सचिव डॉ अभ्युदय मेघे,शिवराज शिंदे, चंद्रशेखर मडावी,सतीश आत्राम,ज्ञानेश्वर मडावी,शरद आडे आदींची उपस्थिती होती.

# उपचारासाठी निघालेल्या माऊलीचा मृत्यू

## भरधाव कारची दुचाकीला धडक. मुलगा जखमी, आईचा उपचारादरम्यान अंत

**समुद्रपूर जनमाध्यम :** उपचारासाठी मुलासोबत दुचाकीवरून हिंगणघाटकडे निघालेल्या माऊलीचा भरधाव कारच्या धडकेत मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना १६ जुलै रोजी वायगाव ह. येथील हळद कंपनीसमोर घडली. या अपघातात मुलगाही जखमी झाला असून उपचारादरम्यान आईची प्राणज्योत मालवल्याने गिरड गावावर शोककळा पसरली आहे.

मृत महिलेचे नाव विमला सुरेश कोराम वय ५५ रा. गिरड असे आहे. त्यांचा मुलगा जितेंद्र सुरेश कोराम हा आईला दुचाकीने उपचारासाठी हिंगणघाट येथे घेऊन जात होता. वायगाव ह. येथील हळद कंपनीसमोर मागून



भरधाव वेगाने आलेल्या कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडकेची तीव्रता इतकी होती की आई मुलगा दोघेही रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत दोघांना समुद्रपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र विमला कोराम यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. उपचारासाठी निघालेल्या माऊलीचा रस्त्यातच मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गिरीश मोहतुरे करीत आहेत. नागरिकांनी या मार्गावरील भरधाव वाहनांवर नियंत्रण आणून अपघात रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# ई-निविदा रद्द... तरी ४४ लाखांची उधळपट्टी

## स्वच्छ भारत मिशनच्या नावाखाली सिंदी (मेघे) त कोट्यवधींचा घोटाळा

### दोषींवर गुन्हे दाखल करा, माजी जि.प. सदस्य मनिष पुसाटे यांचा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** ई-निविदा रद्द. काम निकृष्ट. अधिकाऱ्यांचा नकारात्मक अहवाल तरीही ठेकेदाराच्या खात्यात तब्बल ४४ लाख १५ हजार रुपये जमा! सिंदी (मेघे) ग्रामपंचायतीतील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सांडपाणी व्यवस्थापन योजनेत मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य मनिष पुसाटे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली.





पुसाटे यांनी माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांचा हवाला देत सांगितले की, २ कोटी ३१ लाख ९३ हजार रुपयांच्या या योजनेची ई-निविदा जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ३१ डिसेंबर २०२५ रोजी रद्द केली होती. मात्र त्यानंतरही शासनाच्या ६४ टक्के वाट्याचे ४४.१५ लाख रुपये ठेकेदाराला अदा करण्याचे आदेश देण्यात आले. विशेष म्हणजे तत्कालीन गटविकास अधिकारी संजय पाटील यांनी काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने एकही रुपया अदा करू नये, असा अहवाल दिला होता. तरीही निधी वाटप झाल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. याशिवाय केवळ ५० लाख रुपयांची आर्थिक क्षमता असलेल्या ठेकेदाराला तब्बल २.३१ कोटी रुपयांचे काम देणे, ई-निविदा प्रक्रियेत नियमबाह्य कारभार आणि डीएससीचा गैरवापर झाल्याचेही चौकशीत समोर आल्याचा दावा पुसाटे यांनी केला.

### ■ १५ दिवसांत कारवाई नाही तर रस्त्यावर उतरू

निकृष्ट कामामुळे गावात सांडपाणी साचून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे. त्यामुळे दोषी अधिकारी, सरपंच आणि संबंधित ठेकेदारावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अदा केलेले ४४.१५ लाख रुपये व्याजासह वसूल करावेत आणि ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे. अन्यथा १५ दिवसांत तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनिष पुसाटे यांनी प्रशासनाला दिला.

# आरोपीचे वकीलपत्र स्वीकारू नका; समाजानेही अन्यायाविरोधात उभे राहावे

**वर्धा जनमाध्यम :** रोठा परिसरातील १२ वर्षीय आदिवासी चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार व निर्घृण हत्येप्रकरणी आरोपीचे वकीलपत्र महाराष्ट्रातील कोणत्याही विधिज्ञाने स्वीकारू नये, अशी मागणी जनसेवा गोंडवाना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा आदिवासी नेते अवचित सयाम यांनी केली आहे. तसेच या प्रकरणातील दोषीला कठोरातील कठोर शिक्षा देऊन पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

सयाम यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निष्पाप आदिवासी चिमुरडीवर झालेला अमानुष अत्याचार आणि त्यानंतरची निर्घृण हत्या ही संपूर्ण समाजाला हादरवून टाकणारी घटना आहे.

या घटनेने प्रत्येक संवेदनशील नागरिकाच्या मनात संतापाची लाट उसळली असून, आई-वडिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अशा विकृत मानसिकतेच्या आरोपीला कोणतीही सहानुभूती मिळता कामा नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर पूर्ण करून विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करावी, खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि दोषीला कायद्यानुसार कठोरातील कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत, सुरक्षा, पुनर्वसन आणि सर्व आवश्यक शासकीय सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी शासनाकडे केली.

या अमानुष घटनेनंतर राज्यभरातून न्यायाची मागणी होत असून, चिमुरडीला न्याय मिळावा आणि भविष्यात अशा घटनांना आळा बसावा, यासाठी कठोर कारवाईची आवश्यकता असल्याचे अवचित सयाम यांनी नमूद केले.

# त्या' चिमुकलीच्या आक्रोशाला न्याय कधी

## रोठा हत्याकांडाने पुन्हा समाजमन हेलावले; न्यायासाठी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे सरसावले

**वर्धा जनमाध्यम :** रोठा परिसरात अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर तिची निर्घृण हत्या झाल्याची घटना संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारी ठरली आहे. एका निष्पाप लेकराचा जीव घेणाऱ्या या क्रूर घटनेने प्रत्येक संवेदनशील मन सुन्न झाले असून, समाजात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

अशा वेदनादायी वातावरणात पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, या मागणीसाठी शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी शुक्रवारी वर्धा येथे जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांची भेट घेतली.

यावेळी दानवे यांनी या प्रकरणाचा सखोल, निष्पक्ष आणि अत्यंत जलद तपास करण्याची मागणी केली. आरोपीला कोणत्याही परिस्थितीत कायद्याच्या पळवाटा मिळू नयेत तसेच जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.



एका निष्पाप मुलीचे आयुष्य संपविणाऱ्यांना समाजात स्थान नाही. अशा नराधमांना कायद्याने सर्वाधिक कठोर शिक्षा मिळाली पाहिजे.

तरच समाजात योग्य संदेश जाईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या भीषण घटनेने राज्यातील महिला आणि बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. केवळ आरोपीला अटक करून हा विषय संपणार नसून, पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे ही काळाची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनंत देशमुख, राजेंद्र खूपसरे, प्रमोद बोंबले, रवींद्र चव्हाण, प्रमोद भटे, सतीश धोबे, मनोज देवके, संजय पांडे, पंकज मयेकर, विलास वैद्य यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 6 चेंडूंवर सर्वात पहिल्यांदा 6 षटकार मारणारे महान अष्टपैलू खेळाडू सर गॅरी सोबर्स यांचे निधन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सर गार्फिल्ड सोबर्स (गॅरी सोबर्स) यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले आहे. गॅरी यांचे पुत्र डॅनियल यांनी त्यांच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. सोबर्स यांनी



बार्बाडोस येथील त्यांच्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. क्रिकेट इतिहासात सर्वश्रेष्ठ अष्टपैलू म्हणून ओळखले जाणारे गॅरी सोबर्स सहा चेंडूंवर सहा षटकार मारणारे पहिले खेळाडू होते. गॅरी सोबर्स यांच्या निधनानंतर क्रिकेट विश्वातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

**गॅरी सोबर्स यांचे निधन-** २८ जुलै, १९३६ रोजी बार्बाडोसमध्ये जन्मलेल्या गॅरी सोबर्स यांची प्रतिभावान डावखुरे फलंदाज म्हणून ओळख होती. मध्यमगती, फिरकी गोलंदाज म्हणूनही त्यांनी क्रिकेट विश्वात वेगळी ओळख निर्माण केली होती. वेस्ट इंडिज क्रिकेट मंडळाने गॅरी सोबर्स यांचे निधनाचे वृत्त देत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. वेस्ट इंडिज क्रिकेट संघाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक विजय मिळवून देण्यात आणि संघासाठी भरीव कामगिरी करण्यात गॅरी सोबर्स यांचे मोठे योगदान आहे.

**क्रिकेटमधील कामगिरी-**सर गॅरी सोबर्स यांना क्रिकेटच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ अष्टपैलू म्हणून ओळखले जाते. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी त्यांनी वेस्ट इंडिजकडून कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. सोबर्स यांनी ९३ कसोटी सामने खेळताना २६ शतकांसह ५७.७८ च्या सरासरीने ८,०३२ धावा केल्या. गोलंदाजीत देखील त्यांनी उत्तम कामगिरी केली. सोबर्सनी २३५ बळी घेतले तर, क्षेत्ररक्षणातही उल्लेखनीय कामगिरी करताना १०९ झेल त्यांनी टिपले.

**सहा चेंडूंवर सहा षटकार मारणारे पहिले क्रिकेटपटू-**सर गॅरी सोबर्स यांनी १९५८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध ३६५ धावांची नाबाद खेळी केली होती. त्यावेळी ही कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या होती. प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये एकाच षटकात सहा षटकार मारणारे सोबर्स पहिले क्रिकेटपटू होते. १९६८ मध्ये नाटिंगहॅमशायरकडून खेळताना ग्लॅमार्गनविरुद्ध त्यांनी सलग सहा चेंडूंवर सहा षटकार ठोकले होते. सोबर्स यांच्या क्रिकेटमधील योगदानाचा योग्य सन्मान करत, २००४ पासून, आयसीसी दरवर्षी सर्वोत्कृष्ट पुरुष क्रिकेटपटूला सर गार्फिल्ड सोबर्स ट्रॉफी दिली जाते.

**मान-सन्मान-**गॅरी सोबर्स यांनी केवळ फलंदाजी आणि गोलंदाजीतूनच संघासाठी योगदान दिले नाही तर, संघाचे कर्णधारपदही भूषवले आणि अनेकांना प्रेरणा देण्याचे काम केले. क्रिकेटमधील योगदानाबद्दल विस्डेनच्या शतकातील क्रिकेटपटूंपैकी एक म्हणून त्यांची निवड झाली तसेच आयसीसी हाल ऑफ फेममध्ये त्यांचा समावेश करण्यात आला. गॅरी सोबर्स यांच्या निधनानंतर क्रिकेट विश्वातून हळहळ व्यक्त केली जात असून, अनेक आजी- माजी क्रिकेटपटून सोबर्स यांच्या आठवणींना उजाळा देत तसेच त्यांचा क्रिकेटमधील कामगिरीचा दाखला देत श्रद्धांजली अपर्ण केली आहे.

# मुंढेंच्या नावाचा धाक की अधिका-यांना 'वसुली'ची संधी?

## माजी नगरसेवकाच्या पोस्टमुळे खळबळ



**नागपूर/प्रतिनिधी ::** तुकाराम मुंढे हे प्रामाणिक आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात; मात्र त्यांच्या नावाचा आधार घेत काही अधिकारी गैरफायदा घेत आहेत का? असा प्रश्न माजी नगरसेवकाच्या एका समाजमाध्यमावरील पोस्टनंतर उपस्थित झाला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील काही अधिकारी मुंढे यांच्या धाकाचा वापर करून व्यावसायिकांकडून आर्थिक व्यवहार करत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भेसळविरोधी मोहिमेमुळे व्यापारी वर्तुळात खळबळ

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर खाद्यपदार्थातील भेसळ, निकृष्ट दर्जाची उत्पादने आणि नियमांचे उल्लंघन करणा-यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत तपासण्या वाढवण्यात आल्या असून, नियमभंग करणा-यांवर कारवाई केली जात आहे. मुंढे यांच्या कठोर कार्यपद्धतीमुळे प्रशासनात शिस्तीचा संदेश गेला असला, तरी काही व्यावसायिकांमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या कारवाईचे समर्थन करणा-या तसेच प्रश्न उपस्थित करणा-या प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर उमटत आहेत.

**मुंढेंच्या नावाचा वापर करून वसुली?-**दरम्यान, काही ठिकाणी अधिकारी मुंढे यांच्या नावाचा आधार घेत आर्थिक व्यवहार करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. तुकाराम मुंढे प्रामाणिक अधिकारी आहेत; मात्र त्यांच्या नावाचा वापर करून काही जण गैरफायदा घेत आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मात्र, या संदर्भातील कोणत्याही आरोपांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेली नाही. त्यामुळे अशा दाव्यांची सत्यता तपासणे आवश्यक असल्याचे मत व्यक्तहोत आहे. प्रामाणिक अधिका-यांच्या नावाचा गैरवापर होत असल्यास संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी केली जात आहे.

**माजी नगरसेवक वेदप्रकाश आर्य यांची पोस्ट चर्चेत-**याच विषयावर माजी नगरसेवक वेदप्रकाश आर्य यांनी समाजमाध्यमांवर केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. या पोस्टमध्ये भेसळविरोधी कारवाई, प्रशासनातील पारदर्शकता आणि अधिका-यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एखाद्या अधिका-याच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार समोर येत असतील, तर यापूर्वीची प्रशासकीय यंत्रणा किती प्रभावी होती, याचीही चौकशी व्हावी, असा मुद्दा त्यांनी मांडला आहे. मात्र, या पोस्टबाबत संबंधित विभागाकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

**बदलीच्या चर्चांना वेग, सरकारकडून मौन-**तुकाराम मुंढे हे यापूर्वीही विविध प्रशासकीय पदांवरील निर्णयक्षम कार्यशैलीमुळे चर्चेत राहिले आहेत. कठोर निर्णय घेणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख असून, त्यांच्या वारंवार झालेल्या बदल्यांवरूनही अनेकदा चर्चा रंगल्या आहेत. सध्या अन्न व औषध प्रशासन विभागातील त्यांच्या मोहिमेमुळे भेसळ करणा-यांवर कारवाईचा दबाव वाढला आहे. दरम्यान, त्यांच्या बदलीबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू असली तरी सरकारकडून याबाबत कोणतीही अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

# माहूरच्या 'रेणुका माता तांबुल' प्रसादाला मिळाला मानाचा 'GI Tag'; तिरूपतीच्या लाडूनंतर बहुमान

**माहूर (नांदेड)/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या समृद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय स्तरावर एक अत्यंत मोठी आणि ऐतिहासिक नवी ओळख मिळाली आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी प्रमुख मूळ पीठ असलेल्या तीर्थक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरामध्ये देवीला नैवेद्य म्हणून अर्पण केल्या जाणा-या पारंपरिक 'रेणुका माता तांबुल' (Mahur Tambul Prasad) या प्रसादाला केंद्र सरकारने अधिकृत भौगोलिक मानांकन (GI) बहाल केले आहे. यामुळे माहूरचा तांबुल हा देशात तिरुपती लाडू प्रसादानंतर जीआय मानांकन मिळवणारा दुसरा, तर महाराष्ट्रातील पहिलाच मानांकनप्राप्त प्रसाद ठरला आहे. या यशामुळे माहूरच्या धार्मिक पर्यटनाला जागतिक स्तरावर एक मोठी गती मिळण्याची नवी पहाट उजाडली आहे.लोकपरंपरेनुसार आणि प्राचीन ग्रंथांमधील संदर्भांनुसार, श्री रेणुका मातांनी त्यांचे निस्सीम भक्त श्री विष्णुकवी महाराजांना स्वप्नात दृष्टांत देउन तांबुलाचा नैवेद्य सुरू करण्याची दैवी आज्ञा दिली होती. त्यानंतर ही पवित्र परंपरा आजही अखंडपणे सुरू असून मंदिरात दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत तांबुल तयार करण्याचे कार्य चालते. सध्या गावातील अमोल गावंडे, पांडुरंग राठोड, विशाल चौधरी, संतोष परळकर, अनिल परळकर, अभिषेक परळकर आणि



लवकुश जाधव ही सात पारंपरिक सेवेकरी कुटुंबे कोणत्याही व्यावसायिक फायद्याशिवाय ही वारसा परंपरा पिढ्यानपिढ्या जपण?याचे पवित्र कार्य करत आहेत.माहूरच्या या तांबुलाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये वापरण्यात येणारे पूर्णपणे नैसर्गिक आणि औषधी घटक आहेत. या तांबुलामध्ये नागवेलीची पाने, कात, चुना, सुपारी, सोप, लवंग, वेलची, जायफळ, जायपत्री, ओवा, धनेदाळ, आस्मान तारा, ज्येष्ठमध आणि चमनबार अशा एकूण १४ नैसर्गिक घटकांचा समावेश असतो. पारंपरिक पद्धतीने हे सर्व साहित्य दगडी खलबत्त्यात एकत्र करून तांबुल तयार करण्यात येतो. आयुर्वेदानुसार या घटकांचे पचनासह मानवी आरोग्यासाठीही प्रचंड महत्त्व असल्याचे मानले जाते, ज्यामुळे हा केवळ धार्मिक प्रसाद न राहता एक औषधी अर्क ठरला आहे.हा बहुमान मिळवण्यासाठी तांबुलाचा इतिहास, परंपरा, सांस्कृतिक संदर्भ, भौगोलिक वैशिष्ट्ये आणि तांबुलाची अस्सल ओळख यांचे शेकडो पानांचे पुरावे केंद्र सरकारकडे सादर करावे लागले होते. जवळपास तीन वर्षांच्या सातत्यपूर्ण कायदेशीर पाठपुराव्यानंतर हे मानांकन प्राप्त झाले आहे. या संपूर्ण प्रक्रियेसाठी देशातील प्रसिद्ध भौगोलिक मानांकन तज्ज्ञ प्रा. डा. गणेश हिंगमिरे यांनी महत्त्वपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन केले. रेणुका माता संस्थानचे अधिकृत विश्वस्त चंद्रकांत भोपी आणि समीर भोपी यांच्यासह सेवेकरी मंडळाने यासाठी मोठे परिश्रम घेतले. या मानांकनामुळे 'माहूरचा रेणुका माता तांबुल' या नावाला आता आंतरराष्ट्रीय कायदेशीर संरक्षण मिळाले असून बाजारातील बनावट उत्पादनांना आळा बसणार आहे व स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळणार आहे.

# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

मुंबई, दि. १७ : भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अलीकडील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मूख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य यांनी मुदतवाढीची केलेली विनंती मान्य करून आयोगाने हा निर्णय घेतल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिली आहे.

**प्रारूप मतदार यादी १७ ऑगस्टला, अंतिम यादी १९ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार**

सुधारित कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत गृहभेटीची मोहीम ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ (सोमवार) रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नोटिसा देणे, सुनावणी घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया पार पडेल. यानंतर १९ ऑक्टोबर २०२६ (सोमवार) रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी गणना प्रपत्र भरून देउन निवडणूक प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांनी केले आहे.

# क्वांटम तंत्रज्ञानात महाराष्ट्राला देशात अग्रस्थानी नेण्याचे उद्दिष्ट-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर आणि क्वांटम तंत्रज्ञान हे भविष्यातील विकासाचे तीन प्रमुख आधारस्तंभ ठरणार आहेत. या क्षेत्रात महाराष्ट्राने मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळ तयार करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशनशी सुसंगत असे महाराष्ट्र क्वांटम टेक्नालाजी मिशन प्रभावीपणे राबवून राज्यात सक्षम क्वांटम इकोसिस्टीम उभारण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आय-हब क्वांटम टेक्नालाजी फाउंडेशनच्या वतीने पुणे येथे आयोजित क्वांटम टेक्नालाजी फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल बी. रेड्डी, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, आयसर, सी-डॅक तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे प्राध्यापक आणि अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जग अतिशय वेगाने बदलत असून डेटा-आधारित अर्थव्यवस्थेपासून आता उच्च गतीच्या डेटा प्रोसेसिंगच्या युगात प्रवेश होत आहे. भविष्यातील जागतिक स्पर्धेत एआय, सेमीकंडक्टर आणि क्वांटम तंत्रज्ञान निर्णायक भूमिका बजावणार आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राप्रमाणेच क्वांटम क्षेत्रातही भारताने कुशल मनुष्यबळाच्या बळावर जागतिक नेतृत्व मिळविण्याची संधी साधली पाहिजे.

ते म्हणाले की, केंद्र सरकारने राष्ट्रीय क्वांटम मिशनसाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासन राज्याचे स्वतंत्र क्वांटम मिशन राबवत असून, प्रशिक्षित प्राध्यापकांच्या माध्यमातून राज्यात मजबूत क्वांटम इकोसिस्टीम उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. पुढील टप्प्यात ५०० प्रशिक्षक



आणि त्यानंतर किमान ५ हजारांहून अधिक क्वांटम प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

क्वांटम तंत्रज्ञानामुळे अभियांत्रिकी, वैद्यकीय, अवकाश, उद्योग, संरक्षण अशा सर्वच क्षेत्रांत मोठी क्रांती होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढील काही वर्षात रोजगार क्षेत्राचे स्वरूप झपाट्याने बदलणार आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि प्राध्यापकांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी आजपासूनच सक्षम करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आयसर, सी-डॅक, टीआयएफआर, आयआयटी मुंबई, सीओईपी, व्हीएनआयटीसारख्या संस्थांमध्ये क्वांटम क्षेत्रातील क्षमता विकसित होत असून, या सर्व संस्थांची ताकद एकत्रित करून राज्याचे क्वांटम मिशन अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. प्रशिक्षणासाठी विकसित करण्यात आलेले अभ्यासक्रम, एलएमएस आणि 'चांद्र' व 'सूर्य' हे चॅटबाट्स विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यात उपयुक्त ठरत असल्याचे नमूद करून या उपक्रमात सहभागी सर्व संस्था, तज्ज्ञ आणि प्राध्यापकांचे त्यांनी अभिनंदन केले.

# बीएलएच्या भीषण हल्ल्यात ४५ पाक जवान ठार

**इस्लामाबाद :** पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान सध्या धुमसत आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या दीड महिन्यांपासून विविध मागण्यांसाठी नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. तर, बलुचिस्तानमधील नागरिक लष्कराच्या दबाव आणि अपहरणाच्या घटनांमुळे त्रस्त आहेत. काही दिवसांपूर्वी वेगळा देश म्हणून घोषणा करणा-या बलुचिस्तानने पाकिस्तानच्या ४५ जवानांना ठार केले आहे. बलुचिस्तान पोस्टच्या वृत्तानुसार, गुरुवारी बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने पाकिस्तानच्या ४५ जवांनाना ठार केले.दोन आठवड्यांत पाकिस्तानी जवानांवर तिस-यांदा हा मोठा हल्ला झाला आहे.



पाकिस्तानी जवानांवर हल्ला झाल्याची पुष्टी पाकिस्तानी लष्कराने केली असली तरी, किती जवान ठार झाले? याची माहिती देण्यात आलेली नाही. या हल्ल्याची जबाबदारी बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने स्वीकारली आहे. लिबरेशन आर्मीचे प्रवक्ते जीयांद बलोच यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे या हल्ल्याची माहिती दिली आहे. बीएलएच्या जवानांनी पाकिस्तानी सैनिकांच्या ताफयावर हल्ला केला, हल्ला सुरु झाल्यानंतर आलेल्या इतर लष्करी कर्मचा-यांवर देखील गोळीबार केला अशी माहिती बलोच यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. जीयांद बलोच यांनी पत्रकात पुढे म्हटल्याप्रमाणे हा बीएलएच्या फतेह गरुपने हा हल्ला केला, हा हल्ला संयुक्तपणे करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे. पत्रक प्रसिद्ध केले त्यावेळी देखील चकमक सुरु होती आणि मृतांची संख्या वाढण्याची शक्यता बलोच यांनी वर्तवली. पाकिस्तानी पोलिस आणि जवानांवर हल्ल्याच्या वाढत्या घटना लक्षात घेता, पाकिस्तानी लष्कराने ऑपरेशन शाबाण सुरु केले आहे. मांगी धरण परिसरात झालेल्या हल्ल्यात २७ पोलिस आणि लासबेला येथे झालेल्या हल्ल्यात ११ पाकिस्तानी जवानांचा मृत्यू झाला होता. यानंतर पाकिस्तानकडून खबरदारी घेतली जात आहे. पाकिस्तान ऑपरेशन शाबाण राबविण्यासाठी लष्कर, फ्रंटीयर कार्प्स, बलुचिस्तान पोलिस, हवाई दल आणि गुप्तचर यंत्रणांची देखील मदत घेत आहे. पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते ले. जनरल शरीफ चौधरी यांनी या हल्ल्याप्रकरणी इशारा देताना, जे कोणी जबाबदार असतील त्यांना शोधून ठार केले जाईल, असा इशारा दिला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बलुचिस्तानने आपण स्वतंत्र देश असल्याचे जाहीर करताना, पाकिस्तानपासून वेगळं झाल्याचे म्हटले होते. याप्रकरणी व्हायरल झालेल्या एका निवेदनात बलुचिस्तान वेगळा देश असल्याचा दावा करण्यात आला होता.

# नशेत स्वतःचे घर पेटून पत्नीला मारहाण

## वरूड तालुक्यातील सुरली गावातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरगुती वादातून एका इसमाने दारूच्या नशेत स्वतःचेच घर पेटवून पत्नीला मारहाण केल्याची धक्कादायक घटना वरुड तालुक्यातील सुरली गावात समोर आली आहे. या आगीत सुमारे १.५० लाख रुपयांचे घरातील साहित्य जळून खाक झाले.माहितीनुसार, आरोपी भूषण विष्णुपंत गोमकाले (वय ४० ) याचे पत्नी आणि मुलींसोबत गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होते. तो पत्नी आणि मुलीवर घर सोडून जाण्यासाठी सतत दबाव टाकत होता.अशात गुरुवारी रात्री पत्नी घराबाहेर गेली होती आणि मुलगी घरात एकटी होती. त्यावेळी नशेत आरोपी घरात आला आणि त्याने घरात तोडफोड सुरू केली. मुलीने घाबरून आईला फोन करून माहिती दिली.

पत्नी घरी पोहोचताच तिने आरोपीला अडवण्याचा प्रयत्न केला. त्याच रागातून आरोपीने घरात पेट्रोल शिंपडून आग लावली. पाहता पाहता आगीने विक्राळ रूप धारण केले. यात सोफा, दिवाण, शोकेस, टीव्ही आणि फ्रीजसह घरातील सर्व सामान जळून राख झाले. दीड लाखाचे नुकसान यामध्ये झाले. घराला आग लावल्यानंतर ही आरोपी थांबला नाही तर त्याने पत्नीला घराबाहेर ओढत नेले आणि तिच्या सोबत मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच वरूड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपी भूषण गोमकाले याच्या विरुद्ध विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार? NDA मधील प्रवेशासाठी दोन कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर, भाजपाचा मोठा राजकीय डाव?

**मुंबई/प्रतिनिधी :**लोकसभा आणि राज्यसभेत बहुमत अधिक भक्कम करण्यासाठी भाजपाने आता नवी राजकीय रणनीती आखल्याचे वृत्त समोर आले आहे. महिला आरक्षण कायदा आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवण्याच्या प्रयत्नांत भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी पुन्हा एकत्र यावे आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (भाग व्हावे, असा प्रस्ताव ठेवल्याचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. राष्ट्रवादीच्या कोणत्या तरी एका गटाने एनडीएचा भाग होण्यापेक्षा या पर्यायाचा विचार करावा, असे भाजपाने सुचवले आहे.



विश्वसनीय सूत्रांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्यास तयार झाले तर सत्तासंतुलन राखण्यासाठी भाजपाने केंद्रीय मंत्रिमंडळात दोन कॅबिनेट मंत्रिपदांची ऑफर दिली आहे. यामध्ये सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही गटांना प्रत्येकी एक कॅबिनेट मंत्रिपद देण्याचा प्रस्ताव आहे.

**भाजपाची भूमिका काय?** सूत्रांच्या माहितीनुसार, एनडीएमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला स्वतंत्र पक्ष म्हणून कायम ठेवण्याची भाजपाची भूमिका आहे. एका वरिष्ठ सूत्राने सांगितले की, मित्रपक्षांनी भाजपामध्ये विलीन व्हावे, या भूमिकेला केंद्रीय नेतृत्वाचा विरोध आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र पक्ष म्हणून अस्तित्वात राहिल्यास ब्राह्मणेतर आणि मराठा मतदारांमध्ये भाजपा-एनडीएला अधिक मजबूत आधार मिळू शकतो. तसेच, मित्रपक्षांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व कायम राहावे आणि ते कमकुवत होउ नयेत, याबाबतही भाजपाचे केंद्रीय नेतृत्व सावध असल्याचे सूत्रांनी नमूद केले. मात्र, या फार्म्युल्यावर अद्याप एकमत झालेले नाही. सूत्रांच्या माहितीनुसार, यावर प्राथमिक स्तरावर चर्चा झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत सत्तासंघर्षामुळे या फार्म्युल्याचा दोन्ही पक्ष कशाप्रकारे विचार करतात यावर पुढील गणितं अवलंबून असणार आहेत.

**पार्थ पवारांच्या भूमिकेला महत्त्व?**

अजित पवार यांचे ज्येष्ठ पुत्र आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांची भूमिका या चर्चेत महत्त्वाची मानली जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण झाल्यास सुनेत्रा पवार यांच्याकडे महाराष्ट्र सरकारचे अर्थ खाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी द्यावी, अशी पार्थ पवारांची इच्छा आहे, असे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने सूत्रांच्या हवाल्याने दिले.अजित पवार यांच्याकडे यापूर्वी अर्थ खाते होते. मात्र, त्यांच्या निधनानंतर अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्वतःकडे ठेवले.दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनीही राष्ट्रवादीला सत्तावाटपात योग्य स्थान मिळावे, अशी भूमिका मांडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.सूत्रांच्या मते, सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीने केंद्रीय मंत्रिपद, महाराष्ट्रातील अर्थ खाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा आग्रह धरला, तर शरद पवारांची राष्ट्रवादी या मागणीला सहमती देण्याची शक्यता कमी आहे, त्यामुळे सत्तावाटपाच्या वाटाघाटीत अडथळे येउ शकतात.

**संख्याबळाचं गणित काय?-**राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्रितपणे एनडीएमध्ये सामील झाले तर मोदी सरकारचं संसदेतील संख्याबळ दोन-तृतीयांश बहुमताच्या जवळ पोहोचू शकतं. संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी हे बहुमत आवश्यक असतं. महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सरकारने कंबर कसली. मात्र, एप्रिलमध्ये झालेल्या लोकसभेच्या विशेष अधिवेशनात सरकारचे घटनादुरुस्तीचे विधेयक पुरेशी मतं मिळवण्यात अयशस्वी ठरले. त्यानंतर विरोधी पक्षांतील चार पक्षांचे एकूण ३७ खासदार लोकसभा आणि राज्यसभेत सत्ताधारी बाकड्यांवर जाउन बसले आहेत, हे आतापर्यंतचं सर्वांत मोठं पक्षांतर मानलं जात आहे. पक्षांतरबंदी कायदा लागू असूनही हे घडलं आहे.

**भाजपाची बहुमतासाठी कसरत-**सध्या लोकसभेतील सदस्य संख्या ५४० आहे. यामध्ये तीन जागा रिक्त असून, दोन खासदार तुरुंगात असल्याने ते मतदान करू शकत नाहीत, त्यामुळे घटना दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेला दोन-तृतीयांश बहुमताचा आकडा ३६० इतका आहे.एप्रिलमध्ये झालेल्या विशेष अधिवेशनात ५२८ खासदारांनी मतदान केले होते. त्यावेळी दोन-तृतीयांश बहुमतासाठी ३५२ मतांची आवश्यकता होती. मात्र, सरकारला केवळ २९८ खासदारांची मते मिळाली, तर विरोधात २३० मते पडली.त्यावेळी लोकसभेत एनडीएकडे २९३ खासदार होते. त्यानंतर तृणमूल काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)मधील फुटीनंतर एनडीएचे संख्याबळ ३१९ वर पोहोचले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गट एनडीएत सामील झाल्यास एनडीएची बाजू आणखी भक्कम होउ शकते. सत्ताधा-यांचे संख्याबळ ३२७ होउ शकते. तरीही दोन-तृतीयांश बहुमतासाठी आवश्यक असलेल्या आकड्यापेक्षा ३३ खासदारांची कमतरता राहील. ही कमतरता भरून काढण्यासाठी भाजपाला इतर पक्षांचा पाठिंबा मिळवणे आवश्यक असणार आहे; तर काही विरोधी खासदार तटस्थ राहिल्यास फायदा होउ शकेल, अशी भाजपाची रणनीती असल्याचे सूत्रांनी नमूद केले आहे.

# मोस्ट वान्टेड गँगस्टर नितीन कौशलला अमेरिकेत अटक

**न्यूयार्क /वृत्तसंस्था :** अमेरिकेत खून, अपहरण आणि अंमली पदार्थांच्या तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असलेल्या नितीश कौशल या भारतीय गँगस्टरला एफबीआयने व्हर्मोन्ट राज्यातून अटक केली आहे. एफबीआयने त्याचा समावेश मोस्ट वान्टेड यादीत केला होता. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच त्याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. एफबीआयने गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर एक पोस्ट शेअर करून या अटकेची माहिती दिली.

नितीश कौशल हा मूळचा भारतीय नागरिक असून तो जग्गू भगवानपुरिया संघटित गुन्हेगारी टोळी या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी सिंडिकेटचा सक्रिय सदस्य आहे. तो या टोळीच्या सांगण्यावरून अपहरण, प्राणघातक हल्ले आणि इतर हिंसक कृत्ये करत असल्याचा आरोप आहे. ही गुन्हेगारी टोळी मूळची हिंदुस्थानमधील पंजाब राज्यातील असून, सध्या ती अमेरिकेतील कॅलिफोर्नियाचा मध्यवर्ती भाग आणि इतर देशांमध्ये आपले नेटवर्क चालवत आहे, अशी माहिती एफबीआयने दिली आहे. नितीश कौशल खून, खंडणी, शस्त्रास्त्रांची तस्करी, मनी लाँड्रिंग आणि मानवी तस्करी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असल्याचा संशय आहे. २५ जून रोजी लास एंजेलिस येथील कॅलिफोर्नियाच्या मध्यवर्ती जिल्हा न्यायालयाने त्याच्याविरुद्ध फेडरल अटक वारंट जारी केले होते. त्याच्यावर रॅकेटियर इन्फ्लुएन्स्ड अँड करप्ट ऑर्गनायझेशन्स कायद्यांतर्गत कट रचल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, नितीन कौशलची ही अटक ऑपरेशन हार्ड बाल या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय मोहिमेचा भाग आहे. या मोहिमेत अमेरिका, कॅनडा आणि युरोपमध्ये एकाच वेळी छापे टाकण्यात आले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शेतकरी हिताला प्राधान्य

महाराष्ट्रातील शेतकरी हा वर्षानुवर्षे संकटाशी झुंज देत आहे. एकीकडे निसर्गाची अनिश्चित साथ, तर दुसरीकडे बाजारपेठेतील चढ-उतार यामुळे शेती दिवसेंदिवस अधिक जोखमीची होत चालली आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, सिंचन आणि यांत्रिकीकरणाचा खर्च सातत्याने वाढत असताना, त्याच प्रमाणात शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे उत्पादन वाढले तरी उत्पन्न वाढेलच, याची शाश्वती उरलेली नाही. अनेकदा शेतकरी कर्ज घेऊन शेती करतो. पीक चांगले आले तर बाजारभाव मिळत नाही आणि बाजारभाव मिळाला तर पावसामुळे किंवा रोगराईमुळे उत्पादन घटते. परिणामी घेतलेले कर्ज फेडणे कठीण होते. सहकारी संस्था, बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडील कर्जाची थकबाकी वाढत जाते. त्यातच कृषी पंपांच्या वीजबिलांची थकबाकीही अनेक शेतकऱ्यांसाठी मोठी समस्या ठरते. त्यामुळे आर्थिक अडचणींचे दुष्टचक्र निर्माण होते. अवकाळी पाऊस, गारपीट आणि बदलत्या हवामानामुळे महाराष्ट्रातील शेतीसमोरील संकट अधिक गंभीर झाले आहे. एका हंगामात अनेकदा हवामानातील टोकाच्या बदलांचा फटका बसतो. कधी पेरणीनंतर पाऊस गायब होतो, तर कधी काढणीच्या वेळी अवकाळी पावसामुळे उभे पीक हातचे जाते. हवामानातील या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे विस्कळीत होते. याच पार्श्वभूमीवर महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. सरकारच्या म्हणण्यानुसार, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी कर्जमाफीचा निर्णय महत्त्वाचा ठरेल. कर्जाचा भार कमी झाल्यास शेतकरी नव्या हंगामासाठी नव्या उमेदीने शेती करू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कृषी पंपांच्या थकीत वीजदेयकांबाबत दिलासा देण्याचानिर्णयही ग्रामीण भागात महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक शेतकऱ्यांवर वर्षानुवर्षे वीजबिलांची थकबाकी जमा झाली होती. ही थकवाकी भरताना शेतीपेक्षा कर्जफेडीची चिंता अधिक भेडसावत होती. अशा परिस्थितीत वीजदेयकांबाबत सवलत किंवा दिलासा देण्याच्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळेल, अशी अपेक्षा आहे. शेतीसाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विशेषतः सिंचनावर अवलंबून असलेल्या भागात विजेशिवाय शेतीची कल्पनाही करता येत नाही. अनेक वर्षांपासून रात्रीच्या वेळी वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना मध्यरात्री शेतात जाऊन मोटार सुरू करावी लागत होती. वन्यप्राण्यांचा धोका, सर्पदंश, अपघात आणि असुरक्षितता यांचा सामना करत शेती करावी लागत होती. दिवसा वीज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांची सुरक्षितता वाढण्याबरोबरच शेतीचे नियोजन अधिक सुलभ होऊ शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने शेतकरी हिताला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्याचे सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा मिळावा, त्यांचा आर्थिक ताण कमी व्हावा आणि शेतीला नवसंजीवनी मिळावी, या उद्देशाने हे निर्णय घेण्यात आल्याचे सरकारकडून सांगितले जात आहे. कर्जमाफी हा कायमस्वरूपी उपाय नसला, तरी ती संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी नव्याने सुरुवात करण्याची संधी ठरू शकते. अनेक कुटुंबांमध्ये कर्जामुळे निर्माण झालेला मानसिक ताण कमी होण्यास त्याचा हातभार लागू शकतो. त्याचबरोबर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न हा आर्थिक शिस्तीला चालना देणारा उपक्रम म्हणून पाहिला जात आहे. महायुती सरकारची भूमिका केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नसून शेती अधिक सक्षम करण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून असल्याचा दावा सत्ताधारी पक्षाकडून केला जातो. सिंचन, पायाभूत सुविधा, शेतीसाठी ऊर्जा उपलब्धता, तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्पादनक्षमतेत वाढ या क्षेत्रांमध्येही प्रयत्न सुरू असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. आज महाराष्ट्रातील शेतकरी केवळ अनुदान किवा मदतीची अपेक्षा करत नाही. त्याला त्याच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव, स्थिर उत्पन्न, आधुनिक तंत्रज्ञान, वेळेवर वीज, सिंचन आणि नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण हवे आहे. त्यामुळे कोणतीही कर्जमाफी किंवा आर्थिक मदत ही व्यापक कृषी सुधारणा धोरणासोबत जोडली गेली तरच तिचा दीर्घकालीन परिणाम अधिक प्रभावी ठरू शकतो. बळीराजाने आपल्या श्रमाने महाराष्ट्राची अन्नसुरक्षा टिकवून ठेवली आहे. संकटे कितीही आली तरी शेतकरी पुन्हा नव्या आशेने शेतात उभा राहतो. त्यामुळे त्याला दिलेला प्रत्येक आधार हा केवळ एका व्यक्तीला दिलेला दिलासा नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेली उभारी आहे. महायुती सरकारने जाहीर केलेल्या उपाययोजनांकडे अनेक जण शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा देणारे पाऊल म्हणून पाहत आहेत. कर्जमाफी, वीजदेयकांबाबतचा दिलासा, दिवसा वीजपुरवठा आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन अशा निर्णयांचा लाभ प्रत्यक्षात किती आणि कसा मिळतो, यावर त्यांचे दीर्घकालीन यश अवलंबून असेल. मात्र संकटग्रस्त बळीराजाला आधार देण्याच्या दृष्टीने या निर्णयांमुळे आशेचा किरण निर्माण झाल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होताना दिसते. शेतकरी सक्षम झाला तरच महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. त्यामुळे तात्पुरत्या दिलासाबरोबरच दीर्घकालीन कृषी सुधारणा, बाजारपेठेतील स्थैर्य, जलव्यवस्थापन, पीकविमा, मूल्यवर्धन आणि शाश्वत शेती यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. बळीराजाच्या चेहऱ्यावर कायमस्वरूपी समाधानाचे हास्य फुलवण्यासाठी शासन, प्रशासन, बाजारपेठ आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे. आज गरज आहे ती शेतकऱ्याला तात्पुरत्या मदतीबरोबर दीर्घकालीन स्थैर्य देण्याची. संकटाच्या काळात दिलासा आणि विकासाच्या काळात संधी या दोन्ही गोष्टीचा समतोल साधला, तर बळीराजा अधिक सक्षम होईल. महायुती सरकारने जाहीर केलेल्या उपाययोजनांकडे या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल असून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर पुढील यश अवलंबून राहील.

# शेतकरी वीज बिल माफी की, 'कॉर्पोरेट्स'साठी वाट काढणारा धूर्त डाव?

**शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीज बिले माफ करताना सरकार एकाच दगडात अनेक पक्षी मारू पाहत आहे, ते कसे?**

राज्य सरकारने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीपंपांची ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीज बिलं माफ करण्याची आणि शेती क्षेत्रात ९५ हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. अर्थात, या घोषणेनंतर 'देवाभाऊ' नामाचा गजर महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर आगामी काळात अधिकच जोमाने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरवर पाहता हा निर्णय केवळ बळीराजाला दिलासा देणारा आणि तातडीचा लोकानुनयी निर्णय वाटू शकतो. परंतु, या निर्णयामागे असणारे आर्थिक आणि राजकीय पैलू केवळ तात्कालिक नसून, ते अत्यंत दूरगामी धोरणात्मक आर्थिक आणि राजकीय पुनर्रचनेचे संकेत देणारे आहेत.

**ताळेबंदाची स्वच्छता आणि आयपीओचा मार्ग**

बाजारपेठेत महावितरणचा आयपीओ आणण्याच्या हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, कोणतीही कंपनी जेव्हा शेअर बाजारात सूचिबद्ध होण्याची तयारी करत असते, तेव्हा गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी तिची खाती आणि ताळेबंद स्वच्छ असणे आवश्यक असते. महावितरणच्या पुस्तकावर वर्षानुवर्षे थकलेली शेतीची अब्जावधींची वीज बिलं ही तांत्रिकदृष्ट्या एनपीए म्हणजेच बुडीत कर्जासारखी होती. एवढी मोठी अनुत्पादक मालमत्ता पाठीवर घेऊन बाजारात उतरल्यास गुंतवणूकदारा कडून मिळणारे कंपनीचे मूल्यांकन घसरले असते. त्यामुळे, ही जुनी बिलं माफ करून सरकारने ताळेबंद स्वच्छ करण्याचा मार्ग निवडला आहे. यातून होणारा सुरुवातीचा महसुली तोटा हा एकवेळचा खर्च मानून, भविष्यातील प्रीमियम लिस्टिंग आणि भागभांडवल विक्रीतून तो भरून काढता येईल, अशी ही सरकारची आर्थिक तडजोड असू शकते.

**हिशोबापलीकडला अदृश्य नफा**

या संपूर्ण व्यवहारात सरकारला केवळ भविष्यातील भांडवली नफाच डोळ्यांसमोर ठेवावयाचा नाही, तर तात्कालिक पातळीवर मिळणारा राजकीय सदिच्छा आणि लोकानुकूलतेचा मोठा अदृश्य फायदा लाटायचा आहे. शेतीची जुनी बिलं डोक्यावर घेऊन बसलेला शेतकरी कधीही नवीन वीज जोडणी किंवा इतर सरकारी लाभांसाठी पात्र ठरत नव्हता. ही कोंडी फोडल्यामुळे ग्रामीण मतदारांमध्ये सरकारविषयी एका रात्रीत कमालीची सकारात्मक आणि अनुकूल भावना तयार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तिजोरीतून ४८ हजार कोटी सोडल्यामुळे जो तोटा आकड्यांमध्ये दिसेल, याची भरपाई मतपेढीच्या चौकटीत अदृश्य राजकीय भांडवलाच्या स्वरूपात शंभर टक्के वसूल होईल, हा हिशोबही या मागे निश्चितपणे आहे.

**राजकीय आपत्ती टाळण्याचा सुवर्णमध्य**

आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास वर्षानुवर्षे थकलेली ही बिलं वसूल करण्यासाठी वीज जोडणी तोडणे म्हणजेच पॉवर डिस्कनेक्शन हा तांत्रिक मार्ग उपलब्ध होता. मात्र, ग्रामीण जनतेची आणि शेतकऱ्यांची वीज तोडणे हे राजकीयदृष्ट्या अत्यंत आत्मघातकी आणि मोठ्या जनक्षोभाला आमंत्रण देणारे ठरले असते. सरकारने नुकतीच जी मोठी शेतकरी कर्जमाफी दिली आहे, तिचा संपूर्ण प्रभाव आणि त्यातून निर्माण झालेली राजकीय सदिच्छा या सक्तीच्या वीज तोडणीमुळे पूर्णपणे मातीत मिळाली असती. एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने तेच हिरावून घ्यायचे, असा नकारात्मक संदेश मतदारांमध्ये जाऊ नये आणि कर्जमाफीतून मिळालेला राजकीय फायदा टिकून राहावा, म्हणूनच सरकारने हा वसुलीचा कडक मार्ग नाकारून बिलमाफीचा राजकीयदृष्ट्या सुरक्षित सुवर्णमध्य निवडला आहे.



**राज्य सरकारने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीपंपांची ४८ हजार कोटी रुपयांची थकबाकी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. वरवर पाहता हा निर्णय शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा वाटत असला, तरी यामागे महावितरणचा ताळेबंद स्वच्छ करून कंपनी शेअर बाजारात सूचीबद्ध करणे आणि भविष्यातील कॉर्पोरेट वाटचालीचा रस्ता मोकळा करणे हा मोठा धोरणात्मक हेतू असण्याची शक्यता आहे.**

**भविष्यातील कर्जमाफीचा सापळा**

या धोरणाचा मूळ आर्थिक अडाखा महावितरणचे संपूर्ण ओझे झटकून टाकणे हाच दिसतो. यासाठी सरकारने एका महत्त्वाच्या धोरणात्मक प्रयोगाची अंमलबजावणी सुरू केली आहे, ज्यामध्ये महावितरणचे दोन स्वतंत्र तुकडे करण्यात आले आहेत. नफा कमावणारा औद्योगिक, व्यावसायिक आणि शहरी ग्राहक वर्ग मूळ महावितरण कंपनीकडेच ठेवण्यात आला असून तिचा आयपीओ आणला जाईल. तर दुसरीकडे, तोट्यात चालणारा शेतीचा भार पूर्णपणे वेगळा करून त्यासाठी एमएसईबी 'सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड' म्हणजेच एमएसएपीएल ही स्वतंत्र सरकारी कंपनी स्थापन करण्यात आली आहे. शेतीपंपांना स्थानिक पातळीवर सौरऊर्जेद्वारे स्वस्त वीज पुरवणे हा या नवीन कंपनीचा उद्देश असला, तरी या रचनेमुळे नफा कमावणारा विभाग आणि तोट्याचा शेती विभाग एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे झाले आहेत.

परंतु, या संपूर्ण प्रक्रियेत शेतकऱ्यांसाठी एक मोठा धोरणात्मक सापळा दडला आहे. त्यामुळे आज मिळणारी ४८ हजार कोटींची माफी ही कदाचित शेवटची बिलमाफी ठरू शकेल. एकदा का मूळ महावितरणचे कॉर्पोरेटायझेशन किंवा खाजगीकरण झाले, की भविष्यात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची वीज बिल माफी मिळणे कायदेशीर आणि व्यावहारिकदृष्ट्या अशक्य होईल. खासगी कंपन्या व्यावसायिक करारांवर आणि नफ्याच्या गणितांवर चालतात. तिथे राजकीय फायद्यासाठी कॅबिनेटचे ठराव करून बिलं माफ करता येत नाहीत.

ही जुनी थकबाकी साफ करून सरकारने खासगी पायाभूत कंपन्या किंवा विशिष्ट (अ)उद्योगसमूहांना भविष्यात गुंतवणूक करण्यासाठी संपूर्णपणे अनुकूल रान तयार करून दिले आहे, ही शंका यामुळे अधिक दृढ होते.

**स्मार्ट मीटरची कडू गोळी**

सहसा, वीज मंडळाच्या खासगीकरणाला किंवा कोणत्याही सुधारणांना अंतर्गत कर्मचारी संघटना आणि बाहेरील शेतकरी संघटना एकत्र येऊन कडाडून विरोध करतात. सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण थकबाकी माफी आणि दिवसा मोफत विजेचे आश्वासन देऊन त्यांना या विरोधाच्या समीकरणातून पूर्णपणे बाजूला केले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या संभाव्य आंदोलनापासून ग्राहक वर्ग तुटल्यामुळे सामूहिक प्रतिकाराची धार बोथट झाली आहे. या धोरणामुळे आधीच पाठींबा मिळालेला शेतकरी वर्ग शांत झाला असून, भविष्यात लागू केल्या जाणाऱ्या स्मार्ट मीटर किंवा प्रीपेड मीटरच्या कडू गोळीला होणारा विरोध आपोआप मवाळ होईल. अशा प्रकारे विभागलेल्या आणि तटस्थ झालेल्या लोकसंख्येवर आपले धोरण रेटण्याचा सरकारचा निर्धार यातून अधिक बळकट होताना दिसतो.

**राजकीय घडामोडींवर पांघरूण आणि मतदारांची सुप्त अवस्था**

या धोरणाचा राजकीय संदेश अत्यंत स्पष्ट आहे. कर्जमाफी आणि वीज बिल माफीसारखी मोठी आमिषे दाखवून ग्रामीण मतदारांना आणि शेतीवर आधारित घटकांना राजकीयदृष्ट्या शांत किंवा सुप्त ठेवण्याची ही एक खेळी असू शकते. यामुळे सरकार इतर आघाड्यांवर करत असलेल्या वादग्रस्त हालचालीवरून जनतेचे लक्ष विचलित करता येते. विरोधी पक्षांमध्ये घडवून आणलेली उभी फाटाफूट, राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटांचे स्वतःमध्ये केलेले कथित विलीनीकरण किंवा इतर विरोधी पक्षांमधील बंडखोरी यांमुळे निर्माण झालेल्या नैतिक नाराजीवर पांघरूण घालण्यासाठी या महायोजनांचा ढाल म्हणून वापर केला जात आहे, असे स्पष्ट संकेत मिळतात.

**शेतकरी सदिच्छेचा उतारा**

या रणनीतीचा आणखी एक हुशार पैलू म्हणजे वेगवेगळ्या आघाड्यांवर निर्माण झालेली नाराजी संतुलित करणे. सध्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तील छाननी आणि नावांच्या छाटणीमुळे ग्रामीण भागातील काही महिलांमध्ये व त्यांच्या कुटुंबांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मात्र, सरकारने त्याच कुटुंबातील पुरुषांना म्हणजेच शेतकऱ्यांना एकाच वेळी कर्जमाफी आणि ४८ हजार कोटींची वीज बिल माफी देऊन या कौटुंबिक नाराजीवर अत्यंत प्रभावी उतारा शोधला आहे. 'लाडकी बहीण योजने'मुळे निर्माण झालेला रोष हा या शेती आणि वीज सदिच्छेमुळे बऱ्याच अंशी मवाळ होईल, असा हा राजकीय हिशेब आहे. याशिवाय, छाननीअंती पात्र ठरलेल्या राज्यातील कोट्यवधी भगिनींना अगदी ऐन निवडणुकीच्या तोंडावर वाढीव २१०० रुपयांचा हप्ता थेट खात्यात जमा करण्याचा हुकमी एक्का सरकारकडे अद्याप शिल्लक आहेच.

थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्राच्या या राजकारण आणि अर्थकारणाची सांगड घालणारा हा एक अत्यंत धूर्त आणि सुनियोजित डाव असण्याची जास्त शक्यता आहे. काही टीकाकार याला तिजोरीची लूट म्हणून पाहत असले, तरी राजकीय पटलावर विरोधकांना आणि आंदोलकांना निरुत्तर करणे, 'लाडक्या बहिणीं'च्या छाटणीची नाराजी शेतकरी सदिच्छेच्या बळावर भरून काढणे आणि शेतीचा तोटा वेगळा करून महावितरणच्या भविष्यातील पूर्ण कॉर्पोरेट वाटचालीचा रस्ता साफ करणे, अशी बहुआयामी साध्यता या धोरणातून स्पष्टपणे डोकावत आहे.

**ललित अंबळकार**

# अभिषेक बॅनर्जी हेच टार्गेट

तृणमूल काँग्रेसचे नेते मदन मित्रा यांनी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाची साथ सोडून ऋतव्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश केला आहे.नगरपालिका भरती घोटाळा प्रकरणी मदन मित्रा यांची पत्नी आणि त्यांचे दोन मुलगे यांना इडीने समन्स बजावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मदन मित्रा यांनी ममतांची साथ सोडल्याने त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मदन मित्रा हे ममतांचे एकदम निकटचे सहकारी समजले जात असत.ऋतव्रत बॅनर्जी यांनी ६० आमदारांना आपल्या बरोबर घेऊन तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पाडल्यानंतर जे मोजके नेते ममता यांच्या बरोबर राहिले होते,त्यामध्ये मदन मित्रा यांचा प्रामुख्याने समावेश होता.

ते ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाची भूमिका प्रभावीपणे मांडत होते. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचा मे महिन्यात झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर,त्यांच्या काही सहकाऱ्यांना जनक्षोभाचा सामना करावा लागला होता.मदन मित्रा यांनाही त्याची झळ पोहोचली होती.मदन मित्रा यांनी ममतांची साथ सोडल्यानंतर पक्षातील सर्व पदांचा त्यांनी राजीनामा दिला आहे.विधानसभेतील मुख्य प्रतोद पदाचा ही त्यांनी राजीनामा दिला आहे.



आपण फक्त आपली खोली बदलली आहे घर बदललेले नाहीअशी मखलाशी त्यांनी आपल्या राजीनाम्याबाबत केली आहे.मदन मित्रा हे ममतांचे अतिशय जुने सहकारी होते.१९९८ साली ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन तृणमूल काँग्रेसची स्थापना केली.तेंव्हा मदन मित्रा हे ममतांच्या पक्षात सामील झाले होते.ममता बॅनर्जी यांनी मदन मित्रा यांची पक्षाच्या सरचिटणीसपदी नियुक्ती केली होती.२०११ साली झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने सत्ताधारी डाव्या आघाडीचा पराभव करून तेथील सत्ता काबीज केली.त्या निवडणुकीत मदन मित्रा हे कमरहाटी मतदारसंघातून निवडून आले होते.नंतर ममता बॅनर्जी यांनी त्यांची आपल्या मंत्रिमंडळात वर्णी लावली होती.

मात्र नोव्हेंबर २०१५ मध्ये शारदा चीट फंड घोटाळ्यात आरोपी म्हणून मदन मित्रा यांचे नाव आल्यानंतर त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिला होता.शारदा चीट फंड घोटाळा प्रकरणी सीबीआयने नंतर त्यांना अटक केली होती.त्यानंतर ते बरेच दिवस तुरुंगात होते.सप्टेंबर २०१६ मध्ये त्यांना जामीन मंजूर झाला होता.नारदा स्टिंग ऑपरेशन संदर्भात मित्रा यांची सप्टेंबर २०१७ मध्ये इडी कडून चौकशी करण्यात आली होती.मे २०२१ मध्ये नारदा स्टिंग ऑपरेशन संदर्भात मित्रा यांना सीबीआयने अटक केली होती.मात्र थोड्याच दिवसांत त्यांना जामीन मंजूर झाला होता.

ममतांची साथ सोडल्यानंतर मदन मित्रा यांनी ममतांचे भाचे आणि तृणमूल काँग्रेसचे दोन नंबरचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्यावर सडकून टीका केली आहे.मदन मित्रा यांनी असे म्हटले आहे की,मी अभिषेक बॅनर्जी यांना असे सुचवले होते की त्यांनी सहा महिने किंवा वर्षभरासाठी पक्षातून बाजूला व्हावे.पक्ष बांधणीसाठी आम्हाला थोडा वेळ द्यावा नंतर ते पक्षात परत येऊ शकतात आणि आपले पद ग्रहण करू शकतात.परंतु अभिषेक बॅनर्जी यांनी त्या गोष्टीला नकार दिला.ते म्हणाले मी पक्ष सोडणार नाही.

मदन मित्रा यांनी अशी खंत व्यक्त केली की पक्षाची बोट बुडत आहे.लोक मरत आहेत.(पक्ष सोडून जात आहेत) परंतु पक्षाने असे ठरवलेले दिसत आहे की इतर कुणीही मेले तरी चालेल (पक्ष सोडून गेले तरी चालेल) पण अभिषेक यांना वाचवावेच लागेल.मदन मित्रा यांनी ममतांची साथ सोडणे हा ममतांसाठी मोठा धक्का आहेच शिवाय त्यामुळे ऋतव्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाची ताकद आणखी वाढली आहे. त्यांच्या गटाने पक्षाचे चिन्ह आणि नाव यांवर दावा केला असून समांतर पक्ष संघटना उभी केली आहे.तसेच पक्षाच्या मुख्यालयावरही ऋतव्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाने दावा केला आहे. या अगोदर ममतांचे अतिशय निकटचे सहकारी आणि कोलकात्याचे माजी महापौर फिरहाद हकीम व सायोनी घोष यांनी ममतांची साथ सोडून ऋतव्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश केला आहे.

लोकसभेतील ममतांच्या २९ पैकी २० खासदारांनी काकोळी घोष यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल सिटीझन्स पार्टी ऑफ इंडिया या पक्षात प्रवेश केला असून राज्यसभेतील तीन खासदारांनीही ममतांची साथ सोडली आहे.तृणमूल काँग्रेसच्या या दारुण अवस्थेला,त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी हेच मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत.तरी सुद्धा ममतांनी त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही.मदन मित्रा यांनी म्हटले आहे की अभिषेक बॅनर्जी हे इडीपेक्षाही धोकादायक आहेत.ते ममता बॅनर्जी यांचेही ऐकत नाहीत.मदन मित्रा हे ममतांच्या आतल्या गोटातील एक महत्त्वाचे नेते होते.त्यामुळे अभिषेक बॅनर्जी यांच्या बाबत त्यांनी जे मत व्यक्त केले आहे,त्यावर विश्वास ठेवण्यास कोणतीही हरकत नसावी.

**अभय गोखले**

# पुन्हा माणुसकी टांगणीला!

वर्धा जिल्ह्यातून एक मन हेलावून टाकणारी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारी घटना समोर आली आहे. सावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात १२ वर्षीय अल्पवयीन मुलीची अत्यंत अमानुषपणे दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. पीडितेचा मृतदेह निर्जन स्थळी विवस्त्र अवस्थेत आढळून आल्याने, नराधमाने तिच्यावर पाशवी अत्याचार करून ओळख पटू नये म्हणून तिची हत्या केल्याचा प्राथमिक संशय आहे. या क्रूर घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून वर्धा जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच आजूबाजूच्या ३ ते ४ गावांतील शेकडो नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. आपल्या पोटच्या गोळ्याची झालेली अवस्था पाहून आई-वडिलांनी केलेला आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता.नराधमांना तात्काळ फाशी द्या अशी जनतेतून तीव्र मागणी होत आहे. 'राज्यात अल्पवयीन मुली सुरक्षित कधी होणार?' असा संतप्त सवाल आता महिला आणि स्थानिक नागरिकांमधून विचारला जात आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि आरोपीला कठोरात कठोर म्हणजेच तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी पुकारण्यात येणाऱ्या आंदोलनांची शक्यता पाहता प्रशासन सतर्क झाले आहे.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा
९५६१५९४३०६

शनिवार, दि. १८ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# 16 घरफोड्यांचा पर्दाफाश, एलसीबीच्या जाळ्यात सराईत चोर गजाआड..!

## तब्बल १५.६८ लाखांचे दागिने हस्तगत, दोन आरोपी अटकेत, घरफोडीचे साहित्य व रोकडही जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** यवतमाळ जिल्ह्यात वाढत्या घरफोड्यांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत १६ गंभीर गुन्ह्यांचा छडा लावला आहे. बाभुळगाव–करळगाव घाट परिसरात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी १५ घरफोडी आणि एका जबरी चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा केला.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार एलसीबीचे पथक गस्त घालत असताना विनाक्रमांकाच्या मोटारसायकलवरून येणाऱ्या दोन संशयितांना अडविण्यात आले. चौकशीत त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांच्या बॅगेची झडती घेण्यात आली. त्यामध्ये सुमारे १०८.६१ ग्रॅम सोन्याचे दागिने, २३४ ग्रॅम चांदीचे दागिने, ८९ हजार ३०० रुपयांची रोकड तसेच घरफोडीसाठी वापरण्यात येणारे पेचकस, लोखंडी हुक, टॉर्च आदी साहित्य आढळले. पोलिसांनी ७ लाख ७८ हजार ७५७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आजच्या बाजारभावानुसार त्याची किंमत सुमारे १५ लाख ६८ हजार ७१० रुपये इतकी आहे. अटकेत असलेल्या सागर उर्फ राजरतन पवार (रा. चांदूर रेल्वे) व विजयसिंग मानसिंग पवार (रा. तरोडा) यांनी यवतमाळ, बाभुळगाव, दारव्हा, दिग्रस आणि आर्णी परिसरातील घरफोड्यांची कबुली दिली. या कारवाईमुळे यवतमाळ शहर, अवधूतवाडी, लोहारा, बाभुळगाव, दारव्हा, आर्णी व दिग्रस पोलीस ठाण्यांतील एकूण १६ गुन्ह्यांचा उलगडा झाला. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# "हे सरकार सर्वसामान्यांचे नव्हे, धनदांडग्यांचे" – प्रा. वसंतराव पुरके

## काँग्रेसचे राळेगावात सरकारविरोधी धरणे आंदोलन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. १७ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी (दि. १७) तहसील कार्यालयासमोर विविध जनहिताच्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत, "हे सरकार सर्वसामान्यांच्या हितासाठी नसून धनदांडग्यांच्या फायद्यासाठी काम करत आहे," असा आरोप केला. अयोध्या येथील राम मंदिरातील चोरीच्या घटनेचा निषेध करत त्यांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. तसेच सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा, दुबार पेरणीसाठी तातडीची आर्थिक मदत आणि स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती त्वरित थांबविण्याची मागणी केली. आंदोलनात सागर वनस्कर, डॉ.नरेंद्र इंगोले, महादेव मेश्राम, मारोतराव पडाळ, अंकुश रोहणकर, अरविंद वाढोणकर, ॲड. सीमा तेलंगे आदींनीही सरकारच्या धोरणांवर टीका केली. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. प्रफुल्ल मानकर यांनी शेतकरी, बेरोजगारी आणि महागाईसह विविध प्रश्नांवर सरकारचा समाचार घेतला. यानंतर शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देत जनतेच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याची विनंती केली. या आंदोलनात तालुकाध्यक्ष राजेंद्र तेलंगे, मिलिंद इंगोले, प्रदीप ठुणे, स्वाती मेश्राम, धवल घुंगरूड यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व युवक आघाडीचे प्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप ठुणे यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र तेलंगे यांनी केले. आंदोलनादरम्यान उपस्थितांमध्ये सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे चित्र दिसून आले.

# ईजनी येथे आरोग्य सुविधांचा अभाव! गावात डॉक्टरची मागणी

## ईजनी गावात डॉक्टर नसल्याने, आरोग्य सुविधांचा अभाव ईजनिकरांचे होते आहेत हाल, ईजनी गावाला तातडीने डॉक्टर द्या ग्रामस्थांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे




**महागाव, दि. १७ :** तालुक्यातील मौजे ईजनी गावाची लोकसंख्या ३००० च्या आसपास आहे. परंतु या गावात शासकीय डॉक्टर उपलब्ध नसल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. गावात पूर्वी एक बंगाली डॉक्टर होता. त्याच्या जाण्याने आरोग्य सुविधा पूर्णपणे बंद झाली आहे. रात्री-बेरात्री पेशंट आजारी पडल्यास त्याला उपचारासाठी पुसद किंवा माहूरला न्यावे लागते. वेळेवर उपचार न मिळाल्याने जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

सध्या पावसाळा सुरू असल्याने सर्दी, ताप, पोटदुखी, हात-पाय दुखणे असे आजार वाढले आहेत. गावाजवळील हिवरा येथील खासगी डॉक्टर एका पेशंटकडून ८०० ते १००० रुपये फी घेतो. गोर-गरीब मजूर वर्गाला ही फी परवडत नाही. शिवाय खासगी डॉक्टर रात्री ९ नंतर उपलब्धही नसतो. या सर्व समस्या पाहता ईजनी ग्रामस्थांनी तालुका आरोग्य अधिकारी, महागाव यांना निवेदन देऊन गावात स्वतंत्र डॉक्टर व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याची मागणी केली आहे. १५ दिवसात मागणी पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# राष्ट्रसंतांच्या चरण पादुका २१ जुलैला पुसदमध्ये, पालखीचे होणार भव्य स्वागत

## गुरुदेव सेवा मंडळाची जय्यत तयारी दर्शन, महाप्रसादासाठी भाविकांना आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १७ :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त मानवतेचे महान पुजारी, ग्रामगीताचे निर्माते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरण पादुकांची पंढरपूर प्रचार पालखी सोमवार, २१ जुलै रोजी सकाळी १० वाजता पुसद शहरात दाखल होत आहे. या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी गुरुदेव सेवा मंडळ, पुसद तालुका शाखा आणि सर्व गुरुदेव अनुयायांनी जय्यत तयारी केली असून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज आश्रम, मोझरी येथून निघालेली ही प्रचार पालखी केंद्रीय प्रचार विभागाचे प्रचार प्रमुख तथा पालखी संयोजक गोपाल कडू आणि सचिव तथा पालखी व्यवस्थापक डॉ. ज्ञानेश्वर मुडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत आहे. पालखीसोबत भजन, ध्यान, प्रार्थना, कीर्तन, प्रवचन आणि वाङ्मय प्रचाराच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सेवा, समता, ग्रामविकास आणि मानवतेचे विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा संदेश दिला जाणार आहे. पुसद शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही पालखीचे स्वागत, दर्शन, मार्गदर्शन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्थानिक विरंगुळा केंद्र सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या स्वागत समारंभाला राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि नगराध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या पवित्र सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी पुसद शहर व तालुक्यातील सर्व गुरुदेव अनुयायी, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गुरुदेव सेवा मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा. प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा. नंदकुमार खैरे, सचिव ॲड. गजानन साखरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, प्रचार प्रमुख राजेंद्र काळबांडे यांच्यासह पदाधिकारी व महिला प्रतिनिधींनी केले आहे.

# SIR कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही..!

## १००% काम पूर्ण करणाऱ्या बीएलओंचा जिल्हाधिकाऱ्यांकडून गौरव



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १७ :** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR) अभियानातील कामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा येथे आर्णी विधानसभा मतदारसंघातील आर्णी, केळापूर व घाटंजी तालुक्यांच्या कामाचा आढावा घेतला. विहित मुदतीत १०० टक्के काम पूर्ण करणाऱ्या बीएलओ शिक्षक व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

तर प्रलंबित काम असलेल्या बीएलओंना २० ते २१ जुलैपर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. २९ जुलैनंतरही काम अपूर्ण राहिल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. बैठकीत सहाय्यक व अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना SIR अभियान वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीस सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे यांच्यासह संबंधित तालुक्यांचे तहसीलदार व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# नेर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा..!

## निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकरी दुहेरी संकटात – सुनील खाडे"



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**नेर, दि. १७ :** उशिरा झालेला पाऊस, निकृष्ट सोयाबीन बियाणे आणि त्यानंतर झालेली पावसाची दांडी यामुळे नेर तालुक्यातील शेतकरी अभूतपूर्व संकटात सापडला असून तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केली आहे.

तालुकाध्यक्ष सुनील खाडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार भुसारी यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निकृष्ट बियाण्यांमुळे हजारो शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली, मात्र त्यानंतरही पाऊस न झाल्याने सोयाबीन, कापूस व तूर पिके करपू लागली आहेत. शेतकऱ्यांनी कर्ज काढून व दागिने गहाण ठेवून पेरणी केली असून आता उपासमारीची वेळ आली असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला. निकृष्ट बियाणे पुरविणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनावेळी विराज घुईखेडकर, मनोहराव देशमुख, युवराज पाटील, अरुणराव खडसे, हरेश्वर कनसे, निलेश ठाकरे, संजय पवार, प्रविण वाघजळे, विकी कुबडे, अमोल खांदे, अमन चौधरी आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त कायद्याविषयी जनजागृती..!

## न्याय सर्वांसाठी पोहोचविण्याचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १७ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ आणि स्वातंत्र्यसैनिक जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (१७ जुलै) आंतरराष्ट्रीय न्याय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कायदेविषयक जनजागृती शिबिरातून "न्याय हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असून तो सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे" हा ठाम संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) दीपक एच. दाभाडे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेश मुनोत होते. प्रमुख वक्ते डॉ. संदीप नगराळे यांनी १७ जुलैच्या आंतरराष्ट्रीय न्याय दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना रोम विधान आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या स्थापनेची माहिती दिली. दीपक दाभाडे यांनी युद्धगुन्हे, नरसंहार आणि मानवतेविरोधी गुन्ह्यांवर आंतरराष्ट्रीय स्तरावर कारवाई करण्यासाठी न्यायव्यवस्था सक्षम असणे आवश्यक असल्याचे सांगितले. कायद्याचे पालन, नागरिकांची कर्तव्ये आणि तरुणांमध्ये कायदेशीर जागरूकता वाढविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. मुनोत यांनी विधी सेवा प्राधिकरणामार्फत कलम ३९-अ अंतर्गत उपलब्ध मोफत विधी सहाय्याची माहिती देत, आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे कोणालाही न्यायापासून वंचित राहू दिले जाणार नाही, असा संविधानाचा मूलभूत दृष्टिकोन असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी आणि पॅरा विधी स्वयंसेवकांची मोठी उपस्थिती होती.

# अयोध्या राममंदिर देणगीप्रकरणी चौकशीची मागणी..!

## घाटंजी काँग्रेसचा 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. १७ :** अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या दानपेटी व देणगी निधीतील कथित गैरव्यवहार व चोरीप्रकरणी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार घाटंजी तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने राम मंदिर चौक येथे श्रीराम मंदिरासमोर 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी "रघुपती राघव राजाराम" हे भजन सामूहिकरीत्या गाऊन शांततापूर्ण सत्याग्रह केला. यावेळी मंदिरातील देणगी व्यवस्थेतील कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, तसेच भक्तांच्या श्रद्धेशी संबंधित निधीच्या व्यवहारात पूर्ण पारदर्शकता राखावी, अशी मागणी करण्यात आली. या संदर्भात घाटंजी पोलीस ठाण्यात निवेदनही सादर करण्यात आले. आंदोलनात तालुका काँग्रेस अध्यक्ष रुपेश कल्यमवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष माणिकराव मेश्राम, नगर परिषदेच्या गटनेत्या संगीता भुरे, नगरसेविका पंकजा कहाळे, किशोर दावडा, वासुदेवराव महल्ले, डॉ.प्रीती सिडाम यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. आंदोलनादरम्यान मंदिरातील देणगी व्यवस्थेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींना शिक्षा व्हावी, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी मांडली.

# शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांना गती..!

## प्रकाश पाटील देवसरकर यांची उमरखेड-महागाव सह-अध्यक्षपदी नियुक्ती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

> **"मुख्यमंत्री बळीराजा शेत–पाणंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. पुढील चार वर्षांत उमरखेड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित पाणंद रस्त्यांची कामे पूर्ण करण्यावर माझा भर राहील," असे सह-अध्यक्ष प्रकाश पाटील देवसरकर यांनी सांगितले.**

**उमरखेड, दि. १७ :** माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर यांची मुख्यमंत्री बळीराजा शेत,पाणंद रस्ते योजनेच्या उमरखेड–महागाव विधानसभा क्षेत्राच्या सह-अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १५ जुलै रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय सह-अध्यक्षांची घोषणा केली असून त्यामध्ये देवसरकर यांच्या नावाचा समावेश आहे.

१४ डिसेंबर २०२५ रोजी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत–पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा स्तरावरील समित्यांमध्ये सह-अध्यक्ष नियुक्त करण्याचा अधिकार महसूल मंत्र्यांना देण्यात आला होता. त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकरी प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडणारे देवसरकर यांनी आमदार, सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तसेच सहकारी बँकेचे संचालक अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ योजनेच्या अंमलबजावणीत होईल, असा विश्वास व्यक्त होत असून शेतकरी वर्गातून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत करण्यात येत आहे. आपल्या नियुक्तीचे श्रेय देवसरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा आणि आमदार किसनराव वानखेडे यांना दिले.

# खाऊच्या पैशातून सर्वम बोरेलेचा आदर्श वाढदिवस..!

## १५० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १७ :** वाढदिवस साजरा करण्याची वेगळी सामाजिक परंपरा जपत चि.सर्वम रजनीकांत बोरेले यांनी आपल्या खाऊच्या पैशातून नगर परिषद दीनदयाल उपाध्याय मराठी शाळा क्र. २, आठवडी बाजार येथे १५० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच वाटप करून वाढदिवस साजरा केला. इयत्ता पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांना वह्या, लेखनसाहित्य आदींचे संच देण्यात आले.

यानंतर उपस्थित विद्यार्थी, पालक व नागरिकांसाठी फ्रेंच फ्राईज, व्हेज मंचुरियन, नूडल्स, केक व आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. सर्वम हा सामाजिक कार्यकर्ते व जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा मुलगा असून, बोरेले कुटुंब गेल्या १८ वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्कूल बॅग, लंच बॉक्स तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे मदत करत आहे. कार्यक्रमात सौ. नीताताई बोरेले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक दिनेश सातुरवार यांनी बोरेले कुटुंबाच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून आभार मानले. यावेळी शिक्षक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळकरी मुलीचा विनयभंग; दोघांना बेड्या

**उमरखेड, दि. १७ :** शाळेत ये-जा करणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा सतत पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी पोफाळी पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. अटक केलेल्यांमध्ये २२ वर्षीय तरुणासह एका १७ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. १० वीत शिकणाऱ्या या विद्यार्थिनीला गेल्या आठ दिवसांपासून आरोपी त्रास देत होते. १६ जुलै रोजी शाळा सुटल्यावर आरोपींनी बौद्ध विहाराच्या मागे तिचा रस्ता अडवून तिला प्रपोज करण्याचा धक्कादायक प्रकार केला. घाबरलेल्या पीडितेने घरी सांगताच पालकांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता व पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवून दोन्ही आरोपींना अटक केली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**महाराष्ट्र शासन**

**तहसीलदार यांचे कार्यालय, घाटंजी, ता. घाटंजी जि. यवतमाळ**

इ-मेल - tahsildarghatanji@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०७२३० २९९३२६

क्रमांक/स.म.अ./प्रस्तु-१/जन्ममृत्यु नोंदणी/कावि/३२७/२०२६

दि.१३/०७/२०२६

**जाहीर प्रगटन**

वाचा : सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे शासन निर्णय क्रमांक/जमूनों २०२५/ (ई. ऑ.९९११८१) / प्र.क्र.२२/कु.क., दि. १२ मार्च, २०२५

गणेश मारोती गिनगुले मु. कोळी (खु.) पो. पार्टी न. यांचा जन्म दि. २७/०७/१९९३ रोजी मौजा कोळी (खु.) येथे झालेला असून ग्रामपंचायत कार्यालय, कोळी खु., ता. घाटंजी, जि. यवतमाळ येथील जन्म व मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद झालेली नसल्यामुळे जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारणा अधिनियम - २०२३ अंतर्गत गणेश मारोती गिनगुले यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, कोळी (खु.) ता. घाटंजी येथे जन्म व मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये नोंदवून जन्माचा दाखला देण्याचा आदेश मिळणेबाबत अर्जदार गणेश मारोती गिनगुले मु. कोळी (खु.) पो. पार्डी न. ता. घाटंजी जि. यवतमाळ यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तरी सदर प्रकरणी कोणाचा आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी १५ दिवसाचे आत निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी ग्रामपंचायत, कोळी (खु.) तसेच ग्राम महसुल अधिकारी, कोळी (खु.) यांचेकडे लेखी स्वरुपात पुराव्यासह आक्षेप सादर करावे. नंतर आलेल्या आक्षेपांचा / हरकतींचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(विजय साळवे)
तहसीलदार घाटंजी

# ‘कर्जमाफीसाठी बाप ,अत्याचाराविरोधात आई आणि पेपरफुटीविरोधात मुलांना रस्त्यावर उतरवले’

**गोविंद पोलाड यांनी आंदोलनादरम्यान केली राज्य व केंद्र सरकारवर टीका, ‘शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, दादा भुसे इस्तीफा दो’च्या घोषणांनी तहसील परिसर दणाणला; युवक - युवतींचा उत्स्फूर्त सहभाग**

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आधी कर्जमाफीसाठी आमच्या बापांना आंदोलन करायला लावले. त्यानंतर महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमुळे आईंना न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागले. आणि आता पेपरफुटी घोटाळ्यांमुळे विद्यार्थ्यांनाही आंदोलन करावे लागत आहे. म्हणजे राज्यातील प्रत्येक घटकाला सरकारने आंदोलनासाठी भाग पाडले आहे असे मत प्रसिद्ध विद्रोही कवी व व्याख्याते बेधुंदकार गोविंद पोलाड यांनी व्यक्त केले.

परीक्षांमधील कथित पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टी व विद्यार्थी कृती समिती, चांदूर रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयासमोर भव्य शांतिपूर्ण आंदोलन करण्यात आले, यावेळी गोविंद पोलाड बोलत होते.‘शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, दादा भुसे इस्तीफा दो... इस्तीफा दो...’,‘पेपरफुटी बंद करा’,‘विद्यार्थ्यांना न्याय द्या’ अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण तहसील परिसर दणाणून गेला. विशेष म्हणजे, चांदूर रेल्वे शहरात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने युवक-युवती शैक्षणिक प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.



स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करतात. अनेक जण शेकडो किलोमीटर प्रवास करून परीक्षा केंद्रावर पोहोचतात. खर्च परवडत नसल्याने काही विद्यार्थी रेल्वे स्टेशन, बसस्थानके किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी रात्र काढतात. मात्र परीक्षा केंद्रावर पोहोचण्यापूर्वीच पेपरफुटी झाल्याची बातमी समजते आणि त्यांच्या महिनोन्महिन्यांच्या मेहनतीवर पाणी फिरते. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी असा खेळ कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही असा इशाराही गोविंद पोलाड यांनी दिला. आंदोलनाला भारतीय कम्युनिस्ट पार्टी, आम आदमी पार्टी, जनता दल (सेक्युलर), माजी आमदार डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच, स्वाभिमानी शेतकरी संघटना तसेच शिवसेना (ठाकरे गट) यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी नीट, सीबीएसई, टीईटीसह सर्व स्पर्धा परीक्षांतील कथित पेपरफुटीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा करावा, एमपीएससीसह सर्व परीक्षा पारदर्शक व ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, परीक्षा शुल्क कमी करावे, सरकारी शाळांचा दर्जा उंचावावा, शिक्षणाचे खासगीकरण रोखावे, भरती व स्पर्धा परीक्षांचे वार्षिक कॅलेंडर जाहीर करावे, निकाल वेळेत लावावेत, पेपरफुटीसाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करून संबंधित मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, शिष्यवृत्ती योजनांमध्ये भेदभाव होऊ नये, पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, भविष्यात पेपरफुटी झाल्यास विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई द्यावी, ७२ तासांत पुनर्परीक्षा घ्यावी तसेच पोलीस भरती २०२६ तातडीने जाहीर करून वयोमर्यादेत वाढ करावी अशा विविध मागण्या केल्या.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रफुल्ल इंगळे, प्रतिक्षा ढोके, नितीन गवळी, मंगेश डाफ, सागर गावंडे, प्रा. प्रसेनजित तेलंग, सागर दुर्योधन, भूषण नाचवणकर, अॅड. शिवाजी देशमुख, विनोद जोशी, गणेश होले, निळकंठ दिघडे, भिमराव बेराड, प्रभाकर भगत, संजय डगवार, बंडू यादव, गजानन यादव, प्रशांत शिरभाते, दिनेश आमले, रवि मलवार, अंकुश घोडे, शितल मासोदकर, तन्मय पुनसे, पंकज घोरफळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आपली भूमिका मांडत आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्निल डोळस, सूत्रसंचालन हार्दिक सोनोने तर आभार प्रदर्शन लौकीक डोंगरे यांनी केले. आंदोलन यशस्वी करण्यासाठी सागर तंबाखे, मयूर सवाई, आशिष सोनोने, राम जोशी, अनिकेत मोखले, आर्यन मोटघरे, अक्षय स्थूल, जीवन दुर्योधन, अनिकेत हरणे, सुबोध रामटेके, रोहन गजभिये यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. आंदोलनानंतर प्रतिनिधी मंडळाने उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. निवेदन स्वीकारल्यानंतरही घोषणाबाजी सुरूच राहिली आणि संपूर्ण तहसील परिसर विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या मागण्यांनी दणाणून गेला.

०००

*‘करिअर कट्टा’ उपक्रमांतर्गत*

## विद्यार्थी करिअर संसदेची स्थापना

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘करिअर कट्टा’ उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त विद्यार्थी करिअर संसद २०२६-२७ ची स्थापना, शपथविधी सोहळा व मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण, प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन व महाराष्ट्र गीताने झाली. अध्यक्ष व उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुरेश रा. मस्के उपस्थित होते. यावेळी प्रा. एस. ए. वाणी, प्रा. डॉ. ममता पळसपगार, विद्यार्थी प्रतिनिधी सानिया शेख उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविकात प्रा. डॉ. ममता पळसपगार यांनी करिअर संसदेची उद्दिष्टे स्पष्ट केली. त्यानंतर प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर यांनी विद्यार्थी करिअर संसद २०२६-२७ ची स्थापना जाहीर केली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र व करिअर डायरी प्रदान करण्यात आली.प्रा. एस. ए. वाणी यांनी शपथविधीचे वाचन केले. प्रमुख मार्गदर्शक सुरेश रा. मस्के यांनी संविधानिक मूल्ये, शिस्त, नेतृत्व, सामाजिक उत्तरदायित्व व राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.



## अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी पित्याला जन्मठेप

### अमरावती न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**अमरावती/ का.प्र.**

अल्पवयीन दोन मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या अत्यंत गंभीर प्रकरणात अमरावती येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी पित्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. पोक्सो कायद्यातील कठोर तरतुदींनुसार दिलेला हा महत्त्वपूर्ण निर्णय गुरुवारी (१६ जुलै) जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्रमांक २) वाय. ए. गोस्वामी यांनी दिला. न्यायालयाने आरोपीला दंडाची शिक्षाही सुनावली असून पीडित मुलींना नुकसानभरपाई मिळण्या साठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला आवश्यक निर्देश दिले आहेत.

नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात १० मार्च २०२३ रोजी दाखल झालेल्या गुन्हामध्ये हा निर्णय देण्यात आला.न्यायालयाच्या आदेशानुसार,पीडित मुलींची ओळख उघड होऊ नये म्हणून आरोपीचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. आरोपी हा फिर्यादीचा पती आणि पीडित मुलींचा पिता असल्याने त्याची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे. सरकार पक्षाने न्यायालयात मांडलेल्या प्रकरणा नुसार, फिर्यादीचा विवाह २००७ मध्ये झाला होता.कौटुंबिक वादामुळे २०१५ पासून दोघे विभक्त राहत होते. त्यांना तीन मुली असून त्यापैकी दोन अल्पवयीन मुली आरोपीकडे राहत होत्या. आरोपी विविध ठिकाणी कामासाठी राहत असताना अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात वास्तव्यास असताना त्याने एका अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप होता. दुसऱ्या मुलीला बांधून ठेवणे, रक्ताचे डाग असलेले कपडे जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणे, आई आणि मोठ्या बहिणीला ठार मारण्याची धमकी दिल्याचेही तपासात समोर आले. चाइल्डलाईनच्या मदतीने तक्रार दाखल करण्यात आली. प्रारंभी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली होती. मात्र, घटना नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने प्रकरण तेथे वर्ग करण्यात आले. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक सखाराम पाटील यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने एकूण १२ साक्षीदार तपासले. त्यामध्ये दोन्ही पीडित मुली, वैद्यकीय अधिकारी तसेच वय निश्चितीशी संबंधित तांत्रिक पुरावे महत्त्वाचे ठरले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला पोक्सो कायद्याच्या कलम ६ अंतर्गत दोषी ठरवत उर्वरित नैसर्गिक आयुष्यभर जन्मठेप आणि १० हजार रुपयांचा दंड सुनावला. तसेच भारतीय न्याय संहितेपूर्वी लागू असलेल्या भारतीय दंड संहितेच्या कलम २०१ अंतर्गत पुरावे नष्ट केल्याप्रकरणी तीन वर्षे सक्तमजुरी आणि दोन हजार रुपयांचा दंड ठोठावला. पोक्सो कायद्याच्या कलम ४२ नुसार अधिक कठोर शिक्षेची तरतूद असल्याने त्याच कायद्याअंतर्गत शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणात सरकारतर्फे जिल्हा शासकीय अभियोक्ता अॅड. परीक्षित गणोरकर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

त्यांना कोर्ट पैरवी अधिकारी एएसआय कनोजिया आणि पो. हे. कॉ. हटवार यांनी सहकार्य केले. न्यायालयाने या निर्णयाद्वारे अल्पवयीनांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांबाबत कठोर भूमिका स्पष्ट करत पीडित मुलींना न्याय मिळवून देण्याबरोबरच त्यांना योग्य नुकसानभरपाई देण्यासाठीही जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

# संक्षिप्त

## अवधुत मंदीर येथे नवीन झेंडयाचा जिर्णोध्दार

**कुऱ्हा**- मोझरी (गुरुकुंज) येथील अवधुत मंदीरामध्ये २९ फुट उंचीचा नवीन झेंड जोड बसविण्याचा आनंदमय सोहळा अवधुत भजनाने पार पडला.मंदीराकरिता नवीन झेंड्याकरिता सागाचे दोन झाडे मुर्तिजापूर (तरोडा) ता.तिवसा येथील दानशूर राजुभाऊ वेरूळकर त्यांच्या शेतामधून मंदीराला दान करण्यांत आले.याप्रसंगी राजुभाऊ वेरुळकर यांचा अवधुत मंदीर संस्थानच्या वतीने मोझरीचे घनश्याम काडंलकर गुरूजी यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.सुधीर बोके यांचा सत्कार रमेश गुरुजी काडंलकर यांचे हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाला कुऱ्हा येथील अवधुत मंडळाचे शिशुपाल इखार यांचा संच वाठोडा खुर्द येथील हरिभाऊ खारकर यांचा संच व मोझरी अवधुत भजन मंडळांचा सहभाग होता.यावेळी साहेबराव तडस, अरविंद काडंलकर, आशीष कांडलकर, तसेच अवधुत मंदीराचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि समस्त गावकरी यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.



## प्रशिक्षण व मार्गदर्शन मेळावा मंगळवारी

**अमरावती** - राज्यातील सेवानिवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या पेन्शनशी संबंधित विविध सेवा अधिक सुलभ, जलद आणि घरबसल्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या वतीने ‘Maha-UPLABDHI’ हे अद्ययावत मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. या नवीन ॲपची सविस्तर माहिती पोहोचवण्यासाठी आणि पेन्शनधारकांना या तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षित करण्यासाठी अमरावती जिल्हा कोषागार कार्यालयांतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा माहिती व प्रशिक्षण मेळावा मंगळवार २१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.ॲपच्या सुविधेमुळे आता पेन्शनधारकांना विविध कामांसाठी कोषागार कार्यालयात जाण्याची आवश्यकता भासणार नाही. तरी अमरावती कोषागार अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवानिवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या विशेष सत्राला विहित वेळेत उपस्थित राहून डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाचे वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांचे सरल संस्कृत परीक्षेत घवघवीत यश

**अमरावती** - पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरल संस्कृत परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत उत्कर्षा सुधीर लाडझरे हिने प्रथम क्रमांक मिळविला, तर आनंदी संतोष जवंजाळ हिने विशेष प्राविण्य प्राप्त केले.याशिवाय उत्कृष्ट कामगिरीबद्दल शौर्य ठाकूर, विहान बारबुद्धे, कबीर वानखडे, विहान दुर्गे, श्रीतेज मालगे, शिवांश खंडेलवाल, सोहम बागल, आराध्या भुजाडे, शुभ्रा देवळे, रिया भाकरे, भूमी बंग संचिता मात्रे, संस्कार धनाडे, कस्तुरी देशपांडे आणि ओवी मळसने या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद तसेच संस्थेच्या व्यवस्थापनाने अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



## २४ जुलै रोजी ‘पेन्शन अदालत’

**अमरावती** - प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग यांच्या वतीने टपाल विभागाच्या सेवानिवृत्ती वेतनधारक आणि कुटुंब सेवानिवृत्ती वेतनधारकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विशेष ‘डाक पेन्शन अदालत’ चे आयोजन करण्यात आले आहे. ही पेन्शन अदालत अमरावती येथील प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.पेन्शन अदालतमध्ये टपाल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाशी संबंधित तक्रारींचा विचार केला जाईल, ज्यांची महाराष्ट्र आणि गोवा राज्य स्तरावर ३ महिन्यांच्या आत पूर्तता झालेली नाही, मात्र वारसा प्रमाणपत्र, वेतनश्रेणी वाढवणे, धोरणात्मक बाबी तसेच शिस्तभंग आणि डी.पी.सी. च्या पुनरावलोकनासाठी प्रलंबित असलेल्या पूर्णपणे कायदेशीर प्रकरणांचा या अदालतीत विचार केला जाणार नाही.या सुविधेचा लाभ घेण्यासाठी

# बोपापूरच्या ‘त्या’ ग्राहकाचे शंकानिरसन

**आसेगावपूर्णा/ वार्ताहर**



### महावितरणच्या पारदर्शक तपासणीत स्मार्ट मीटर १०० टक्के योग्य

### अफवांवर विश्वास ठेऊ नका - महावितरण

स्मार्ट मीटरमुळे जास्त वीज बिल येत असल्याच्या कथित अफवांना महावितरणने प्रत्यक्ष तांत्रिक तपासणीद्वारे उत्तर दिले आहे. अचलपूर तालुक्यातील बोपापूर येथील ग्राहक डी. आर. मालखेडे यांनी स्मार्ट मीटरमुळे बिल जास्त आल्याची तक्रार नोंदवली होती. महावितरणने या तक्रारीची संवेदनशीलतेने दखल घेत केलेल्या सखोल तांत्रिक पडताळणीत तो स्मार्ट मीटर पूर्णपणे अचूक असल्याचे आणि बिलिंग नियमानुसारच झाल्याचे स्पष्ट झाले आहे. महावितरणच्या या पारदर्शक भूमिकेमुळे ग्राहकाचे पूर्ण समाधान झाले असून त्यांनी संपूर्ण बिलाचा भरणा केला आहे.

ग्राहक मालखेडे यांनी २९ जून २०२६ रोजी तक्रार दाखल केली होती

त्यानंतर लगेचच ३० जून रोजी आयोजित ‘स्मार्ट मीटर समाधान शिबिरात’ त्यांना बिलाची सविस्तर माहिती देऊन प्रत्यक्ष मीटर तपासणीचे आश्वासन देण्यात आले. ठरल्याप्रमाणे, २ जुलै रोजी महावितरणच्या तांत्रिक पथकाने ग्राहकाच्या घरी जाऊन तेथील ’जीनस’ कंपनीचा स्मार्ट मीटर (क्र. १०२५३२०६) एका प्रमाणित सिरीज मीटरसोबत जोडला.

३ जुलै रोजी २४ तासांची सलग तपासणी पूर्ण झाल्यावर, दोन्ही मीटरवरील वीज वापर (रीडिंग) आणि आकारणी तंतोतंत समान असल्याचे आढळून आले. या पडताळणीचा निष्कर्ष ग्राहकानेही तात्काळ मान्य केला आणि समाधानाअंती १८,८३० रूपयाच्या वीज बिलाचा शंभर टक्के भरणा केला. या यशस्वी तपासणीनंतर उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड यांनी नागरिकांना अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे.

शंका किंवा तक्रार असल्यास थेट महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

# फत्तेपूर येथे ग्राम बाल संरक्षण समितीची बैठक

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**



येथील महिला व बालविकास विभागातील जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्यामार्फत तालुक्यातील फत्तेपुर गावातील अंगणवाडी सेविकांना विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्या करिता ग्राम बाल संरक्षण समितीच्या बैठकीचे आयोजन अंगणवाडी क्र. ०५ मध्ये करण्यात आले होते. बैठकीला गावातील अंगणवाडी सेविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्राम बाल संरक्षण समितीच्या बैठकीचे आयोजन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट, बालविकास प्रकल्प अधिकारी भुजंग मिसळ व जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रमुख अजय डबले यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

बैठकीला गावातील अंगणवाडी सेविकांना बालहक्क, बाल संरक्षण, बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी, बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, बालकांच्या सुरक्षिततेसाठी शासनाच्या विविध योजना तसेच समाजातील बाल संरक्षणाबाबत जागरुकता निर्माण करण्या संबंधी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ग्रामस्तरावर बालकांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे व्हावे, यासाठी ग्राम बाल संरक्षण समितीची भूमिका आणि जबाबदाऱ्या याविषयीही माहिती देण्यात आली.

कार्यक्र माच्या माध्यमातून बालसंरक्षणा बाबत गावपातळीवर जनजागृती होऊन बालकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यास मदत होईल, असा विश्वास महिला व बालविकास विभागाच्या सामाजिक कार्यकर्ता मनिषा फुलाडी यांनी व्यक्त केला. उपस्थित अंगणवाडी सेविकांनी प्रश्न विचारुन शंकांचे निराकरण केले.

बैठकीला अंगणवाडी सुपरवायझर प्रभा राजुरकर, अंगणवाडी सेविका उषा पांडे, रेणू वानखडे, इंदू पोलगावंडे, माला नाकाडे, पोलीस पाटील माधुरी एडोले, ग्रामसेवक सदस्य प्रियंका पांडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आरती खडसे यांच्यासह किशोरवयीन मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीच्या यशस्वीतेकरिता अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनिस यांनी परिश्रम घेतले.

# हृदयविकारग्रस्त आदिवासी गर्भवतीची सामान्य रुग्णालयात यशस्वी प्रसूती

### आई - बाळ दोघांनाही नवजीवन

**अमरावती/ का.प्र.**

मेळघाटातील दुर्गम भागातून आलेल्या हृदयविकारग्रस्त आदिवासी गर्भवतीची अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालयात यशस्वी प्रसूती करण्यात आली. वेळेशी स्पर्धा करत डॉक्टर, नर्सिंग कर्मचारी आणि आरोग्य पथकाने केलेल्या समन्वित प्रयत्नांमुळे आई आणि नवजात बाळ या दोघांचेही प्राण वाचविण्यात यश आले आहे. सध्या दोघांवरही जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

चिखलदरा तालुक्यातील सोमवारखेडा येथील माधुरी चंगल बेलसरे (वय ३०) यांना प्रसूतीची पूर्ण मुदत झाल्यानंतर सोमवारखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रातून टेंभुरसोंडा प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत अमरावती येथील डफरीन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तपासणीनंतर त्या हृदयविकाराने ग्रस्त असल्याने उच्चस्तरीय उपचारासाठी नागपूर येथे हलविण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, काही कारणांमुळे कुटुंबीयांनी नागपूरला जाण्यास नकार देत त्या गावाकडे परतल्या. यानंतर टेंभुरसोंडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कुटुंबीयांचे समुपदेशन करून गर्भवतीला पुन्हा डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. तेथेही वैद्यकीय तपासणीनंतर हृदयविकारामुळे प्रसूती अत्यंत जोखमीची असल्याचे सांगत नागपूरला रेफर करण्याचा सल्ला देण्यात आला.दरम्यान, १५ जुलैच्या मध्यरात्री गर्भवतीला जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. रुग्णालयात दाखल होताच तिला प्रसूतीवेदना सुरू झाल्याने ड्युटीवरील डॉक्टरांनी तातडीने स्त्रीरोगत ज्ज्ञांना पाचारण केले. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीरोग विभाग, भूलतज्ज्ञ, नर्सिंग कर्मचारी आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी समन्वयाने उपचार सुरू केले. वैद्यकीयदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही महिलेची सुरक्षित नॉर्मल प्रसूती करण्यात डॉक्टरांना यश आले.

प्रसूतीनंतर महिलेने सुदृढ बाळाला जन्म दिला. आईला अतिदक्षता विभागात, तर नवजात बाळाला बालरुग्ण विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून दोघांचीही प्रकृती समाधानकारक असल्याचे रुग्णालय प्रशासनाने स्पष्ट केले.

या संपूर्ण प्रक्रियेत टेंभुरसोंडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय पथकाने, जिल्हा सामान्य रुग्णालयातील आदिवासी कक्षातील कर्मचाऱ्यांनी तसेच स्त्रीरोग विभागाच्या डॉक्टरांनी वेळेवर समन्वय साधत महत्त्वाची भूमिका बजावली.

# सोनम वांगचुक, अभियंता आणि पर्यावरणवादी

## सोनम यांना ९ भाषा अवगत; तुरुंगात जाताच बराकी थंड-उष्ण ठेवणारे डिझाइन बनवले

सप्टेंबर २०२५ मध्ये लडाखमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनानंतर सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत (एनएसए) ताब्यात घेण्यात आले होते. २६ सप्टेंबर २०२५ ते १४ मार्च २०२६ पर्यंत ते राजस्थानच्या जोधपूर तुरुंगात राहिले. या काळात त्यांनी पाहिले की बरकींमधील रात्रीचे तापमान ६ डिग्रीपर्यंत खाली जाते. खिडक्यांना शटर नसल्यामुळे वारा थेट आत येतो. तेव्हाच त्यांच्या लक्षात आले की त्यांच्या कोठडीतील बोअरवेलमधून निघणारे पाणी सतत सुमारे २५ डिग्रीवर वाहते. त्यांनी याच पाण्याला पाइप्सच्या माध्यमातून जमिनीच्या खालून नेऊन एक अशी प्रणाली डिझाइन करण्याचा प्रस्ताव ठेवला, ज्यामुळे थंडीत बराकी गरम आणि उन्हाळ्यात थंड राहील. या कल्पनेची खूप प्रशंसा झाली.

निसर्ग अन् पर्यावरणाची आवड असणारे सोनम वांगचुक अत्यंत साधी जीवनशैली जगतात. त्यांनी आपले घर बनवण्यासाठी माती, दगड आणि

**सोनम हे सिद्ध करतात की एक इनोव्हेटर देशाची किती मोठी सेवा करू शकतो. - आनंद महिंद्रा, प्रसिद्ध उद्योगपती**

लाकडाचा वापर केला आहे जेणेकरून बांधकामाचा खर्च कमी व्हावा आणि पर्यावरणावर कमीत कमी परिणाम व्हावा. त्यांनी आपल्या घरावर सोलार हीटिंग सिस्टीम आणि इन्सुलेटेड माती दगडाचा अशा प्रकारे वापर केला की उणे ३० डिग्री सेल्सिअस तापमानातही त्यांचे घर गरम राहते. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, बालपणी इतर भाषांची माहिती नसल्यामुळे नंतर विविध भाषा शिकण्याची जिद्द निर्माण झाली. ते ९ भाषा शिकले आहेत.

● कुटुंब

### वडील नेते अन् राज्य सरकारमध्ये मंत्री होते

सोनम वांगचुक यांचा जन्म लडाखच्या उलेयटोकपो गावात सोनम वांग्याल आणि तेजरिंग वांग्मो यांच्या घरी झाला होता. वडील राजकारणी होते, जम्मू-काश्मीर सरकारमध्ये मंत्रीही राहिले. सोनम यांच्या गावात शाळा नव्हती. ९ वर्षांपर्यंत आईनेच लडाखी भाषेत त्यांना शिकवले. एनआयटी श्रीनगर मधून त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले.

● विवाह

### पत्नी उद्योजिका आणि शिक्षणतज्ज्ञ आहेत


सोनम यांनी गीतांजली जे. आंग्मो यांच्याशी विवाह केला आहे. त्या उद्योजिका व शिक्षणतज्ज्ञ आहेत. लोक त्यांना प्रेमाने गीतांजली जेवी असेही म्हणतात. त्यांनी करिअरची सुरुवात आंतरराष्ट्रीय विकास आणि शाश्वत जीवनशैलीच्या क्षेत्रात केली होती. लडाखमध्ये दोघांनी हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हजची (एचएआयएल) स्थापना केली.

● वांगचुक यांचे नवोपक्रमः

### वाया जाणारे पाणी गोठवून कृत्रिम सरोवर

अशा इमारती डिझाइन केल्या. ज्या शून्यापेक्षा कमी तापमानातही गरम राहतात. हिवाळ्यात वाया जाणारे पाणी गोठवून कृत्रिम सरोवर (ग्लेशियर) बनवले. जे उन्हाळ्यात पाणी देतात. २०२१ मध्ये भारतीय सेनेसाठी असे सोलार टेंट बनवले, जे बाहेरचे तापमान उणे १४ डिग्री असताना आतले तापमान १५ डिग्री ठेवतात. शिक्षण सुधारणेसाठी सरकारी शाळांत ऑपरेशन न्यूहोप चालवले.

[ **चर्चेत का?:** नीट परीक्षेतील गोंधळाच्या आरोपावरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत ते ते १९ दिवसांपासून उपोषण करताहेत. ]




**खासः** मातीच्या वास्तुकलेचे परदेशातून घेतले शिक्षण

त्यांच्याद्वारे संचालित शाळा एसईसीएमओएल मध्ये त्या मुलांना प्राधान्य मिळते, जे सरकारी शाळांमध्ये नापास झाले आहेत.-मातीच्या वास्तुकलेला समजून घेण्यासाठी फ्रान्सच्या प्रतिष्ठित संस्था सीआरएटीरेमधून विशेष शिक्षण घेतले आहे.

**यशः** टाइम मॅगझिनने २०२५ च्या यादीत केले सामील

२०२५ मध्ये टाइम मॅगझिनने १०० मोस्ट इन्फ्लुएन्शियल क्लायमेट लीडर्सच्या यादीत डिफेंडर्स श्रेणीत सामील केले आहे.

हा सन्मान त्यांच्या योगदानाला सिद्ध करतो. २०१८ मध्ये महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय सन्मान रेमन मॅगसेसे देण्यात आला आहे.

**विवादः** स्थानिक गव्हर्निंग बॉडीसोबत राजकीय संघर्ष

लडाखला संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये सामील करणे व पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीवरून स्थानिक गव्हर्निंग बॉडी व भाजपच्या स्थानिक नेत्यांशी थेट संघर्ष झाला आहे. नुकतेच लडाख प्रशासनाने एचएआयएलचा पट्टा रद्द केला आहे.

## सुपरस्टार राजेश खन्ना!

१८ जुलैला हिंदी चित्रपटसृष्टीचा पहिला सुपरस्टार राजेश खन्ना यांचा चौदावा स्मृतिदिन आहे. खरे तर साठ-सत्तरीचे दशक हे 'चॉकलेट हिरो' आणि 'स्टाईल आयकॉन' देव आनंद, 'ट्रॅजेडी किंग' दिलीप कुमार आणि 'शो मॅन' राज कपूर यांचे होते. सोबतच धर्मेंद्र, शशी कपूर, राजेंद्र कुमार, शम्मी कपूर, जितेंद्र, सुनील दत्त, असे अनेक दिग्गज अभिनेते आपापल्या अष्टपैलू अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत होते. सुरुवातीला चेतन आनंद दिग्दर्शित १९६६ साली 'आखरी खत' या चित्रपटातून पदार्पण करणाऱ्या राजेश खन्नाच्या पदरी अपयश आले. त्यांनतर दोनच वर्षात त्याने 'कटी पतंग', 'आराधना', 'खामोशी', सच्चा झूठा, दुश्मन, यांसारखे एका पाठोपाठ एक असे सलग १७ सुपरहिट चित्रपट दिले. त्या काळात यशस्वी अभिनेता म्हणून प्रस्थापित झाल्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीचा पहिला 'सुपरस्टार' असे नामाभिमान प्राप्त झाले. राजेश खन्ना यांना चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली!

**प्रदीप मोरे**

# नेल्सन मंडेलाःक्षमा, समता आणि मानवतेचा अखंड दीपस्तंभ

१८ जुलै हा दिवस जगभरात 'नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान नेत्याची जयंती नसून अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा, मानवतेच्या विजयाचा आणि क्षमाशीलतेच्या सर्वोच्च मूल्याचा स्मरणदिन आहे. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषाच्या काळ्याकुट्ट व्यवस्थेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष करणारे नेल्सन मंडेला हे आधुनिक जगातील सर्वात प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक मानले जातात. दक्षिण आफ्रिकेत अनेक दशकांपर्यंत गोऱ्या आणि कृष्णवर्णीय नागरिकांमध्ये अमानुष भेदभाव करणारी अपार्थाइड व्यवस्था अस्तित्वात होती. कृष्णवर्णीय नागरिकांना शिक्षण, मतदान, नोकरी, निवास आणि सार्वजनिक सुविधांमध्ये समान हक्क नव्हते. अशा परिस्थितीत एका तरुणाने अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. त्या तरुणाचे नाव होते नेल्सन रोलीहलाहला मंडेला.

१८ जुलै १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेतील म्वेझो येथे त्यांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये न्याय, स्वाभिमान आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द होती. त्यांनी शिक्षण पूर्ण करून कायद्याचे शिक्षण घेतले आणि अन्यायग्रस्त कृष्णवर्णीय नागरिकांच्या हक्कासाठी लढा सुरू केला. आफ्रिकन नॅशनल काँग्रेस या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी वर्णद्वेषाविरुद्ध व्यापक जनआंदोलन उभे केले. त्यांच्या आंदोलनामुळे त्यांना १९६२ मध्ये अटक करण्यात आली आणि जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. तब्बल २७ वर्षे त्यांनी कारागृहात अमानुष यातना सहन केल्या. तुरुंगातील कठोर श्रम, अपमान आणि एकाकीपणानेही त्यांचा निर्धार ढळला नाही. त्यांनी सूड नव्हे, तर न्यायाचा मार्ग निवडला.

१९९० मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर जगाला वाटले की आता ते सूड उगवतील. परंतु मंडेला यांनी जगाला एक वेगळीच दिशा दाखवली. त्यांनी सूडाऐवजी सामंजस्य, संवाद आणि क्षमा यांचा मार्ग स्वीकारला. १९९४ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बनले आणि त्यांनी संपूर्ण देशाला एकत्र आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. मंडेला यांच्या जीवनातील एक प्रसंग आजही मानवतेचा सर्वोच्च आदर्श मानला जातो. तुरुंगात त्यांना अत्यंत त्रास देणारा एक पहारेकरी राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर एका कार्यक्रमात त्यांच्या समोर आला. अनेकांना वाटले की आता त्याच्यावर



कारवाई होईल; पण मंडेला यांनी त्याला सन्मानाने आपल्या शेजारी बसवून भोजन करण्याचे निमंत्रण दिले. हा प्रसंग केवळ क्षमाशीलतेचा नव्हे, तर महान नेतृत्वाचा आदर्श आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत जगभरातून त्यांचा गौरव करण्यात आला. १९९३ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतानेही त्यांच्या मानवतावादी कार्याचा सन्मान करत 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान बहाल केला. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नव्हता तर समता, स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संघर्षाचाही गौरव होता.

आज जगभरात जात, धर्म, वंश, भाषा, विचार आणि राजकीय मतभेदांमुळे संघर्ष वाढताना दिसतो. अशा काळात नेल्सन मंडेला यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट होता 'द्वेष मनाला कैद करतो, तर क्षमा माणसाला मुक्त करते.' आजच्या तरुण पिढीने मंडेला यांच्याकडून संघर्ष करण्याची हिंमत, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, शिक्षणाचे महत्त्व आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्षमा करण्याची ताकद शिकण्याची गरज आहे. समाजात शांतता, समता आणि बंधुभाव टिकवायचा असेल तर मंडेला यांच्या विचारांचा स्वीकार अपरिहार्य आहे. नेल्सन मंडेला यांचे जीवन हे एका व्यक्तीच्या इच्छाशक्तीने संपूर्ण राष्ट्राचा इतिहास बदलू शकतो, याचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी सिद्ध केले की खरी महानता सत्तेत नसते, तर माणुसकीत असते; विजय सूडाने मिळत नाही, तो प्रेम, समता आणि क्षमेमुळे मिळतो. नेल्सन मंडेला यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! त्यांच्या विचारांचा प्रकाश मानवतेच्या मार्गाला कायम दिशा देत राहो.

**अशोक कविटकर**
अमरावती,
मो.९४२३१२५१३५

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## आता सरसकट दोन लाखाची कर्जमाफी




शेतकऱ्यांच्या खात्यावरील थकीत पिककर्जाचा भार कमी करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली. ही योजना अधिक व्यापक करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी पुर्वीच्या शासन निर्णयात नमूद केल्या काही अटी काढून टाकण्यात आल्या आहे. त्यामुळे आता पात्र सर्वच शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयापर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

कोणीही पात्र शेतकरी अटी व शर्तीमुळे वंचित राहून यासाठी लगेच या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर करून तिची व्याप्ती अधिक वाढविली आहे. त्यामुळे आता ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारी योजना ठरली आहे.

योजनेच्या निकषात केलेल्या सुधारणांमधील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली पन्नास हजार रुपयांच्या लाभाची मर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे अशा सर्व पात्र शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

महत्त्वाचा दुसरा निर्णय म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे योजनेचा लाभ अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक झाला आहे.

राज्य शासनाने आधी केलेल्या घोषणेप्रमाणे यापूर्वी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागत होते, किंवा त्यांना दोन लाखावरील रक्कम भरण्याची अट होती. नव्या योजनेत ही अट काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरीही त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

शेतकरी कर्जमुक्ती योजना ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही; तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणे, त्यांना पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने वळविणे आणि कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे. त्यामुळे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबांसाठी नव्या आशेचा किरण ठरत आहे.

**मंगेश वरकड**
जिल्हा माहिती अधिकारी
वर्धा

## सुधारणांमुळे आणखी दिलासादायक

शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेती व त्यासंबधित पुरक व्यवसायावर अवलंबून आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चात वाढ आणि बाजार भावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना नव्याने उभारी देण्यासाठी आणि त्यांना आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' लागू केली आहे. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरत आहे. योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभांचा आलेख मांडणारा हा लेख..

राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही योजना शेतकऱ्यांना कर्जमुक्तीतून आर्थिक सक्षमतेकडे नेणारी ठरणार आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते. या योजनेची नुकतीच घोषणा करण्यात आली. लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या या योजनेतून कोणीही पात्र लाभार्थी अटी व शर्तीमुळे वंचित राहू नये, यासाठी लगेच या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर करून तिची व्याप्ती अधिक वाढविली आहे. त्यामुळे आता ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारी आणि न्याय्य स्वरूपाची योजना ठरली आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ही योजना राज्याच्या कृषी इतिहासातील महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून नोंदवली जात आहे. आता नवीन केलेल्या बदलांमुळे या संख्येत वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, शासनाने केवळ मोठी आर्थिक तरतूद केली नाही, तर सभागृहात जाहीर केलेल्या सुधारणांमुळे योजनेतील काही अटी शिथिल करून अनेक शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीचे दरवाजे अधिक व्यापकपणे खुले केले आहेत.

या सुधारणांमधील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे सन २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांच्या लाभाची मर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी अशा शेतकऱ्यांना नव्या योजनेत मर्यादित लाभ मिळत होता. आता मात्र ही अट रद्द करण्यात आल्यामुळे अशा सर्व पात्र शेतकऱ्यांनाही दोन



लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असमानता दूर झाली असून शासनाने समान न्यायाची भूमिका अधिक ठळकपणे मांडली आहे.

तितकाच महत्त्वाचा दुसरा निर्णय म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. अनेक शेतकरी या अटीमुळे संभ्रमात होते. शासनाने हा संभ्रम दूर करत नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे योजनेचा लाभ अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक झाला आहे.

यापूर्वीच्या घोषणेनुसार, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागत होते. नव्या योजनेत हा महत्त्वाचा अडसरही दूर करण्यात आला आहे. आता दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे. योजनेची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे तिची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जात आहे. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे. या योजनेला अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कर्जमुक्तीची रक्कम ही थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. अशा प्रकारे या योजनेला डिजीटल स्वरुप सुध्दा प्राप्त झाले आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कर्जापुरत्या मर्यादित नसतात. शेतीचा वाढता खर्च, वीज, सिंचन, हमीभाव, बाजारपेठ आणि नैसर्गिक संकटे या सर्वांचा त्यांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत असतो. याची जाणीव ठेवून राज्य शासन कृषी क्षेत्रावर दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. केवळ कृषी वीजबिलासाठीच सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी दहा हजार कोटी रुपयांहून अधिक चुकारे अदा करण्यात आले असून, सोयाबीन खरेदी, कांदा बाजारभाव स्थिरीकरण, ठिबक सिंचनासाठी प्रलंबित निधी आणि कृषी समृद्धी योजनेसाठी अतिरिक्त तरतूद, कृषी फिडरवर दिवसा वीजपुरवठा यांसारख्या निर्णयांतूनही शासनाची शेतकरीहिताची भूमिका स्पष्ट दिसून येते.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही; तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणे, त्यांना पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने वळविणे आणि कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे. विधिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की, या सुधारणांमुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी एकही पात्र शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित राहू नये, हीच शासनाची भूमिका आहे. ही भूमिका केवळ घोषणांपुरती मर्यादित नसून, त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याची शासनाची तयारीही यातून दिसून येते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ आकडेवारीच्या नजरेतून न पाहता त्यांच्या आयुष्याशी निगडित वास्तव समजून घेऊन निर्णय घेण्याची संवेदनशीलता या सुधारणांमधून दिसून येते. त्यामुळे ही योजना आता पूर्वीपेक्षा अधिक व्यापक, अधिक समावेशक आणि अधिक परिणामकारक ठरली आहे.


'शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करणारा महत्त्वाचा निर्णय आहे. कर्जाच्या दुष्टचक्रातून मुक्तता, नव्या गुंतवणुकीची संधी आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल या माध्यमातून ही योजना राज्यातील कृषीक्षेत्राला नवी दिशा देणारी ठरणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कर्जमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल पडल्याची भावना राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निश्चितच दृढ झाली आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला
जिल्हा विशेष

# ‘फटाका’ बुलेटवाल्यांना अकोट पोलिसांचा दणका

## २० मॉडिफ फाईड सायलेन्सर जप्त



■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरात वाढत्या ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी अकोट शहर पोलिसांनी मॉडिफाईड सायलेन्सर बसवून मोठा आवाज करणाऱ्या बुलेट मोटारसायकलींविरोधात विशेष मोहीम राबवत गुरुवारी (१६ जुलै) धडक कारवाई केली. या कारवाईत तब्बल २० बुलेट मोटारसायकलींवर कारवाई करण्यात आली असून त्यावरील नियमबाह्य मॉडिफाईड सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत.

शहरातील प्रमुख रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक बुलेट मोटारसायकलींवर कंपनीमान्य सायलेन्सरऐवजी मोठा आवाज करणारे मॉडिफाईड सायलेन्सर बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले. अशा सायलेन्सरमुळे ध्वनी प्रदूषण वाढत असून नागरिक, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे वारंवार येत होत्या. त्यानंतर पोलिसांनी ही विशेष मोहीम हाती घेतली.

तपासणीदरम्यान संबंधित वाहनधारकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच वाहनांवर बसविण्यात आलेले २० मॉडिफाईड सायलेन्सर जागीच जप्त करण्यात आले. भविष्यातही अशा प्रकारची मोहीम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

अकोट शहर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहनांमध्ये नियमबाह्य बदल करून ध्वनी प्रदूषण निर्माण करू नये. कंपनीने मंजूर केलेल्या उपकरणांचाच वापर करावा. मॉडिफाईड सायलेन्सर बसवून मोठा आवाज करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्जित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील आणि अकोट शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी (पोलीस निरीक्षक) किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, पोलीस उपनिरीक्षक समाधान मिसाळ, पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहिते तसेच वाहतूक शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल शशिकांत इंगळे, निकेश सोळंके आणि वैभव वसू यांनी सक्रिय सहभाग घेतला.

ध्वनी प्रदूषणाविरोधातील या कारवाईमुळे शहरातील बुलेट चालकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अकोट शहर पोलिसांनी आता अधिक कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

# कालंका माता मंदिर चोरीचा राज्यभर गाजलेला तपास

## अकोला एलसीबीच्या धडाकेबाज पथकाचा डीजीपींकडून विशेष गौरव



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोट येथील बारगण परिसरातील प्रसिद्ध कालंका माता मंदिरातील लाखो रुपयांच्या चोरीचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत आरोपीला जेरबंद करणाऱ्या अकोला स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) तपास पथकाच्या कामगिरीची राज्य पातळीवर दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांनी शुक्रवार (दि. १७) रोजी मुंबई येथील दालनात या तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करून त्यांच्या उत्कृष्ट तपास कौशल्याला सलाम केला.

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोट शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कालंका माता मंदिरात अज्ञात चोरट्याने देवीच्या मूर्तीवरील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५० ग्रॅम चांदी तसेच दानपेटीतील १५ हजार रुपयांची रोकड असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. अकोटकरांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिरात झालेल्या या चोरीमुळे शहरात तीव्र संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले. तत्कालीन पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. तांत्रिक विश्लेषण, सीडीआर तपास, गोपनीय माहिती आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर तपास पथकाने आरोपी अमोल काशीराम तेलगोटे (रा. रिधोरा, ता. बाळापूर) याच्यापर्यंत मजल मारली.

आरोपीचा माग काढत एलसीबीचे पथक थेट छत्तीसगडमधील रायपूरपर्यंत पोहोचले. तेथून परतताना आरोपीवर पाळत ठेवून अमरावतीजवळ अत्यंत शिताफीने त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून सोन्याचे दागिने, सोन्याची लगड, चांदीचे बिस्कीट, कडे, मोबाईल, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व अन्य साहित्य असा तब्बल ७ लाख २१ हजार ६८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या अत्यंत संवेदनशील आणि बहुचर्चित गुन्ह्याचा अचूक तांत्रिक तपास करून आरोपीला अटक केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुलतान पठाण आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल वसीमोद्दीन यांना प्रमाणपत्र देऊन विशेष गौरविले.

अकोला स्थानिक गुन्हे शाखेच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, राज्यभरातून या तपास पथकावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**

मुर्तिजापूर रोड, अकोला - ४४४००१
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./निविदा/१७१७/ २०२६ दिनांक : १७/०७/२०२६

**निविदा सुचना**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक २३ सन २०२६-२७ | ईमारत देखभाल व दुरुस्ती अंतर्गत म.जी.प्रा. वर्ग-१ निवासस्थान येथील समोरील आवार भिंतीचे बांधकाम करणे. | रु.८,२०,९६०/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन दि. १८/०७/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदेचा विक्री कालावधी दि. १७/०७/२६ ते २३/०७/२६ असा असुन निविदा भरुन सादर करण्याचा दि. २४/०७/२६ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १८.०७.२०२६ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
म. जी. प्रा. विभाग, अकोला

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम- २०२६; फॉर्म वितरण

## संकलन व डिजिटायझेशनाचे काम वेगात

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १४.०५.२०२६ रोजी घोषित केलेल्या मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision- SIR) कार्यक्रमाची अंमलबजावणी अकोला जिल्हयामध्ये सुरु आहे. सदर कार्यक्रमाच्या वेळापत्रकानूसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ) हे ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेट देऊन अंशत: भरलेले गणना पत्र (Enumeration Form) प्रत्येकी दोन प्रतीत मतदारांना वितरित करत आहेत व माहिती भरलेली गणनापत्रकांची प्रत परत घेत आहेत.

अकोला जिल्ह्यातील ५ विधानसभा मतदार संघातील एकुण १७४१ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ) यांचेकडून १५,९५,६४४ मतदाराची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत असून दिनांक १७.०७.२०२६ पर्यत मतदारांना वाटप केलेले गणना पत्रक व डिजिटायझेशन केलेले गणनापत्रकाची माहिती खालील प्रमाणे आहे. मतदार मागील विशेष सखोल पुनरिक्षणामधील मतदार यादीतील स्वतःचे/संबंधित नातेवाईकांचे नाव ECINet हे ॲप्लीकेशन गुगल प्लेस्टोअर वरुन डाऊनलोड करुन तसेच https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर तपासू शकतात आणि गणना पत्रातील माहितीची पडताळणी करुन दोन्ही प्रती मध्ये योग्य माहिती भरुन आणि स्वाक्षरी करुन गणना पत्राची एक प्रत आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ) यांचेकडे जमा करावी.मतदारांस आपले गणना प्रपत्र ण्ंघ्नू हे ॲप्लीकेशन गुगल प्लेस्टोअर वरुन डाऊनलोड करुन तसेच https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने ही भरता येईल.

सर्व मतदारांना त्यांचे छायाचित्र गणना पत्रकावर चिकटवणे आवश्यक नाही, ज्या मतदारांचा मतदार यादीमध्ये फोटो अस्पष्ट आहे अथवा योग्य त्या आकारामध्ये नाही, अशा मतदारांचा फोटो मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे त्यांचे मोबाईल मध्ये फोटो काढतील यामध्ये काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यासच मतदारांना त्यांच्या फोटोची प्रत गणना पत्रकावर (Enumeration Form) वर चिकटवणे आश्यक राहील.

विशेष सखोल पुनरिक्षण कालावधीमध्ये नागरिकांना माहिती देण्यासाठी त्याप्रमाणे त्याच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा व्यवस्थापन व सनियंत्रण कक्ष (वॉररुम) दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला ची स्थापना करण्यात आली आहे. येथे मतदार प्रत्यक्ष भेट देवून आपल्या समस्याचे निराकरण करुन घेऊ शकतील.

तसेच विशेष सखोल पुनरिक्षण कालावधीमध्ये नागरिकांना माहिती देण्यासाठी त्याप्रमाणे त्याच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर मदत कक्षाची (Help Desk) स्थापना करण्यात आली आहे. त्याकरीता टोल फ्री असलेला १९५० तसेच ९१८०६५९०९८४४ हा दुरध्वनी क्रमांक कार्यन्वित करण्यात आला आहे. हे क्रमांक मतदार यादीच्या अंतिम प्रसिध्दीपर्यत सकाळी ६.०० पासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत कार्यरत राहतील. जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये तसेच उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय अकोला या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयांच्या ठिकाणी मदत कक्षा ची स्थापना करण्यात आली आहे.

# अकोल्यात एसआयआर मतगणनेच्या, फॉर्म भरण्याची मुदत वाढवण्याची मागणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला येथील रहिवासी मो. इस्माईल हबीबभाई कच्छी आणि इतर नागरिकांनी प्रशासनाला एक निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी एध्टं मतगणनेच्या फॉर्म भरण्याच्या अंतिम मुदतीमध्ये सहा महिन्यांची वाढ करण्याची आणि फॉर्ममधील जाचक अटी कमी करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या योजनेचे फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ३० जुलै २०२६ आहे. मात्र, सध्या अकोला महानगरपालिकेच्या निवडणुका सुरू असून, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांचा वेळ मिळतो. याच धर्तीवर, सर्वसामान्य नागरिकांनाही आवश्यक कागदपत्रे आणि जात वैधता प्रमाणपत्र गोळा करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळायला हवी. निवेदनामध्ये सध्या फॉर्म भरण्याची प्रक्रिया संथ गतीने सुरू असून कागदपत्रे गोळा करण्यास वेळ लागत आहे. त्यामुळे अंतिम तारीख ३०/०७/२०२६ वरून पुढील ६ महिने वाढवण्यात यावी.वेबसाईटची समस्या: जन्म-मृत्य विभागाची अधिकृत वेबसाईट अनेकदा बंद असते. त्यामुळे नागरिकांना कागदपत्रे मिळवण्यात अडचणी येत आहेत, यावर तोडगा काढून अटी शिथिल कराव्यात.नावातील चुका दुरुस्त करणे: ज्या नागरिकांच्या कागदपत्रांमध्ये नावाच्या चुका आहेत आणि त्यांनी गॅझेट (राजपत्र) करून नाव दुरुस्त केले.

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११६२/२०२६ प्रोसेस नं.८८५१/२०२६
चौ.ता. ११/०९/२०२६ दिनांक : १६/०७/२०२६

**अर्जदार :** १. कु. गौरी अशोक बिडवई मो. नं. ९१५८६९२१७० २. कु. रेणुका अशोक बिडवई दोघेही रा. ग्राउंड फ्लोअर, चिंतामणी अपार्टमेंट, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीमती. साधना अशोक बिडवई
**पत्ता :-** रा. ग्राउंड फ्लोअर, चिंतामणी अपार्टमेंट, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती साधना अशोक बिडवई यांचे दि. २८/०६/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०७६/२०२६ प्रोसेस नं.८९०७/२०२६
चौ.ता. ११/०८/२०२६ दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. वंदना मुकुंद देव रा. प्राजक्ता महाविद्यालयामागे, नवीन खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. २. विणा सतीश काळे रा. सिव्हिल लाइन, भिसे प्लॉट, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा. ३. वर्षा अमित अमरावतीकर रा. मु. पोस्ट देउळगाव, ता. पातूर, जि. अकोला. ४. नेहा नागेश पळसोदकर रा. पुंडलिक महाराज आश्रम जवळ, महावीर प्लाझा, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. ५. वनिता वसंतराव देशपांडे रा. मुकुंद देव, प्राजक्ता महाविद्यालयामागे, नवीन खेतान नगर, कौलखेड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वसंतराव बकाराव देशपांडे
**पत्ता :-** रा. प्राजक्ता महाविद्यालयामागे, नवीन खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वसंतराव बकाराव देशपांडे यांचे दि. २३/०९/२०१८ रोजी जुने खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# नेत्र तपासणी अभियान

**अकोला :** रोटरी फिरते नेत्र रुग्णालय, रोटरी नॉर्थ व आनंदीलाल चिरानिया ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने सन २०१० पासून जिल्ह्यात अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्जीत फिरत्या वाहनाद्वारे नेत्र तपासणी करणाऱ्या रोटरीच्या फिरत्या नेत्र तपासणी पथकाच्या वतीने वर्षभर अनेक गावांत नेत्र तपासणी अभियान सुरू असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभियानात सन २०१० ते ३० जून २०२६ पर्यंत २९५०८४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली तर ८५२०४ रुग्णांना नंबरचे चष्मे वितरित करण्यात आले.

**Change In Name**
I have change my name From
**Aasiya Bano Mohammed Yusuf**
-To-
**Aasiya Bi shaikh Babbu**
Address :- Behind Gaziya Masjid Near Taar Fail,
Akola, Dist. Akola -444001

**Change In Name**
I have change my name From
Maherunnisa she Samad
-To-
Maherunnisa Shaikh Yusuf
Address :- Near Gaziya Masjid Uttamchand Plot, Taar Fail Akola Dist. Akola 444001

# जेसीआय अकोला सिटीचे पासपोर्ट सहाय्य शिबिर




■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व राष्ट्रीय सेवेत सक्रियष्जेसीआय अकोला सिटीच्या वतीने नागरिकांसाठी पासपोर्ट सहाय शिबिरचे आयोजन करण्यात आले, ज्यास मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ८१ नागरिकांनी उपस्थिती नोंदवली. शिबिराच्या वेळी नागरिकांना पासपोर्ट अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन नोंदणी आणि अर्ज संबंधित संपूर्ण मार्गदर्शन प्रदान करण्यात आले. शिबिराचे उद्दिष्ट नागरिकांसाठी पासपोर्ट बनवण्याची प्रक्रिया साधी, सुकर आणि त्रुटीमुक्त करणे हे होते, ज्यायोगे शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि परदेश प्रवास इच्छिणाऱ्या लोकांना वेळेवर आवश्यक मदत मिळू शकेल. या कार्यक्रमाचे यशस्वी संचालन प्रकल्प संचालक राणा झुनझुनवाला आणि आश्विन गट्टानी यांनी केले. जेसीआय अकोला सिटीचे अध्यक्ष अमोल अग्रवाल यांनी सांगितले की संस्था भविष्यातही नागरिकांच्या हितासाठी अशा जनसेवेचे उपक्रम आयोजित करत राहील. सचिव अभय राठी यांनी सर्व नागरिक, स्वयंसेवक व सहकाऱ्याचे आभार मानून या आयोजनाच्या यशात त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. शिबिरात उपस्थित नागरिकांनी जेसीआय अकोला सिटीच्या या सेवा उपक्रमाचे कौतुक केले आणि ते अत्यंत उपयुक्त व जनहिताशी निगडीत पाऊल असल्याचे म्हटले.

# बीएलओ दांपत्याची उल्लेखनीय कामगिरी

**अकोला :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात ३१-अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील बीएलओ दांपत्याने फॉर्म वितरण, संकलन व डिजिटायझेशनचे काम अवघ्या अठरा दिवसात पूर्ण केले.

यादी भाग क्रमांक २८ चे बीएलओ श्री. गजानन पांडुरंग कराळे (एकूण मतदार – ६६५) तसेच यादी भाग क्रमांक ३० च्या बीएलओ सौ. सपना गजानन कराळे (एकूण मतदार – ५२१) यांनी अत्यंत उत्कृष्ट कार्य करून अवघ्या १८ दिवसांत शंभर टक्के फॉर्म वितरण, संकलन डिजिटायझेशनचे काम पूर्ण केले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मनपात सिटी टास्क फोर्सची बैठक

# आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यावर भर



■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एनयूएचएम) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेच्या सिटी टास्क फोर्स (सीटीएफ)ची बैठक गुरुवारी अतिरिक्त आयुक्त समेध अलोने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून नागरिकांना दर्जेदार व वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या निर्देशानुसार आयोजित या बैठकीत लसीकरण, माता व बाल आरोग्य, संसर्गजन्य रोगांचे नियंत्रण, एचएमआयएस अहवाल, व्हॅक्सिन प्रिव्हेंटेबल डिसीज (व्हीपीडी) सर्व्हेलन्स तसेच सार्वजनिक आरोग्याशी संबंधित विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त समेध अलोने यांनी संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे राबवाव्यात, असे निर्देश दिले. विविध विभागांनी आपल्या कामकाजाचा आढावा सादर करत प्रलंबित बाबींची माहिती दिली. या बाबी तातडीने पूर्ण करून नागरिकांना सुलभ, दर्जेदार आणि वेळेत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. बैठकीस सहाय्यक आयुक्त गणेश शहाणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, माता व बालसंगोपन अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, लसीकरण क्षेत्र समन्वयक, औषध निर्माता तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**वर्धा-** दखणे कुणबी समाज संस्थेच्यावतीने शांती भवन येथे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी दहावी व बारावीतील प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह, प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. अण्णासाहेब जाधव यांच्या प्रेरणेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून डॉ. महेंद्र गायकवाड, अध्यक्ष म्हणून बाळासाहेब मिसाळ तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रवींद्र सोनटक्के, डॉ. पंकज मोरे, गौरव मोरे उपस्थित होते. कार्यक्रमात ५० गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांकाला रोख बक्षिसे व चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन अविनाश जाधव व दर्शन चांभारे यांनी केले. प्रास्ताविक जयवंत भालेराव यांनी केले तर आभार मुकुंद बोराडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी नीलेश सावध, किरण जंगले, सचिन ठाकरे, अनिल नखाते, किशोर वाघ, शंकर घपाट, अशोक वंजारी, संध्या बावणे, गुंजन मिसाळ, वसंत चांभारे, रमेश जाधव, महेश अडसूळे, सुनील भालेराव, प्रफुल्ल मोरे, प्रवीण लांडगे, प्रमोद हिवरे, अरुण वंजारी, डॉ. गांडोळे यांनी सहकार्य केले.

### गळफास घेऊन वृद्धाची आत्महत्या

**पुलगाव :** नाचणगाव शिवारातील शेतात झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन एका वयोवृद्धाने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. रामदास माणिक नेहारे (वय ६८, रा. पेठपुरा) असे मृताचे नाव आहे. सकाळच्या सुमारास शेतात गेलेल्या नागरिकांना झाडाला लटकलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह दिसून आला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस विविध अंगांनी तपास करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**सेलू-** तालुक्यातील एका गावातून १४ वर्षीय अल्पवयीन मुलगा बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. मुलगा घरातून बाहेर पडल्यापासून परत न आल्याने कुटुंबीयांनी त्याचा परिसरात शोध घेतला. गावातील नागरिकांकडे चौकशी केली असता काही महिलांनी संबंधित मुलगा हातात विळा घेऊन नदीवरील पुलाच्या दिशेने जाताना पाहिल्याचे सांगितले. मात्र त्यानंतर त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अल्पवयीन मुलास पळवून नेल्याचा गुन्हा दाखल केला असून मुलाचा शोध घेण्यासाठी विविध पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास सुरू आहे.

### बाप-लेकास काठीने मारहाण

**वर्धा-** किरकोळ कारणावरून झालेल्या वादात बाप आणि मुलास काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना महाकाळ शेतशिवारात घडली. आनंदराव पवार हे शेताकडे जात असताना सुधाकर गजबे याने त्यांना अडवून वाद घातल्याचे सांगण्यात आले. वाद वाढल्यानंतर आरोपीने काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले. वडिलांना वाचविण्यासाठी गेलेल्या प्रवीण पवार यालाही शिवीगाळ करीत मारहाण करण्यात आली. जखमींनी उपचार घेतल्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### बैलबंडी नेण्याच्या वादातून मारहाण

**वर्धा-** शेतातून बैलबंडी नेण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका व्यक्तीला काठीने मारहाण केल्याची घटना खापरी (ढोणे) शिवारात घडली. केशव भाऊराव धांदे (वय ५०) हे बैलबंडी घेऊन जात असताना विजय उईके याने माझ्या शेतातून बैलबंडी घेऊन जाऊ नको, असे म्हणत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर वाद विकोपाला गेल्याने आरोपीने काठीने मारहाण करून धांदे यांना जखमी केल्याचा आरोप आहे.

# जलजीवन योजनेवर कोट्यवधी खर्च; तरी पाण्याचा थेंब नाही

## ग्रामपंचायतीतील अनागोंदीमुळे नागरिक संतप्त, वाढीव पाणीपुरवठा कामासह जलजीवन योजनेच्या चौकशीची मागणी



**विरूळ(आ)/जनमाध्यम**
आर्वी तालुक्यातील सर्वात मोठी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी विरूळ (आकाजी) ग्रामपंचायत सध्या भोंगळ व अनागोंदी कारभारामुळे चर्चेत आली आहे. ग्रामपंचायतीवर प्रशासकीय कारभार सुरू असला तरी नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. संबंधित अधिकारी नियमितपणे हजर राहत नसल्यामुळे ग्रामपंचायतीतील कर्मचारी मनमानी करत असून नागरिकांच्या तक्रारींकडे सर्रास दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामपंचायतीचा तात्पुरता कारभार रसुलाबाद येथील ग्रामविस्तार अधिकारी सांभाळत असून ते आठवड्यात केवळ दोन दिवस विरूळ येथे येतात. त्यामुळे उर्वरित दिवस ग्रामपंचायतीचा कारभार अक्षरशः रामभरोसे सुरू असल्याचे चित्र आहे. नागरिकांना विविध दाखले, शासकीय कामे आणि इतर सेवांसाठी हेलपाटे मारावे लागत असून त्यांची कोणीही दखल घेत नसल्याची तक्रार आहे.

दरम्यान, गावात जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल दोन कोटी रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. मात्र एवढा निधी खर्च होऊनही गावातील पाणीटंचाई कायम असल्याने या योजनेच्या गुणवत्तेवर आणि अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

याशिवाय वाढीव पाणीपुरवठ्यासाठी आणखी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामातही अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त होत असून संपूर्ण कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

आर्वी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांची या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे का असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

दोषी अधिकारी, अभियंते आणि संबंधित कंत्राटदारांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. विरूळ ग्रामपंचायतीतील कारभारावर आता वरिष्ठ प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# विठुरायाच्या भेटीसाठी एसटीची साथ

## आषाढी एकादशीसाठी वर्धा जिल्ह्यातून पंढरपूरकडे ११५ विशेष बसेस



**वर्धा/जनमाध्यम**
आषाढी एकादशी म्हणजे लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचा, भक्तीचा आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजराचा सोहळा. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघालेल्या भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागाने यंदा २० ते २९ जुलैदरम्यान ११५ विशेष एसटी बसेस चालविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे वारकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि ग्रामीण भागातील भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक पंढरपूरकडे रवाना होणार आहेत. ही गर्दी लक्षात घेऊन वर्धा आगारातून ३७, हिंगणघाट ३३, आर्वी २६, पुलगाव १० आणि तळेगाव ९ अशा एकूण ११५ विशेष बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. सर्व बसस्थानकांवर आगाऊ आरक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील वारकरी दिंड्या, भजन मंडळे आणि मंदिर समित्यांसाठी समूह आरक्षणाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. एखाद्या गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्र नोंदणी केल्यास त्या गावातूनच विशेष एसटी बसची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे दूरवरच्या गावांतील भाविकांनाही विठुरायाच्या दर्शनाचा मार्ग अधिक सोपा होणार आहे. विशेष बससेवेत महिला सन्मान योजना अंतर्गत महिलांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत ७५ वर्षांवरील नागरिकांना नियमानुसार प्रवास सवलतीचा लाभ मिळणार आहे. गतवर्षी वर्धा विभागातून २९ हजारांहून अधिक भाविकांनी विशेष एसटी बसमधून पंढरपूरची वारी केली होती. यंदाही 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात हजारो वारकरी विठुरायाच्या भेटीसाठी निघणार असून, त्यांच्या सेवेसाठी एसटी पुन्हा एकदा भक्तीच्या वाटेवरील विश्वासू सहप्रवासी ठरणार आहे.

### स्थानिक नागरिक म्हणतात..

स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, जीवन प्राधिकरण पाणीपुरवठ्यासाठी नियमित आणि मोठ्या प्रमाणात देयक आकारते.मात्र, त्या बदल्यात शुद्ध आणि सुरक्षित पाणी पुरविण्याची जबाबदारी पार पाडण्यात प्राधिकरण पूर्णपणे अपयशी ठरत आहे. नागरिकांकडून आर्थिक भार उचलूनही दूषित पाणी मिळत असल्याने हा प्रकार संतापजनक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# पावसाने फिरवली पाठ; हजारो हेक्टरवरील खरीप संकटात

## साहूर परिसरात दुबार पेरणीची भीती



**साहूर/जनमाध्यम**
अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचे चक्र विस्कळीत झाले असून गेल्या दहा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने साहूर व परिसरातील हजारो हेक्टरवरील खरीप पिके संकटात सापडली आहेत. कपाशी, सोयाबीन, तूर, उडीद व मूग या पिकांची उगवण धोक्यात आली असून शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे.

रोहिणी व मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आर्द्रा नक्षत्रात झालेल्या समाधानकारक पावसावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या पूर्ण केल्या. मात्र, पिके उगवताच पावसाने अचानक पाठ फिरविल्याने अंकुरलेली रोपे कोमेजू लागली आहेत. शेतकऱ्यांकडून सध्या डवरणी व निंदणीची कामे सुरू असली, तरी पावसाअभावी शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने चिंता वाढली आहे.

यंदाच्या हंगामासाठी बियाणे, खत, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च झाला आहे. अशातच दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यातच बोगस बियाणे व निकृष्ट खतांच्या तक्रारींमुळे अडचणीत आणखी भर पडली आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा, दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च आणि अनिश्चित शासकीय मदत यामुळे साहूर परिसरातील शेतकरी हवालदिल झाला आहे. पुढील दोन दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामाला दिलासा मिळू शकतो. अन्यथा हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची दाट शक्यता असून यंदाचाही खरीप हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

# सुरक्षित तरुणाईच सुरक्षित भारत : हेल्मेटपासून सायबर सुरक्षेपर्यंत

## एनसीसी विद्यार्थ्यांना वाहतूक पोलिसांचे मोलाचे मार्गदर्शन



**सेवाग्राम/ जनमाध्यम**
रस्ते अपघात, सायबर गुन्हे आणि महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर तरुण पिढीने कायद्याचे पालन करत जबाबदार नागरिक बनावे, असा संदेश सेवाग्राम येथील बी. डी. देशमुख महाविद्यालयात आयोजित जनजागृती शिबिरातून देण्यात आला. राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) विद्यार्थ्यांसाठी आयोजित या मार्गदर्शन शिबिरात वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, दुचाकी चालविताना हेल्मेटचा अनिवार्य वापर, गुड टच-बॅड टचची ओळख, आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२, रुग्णवाहिकेसाठी १०८, बालसहाय्य हेल्पलाइन १०९८ यांची माहिती देण्यात आली. तसेच सायबर फसवणुकीपासून बचाव, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, महिला सुरक्षा विषयक कायदे आणि नागरिक म्हणून असलेल्या जबाबदाऱ्यांबाबतही विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

कायद्याची भीती नव्हे, तर सुरक्षिततेची जाणीव मनात ठेवून प्रत्येकाने नियमांचे पालन केले पाहिजे. आजची जागरूक तरुणाईच उद्याचा सुरक्षित समाज घडवेल, असे प्रतिपादन वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी केले. या जनजागृती शिबिराला सुमारे ४०० एनसीसी विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. सुरक्षित वाहतूक, महिला सन्मान आणि सायबर जागरूकतेचा संदेश देणारे हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

### आजाराला कंटाळून वयोवृद्धाची आत्महत्या

**तळेगाव (श्या. पंत)-** शिरकुटनी गावात दीर्घकाळच्या आजाराला कंटाळून एका वयोवृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. सूर्यभान बाबूलाल उईके (वय ७५) असे मृताचे नाव आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्यावर विविध आजारांवर उपचार सुरू होते. प्रकृती सतत खालावत असल्याने ते मानसिक तणावात होते, अशी माहिती मिळाली. अखेर त्यांनी घरासमोरील मयालीला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन जीवन संपविले. कुटुंबीयांच्या निदर्शनास ही घटना आल्यानंतर एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# श्रीराम मंदिर देणगी निधीतील कथित गैरव्यवहाराच्या निषेध

## काँग्रेसचे आंदोलन;पोलिसांना निवेदन



**आर्वी/जनमाध्यम**
अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या देणगी निधी व दानपेटीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या निषेधार्थ आर्वी तालुका काँग्रेस कमिटी व आर्वी शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने विश्रामगृह येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत पोलीस प्रशासनामार्फत संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

आंदोलनानंतर पोलीस उपनिरीक्षक एन. एस. बाबर यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात श्रीराम मंदिराच्या देणगी निधीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी आर्वी शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. सुधाकर भुयार यांनी, 'रामभक्तांच्या श्रद्धेशी कुणालाही खेळण्याचा अधिकार नाही. या प्रकरणातील दोषींवर तातडीने कारवाई झाली नाही तर काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशारा दिला. या आंदोलनात तालुका काँग्रेस अध्यक्ष चंद्रशेखर वनस्कर, उपाध्यक्ष पंकज गोडबोले, कैलास अवथळे, प्रफुल मनवर, पंकज लांडगे, महेश बिरोले, बंडूभाऊ पाचोडे, यश शिरपुरे, डॉ. शेखर पालेकर, डॉ. नरेंद्र तांदूळकर, सचिन राऊत, राजेंद्र वासनिक, समीर शेख, शराफ शेख, जयवंत देवरकर, कालिदास कवाडे, ज्ञानेश्वर घागरे, राजपाल भगत, शादाब शेख, मुजुमिद शेख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ध्येय ठेवून महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात करा-मोहनबाबू अग्रवाल



**देवळी/जनमाध्यम**
ध्येय समोर ठेवून त्या नुसार नियोजन केले पाहिजे. नियोजन शुन्य व्यक्ती जीवनात यशस्वी होवू शकत नाही.म्हणूनच महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात ध्येय समोर ठेवून करा, असे प्रतिपादन स्थानिक एस एस एन जे कनिष्ठ महाविद्यालयाच्या नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागताकरीता आयोजित 'ब्रेक दि आइस' या कार्यक्रमात बोलताना महाविद्यालयाच्या 'एनसीसी भवनात' आपल्या मार्गदर्शनात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक व उद्योजक मोहनबाबू अग्रवाल तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ सुनिता सोनारे, क्रिडा विभाग प्रमुख प्रा धनराज मुंगल, प्रा. जगदीश यावले प्रा मेघा फासगे व कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख कॅप्टन प्रा मोहन गुजरकर उपस्थित होते.यावेळी वर्ग अकरावीत प्रवेश घेतलेले नवीन विद्यार्थी तसेच वर्ग बारावीत नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना नोटबुकांचा संच व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

आपल्या भाषणात डॉ सोनारे म्हणाल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आमचे ध्येय असून महाविद्यालयाच्या वतीने अभ्यासपुरक उपक्रम, सेमिनार व टेस्ट सिरीज वर भर देणार आहे तर प्रा. मुंगल यांनी खेळाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक भाषणात प्राध्यापक मोहन गुजरकर यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.), रोव्हर स्काऊट, रेंजर गाईड, इंग्रजी अभ्यास मंडळ, राष्ट्रीय हरित सेना व इतिहास अभ्यास मंडळ या उपक्रमाबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती मरघडे व जानवी झोड यांनी तर आभार प्रा. जगदीश यावले यांनी मानले. यशस्वी ते करिता सीनियर अंडर ऑफिसर कल्याणी लिखार सार्जंट वैष्णवी कन्नाके, सोमेश्वर पोराटे, प्रवेश किटे, साहिल गेडाम, राधिका नागोसे, तनिषा उईके व एनसीसी छात्र सैनिकांनी अथक परिश्रम घेतले.

# साटोडा परिसरात दूषित व गढूळ पाणीपुरवठा

## जीवन प्राधिकरणच्या डुलक्या, अतिसार, ताप, उलट्यांनी रहिवासी बेजार

**वर्धा/जनमाध्यम**
शहरालगतच्या साटोडा परिसरात गेल्या काही दिवसांपासून दूषित व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी जीवन प्राधिकरणची योजना हा एकमेव पर्याय असलेल्या या परिसरात शेकडो कुटुंबांना अस्वच्छ पाणी वापरण्याची वेळ आली असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर रहिवाशांना अतिसार, ताप, उलट्या आदी आजारांनी ग्रासले आहे. या बेफिकीरीविषयी नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, जीवन प्राधिकरणकडून पुरविण्यात येणारे पाणी इतके गढूळ आहे, की ते पातेल्यात किंवा पारदर्शक बाटलीत भरल्यानंतर त्यातील मळ स्पष्टपणे दिसून येतो. अशा पाण्याचा वापर पिण्यासाठी तसेच स्वयंपाकासाठी करणे धोकादायक ठरत असून, अनेक कुटुंबांना आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. परिसरात दूषित पाण्यामुळे आजारांची साथ पसरल्याचे चित्र असून, अनेक घरांमध्ये एकाचवेळी दोन ते तीन सदस्य आजारी पडल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना अतिसार, उलट्या व तापाचा त्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याने वैद्यकीय उपचारांसाठी धावपळ सुरू आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंदर्भात अनेकवेळा जीवन प्राधिकरणकडे तक्रारी करूनही त्याकडे साफ दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही प्रभावी दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. दूषित पाणीपुरवठ्यामागील नेमकी कारणे काय आहेत, याचा जीवन प्राधिकरणने तातडीने शोध घ्यावा, पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करून



आवश्यक दुरुस्ती करावी व त्वरित शुद्ध व सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या निष्काळजीपणाची पुनरावृत्ती होऊ नये, याकरिता संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल व अमरावती रियल सॅफायरचा संयुक्त पदग्रहण सोहळा आज

**अमरावती :** लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४-H1, रिजन-१, झोन-३ अंतर्गत लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल व अमरावती रियल सॅफायर यांच्या अनुक्रमे १८ व्या आणि २ऱ्या पदग्रहण (इन्स्टॉलेशन) सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हॉटेल औरुटस, राजापेठ चौक, बडनेरा रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे.

यावेळी लायन डॉ. दीपक क-हे हे लायन्स क्लब ऑफ अमरावती रियलचे अध्यक्ष म्हणून तसेच त्यांची कार्यकारिणी, तर लायन नेहा हरेश उदासी या अमरावती रियल सॅफायरच्या अध्यक्ष म्हणून त्यांच्या कार्यकारिणीसह पदभार स्वीकारणार आहेत.



या सोहळ्यास MJF निशिकांत प्रतापे (FVDG) हे प्रमुख पाहुणे व इन्स्टॉलेशन ऑफिसर म्हणून उपस्थित राहणार असून, MJF विजय पालीवाल (PDG) हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील. तसेच MJF ॲड. प्रशांत देशमुख (Region Chairperson) हे इंडक्शन ऑफिसर म्हणून उपस्थित राहतील.

या भव्य पदग्रहण सोहळ्यास लायन्स परिवारातील पदाधिकारी, सदस्य, मान्यवर नागरिक तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, सर्वांनी उपस्थित राहून नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे. एक बेड रूम, किचन स्वतंत्र डायनिंग, प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:** ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९

---

केस क्र.४३

४३/शि.कसबा/२५-२६
ने.ता. २५/०७/२०२६

मा.तहसिलदार साहेब, चांदूर बाजार
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**अर्जदार :-** १. मैनाबाई लक्ष्मणराव खाजोने (मयत)
२. संजय हिरामणजी भोंडे (मयत कौसल्या हिरामणजी भोंडे)
३. सुमित्रा हिरामणजी भोंडे (यांचे वारस अर्जदार क्र.२ व ३)
४. देविदास लक्ष्मणराव खाजोने
५. अंजना वामनराव पोटे
६. पार्वती श्रीकृष्णराव दारोकर
७. सुनंदा लक्ष्मणराव खाजोने
८. बेबी लक्ष्मणराव खाजोने
९. छबी लक्ष्मणराव खाजोने
अर्जदार क्र.१३ व ६ ते ८ रा.ब्राम्हणवाडा थडी
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**गैरअर्जदार :-** वर्न्देव लक्ष्मणराव खाजोने,
रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय :-** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ८५ (२) प्रमाणे अर्जदारांच्या शेतीमध्ये प्रत्येकाच्या हिस्याचे महसुल दप्तरी विभाजन होऊन मिळण्याचा आदेश मिळण्याकरिता अर्ज .....

महोदय,

१. आम्ही अर्जदार व गैरअर्जदार एकाच कुटुंबातील असुन आमचे हिंदु एकत्र कुटुंबातील सामाईक मालकीचे खालील नमुद वर्णनाचे शेत आहे.

मौजा- शिरजगांव कसबा ३, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे गट क्रमांक १९०३, क्षेत्रफळ २ हे.६४ आर, आकार रु. ५.२०, चर्तुसिमा :- पुर्वेस - भिमराव बोंडे यांचे शेत, पश्चिमेस- नाला, उत्तरेस- बाबु शनवारे यांचे शेत, दक्षिणेस- सुर्यभानजी व-हाडे यांचे शेत व शिवरस्ता, या शेताचे अर्जदार यांनी प्रत्येकाचे सामाईक क्षेत्र विभाजन करण्याकरिता प्रकरण दाखल केले आहे. यावर कुणाचा आक्षेप असल्यास तो मा.तहसिलदार साहेब, चांदूर बाजार यांचेकडे दि.२९/०७/२०२६ पर्यत नोंदवावा.

**तहसिल**
**चांदूर बाजार**

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१९५/२०२६ ने.ता. ११.०८.२०२६

**अर्जदार :** १. विमल लक्ष्मण कांबळे
२. शुभम लक्ष्मण कांबळे
रा.धानोरा फसी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **लक्ष्मण नामदेव कांबळे** यांचा मृत्यू दि.**१९.०५.२०२६** रोजी **धानोरा फसी**,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची आई नामे **वेणु नामदेव कांबळे** यांचा मृत्यू **दि.१६.१२.२०१४** मध्ये **धानोरा फसी**,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३४५/२०२६
**श्रीमती अनिता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Anita Ashokrao Junghare, Age 57 Yrs. Occu.: Household
2. Rohit Ashokrao Junghare, Age 33 Yrs. Occu.: Pvt.Job
3. Rishabh Ashokrao Junghare, Age 31 Yrs. Occu.: Pvt.Job
All R/o Mardi Road, Amravati University, Sant Gadge Baba Colony, Amt.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अशोक अजाबराव जुनघरे** हे दिनांक 06.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३९२/२०२६
**नियाज व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Niyaz Ullah Rahmat Ullah, Age 57 Yrs. Occu.: Retired
2. Awais Iqbal Shaikh Niyaz Ullah, Age 26 Yrs. Occu.: Pvt.Job
Both R/o.Near Taj Kirana Paradise Colon, Walgaon Road, Amravati.
3. Najmus Saba Wasique Ahmed Khan, Age 28 Yrs. Occu.: HOusehold
R/o Near Unique English School, Paradise Colony, VMV, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शकिला बानो नियाज उल्लाह** हे दिनांक 16.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नियाज व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नियाज व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज १३७०/२०२६
**अरुणराव + दोन-वि-निरंक**
पुढील ता.०१.०८.२०२६

अर्जदार :
1. **Arunrao Vasudevrao Kawane**,
Age about 62 Yrs. Occu.: Farmer
R/o. Nandura Bk, Tq. & Dist. Amravati
2. **Kokila Manohar Tekade,** Age about 79 Yrs. Occu.: Household
R/o. Wani, Satargaon, Amravati
3. **Hemalata Atul Vade**, Age about 49 Yrs. Occu.: Household
R/o. Mu. Fattepur, Post- Suruli, Warud, Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Wasudev Sitaram Kawane** हे दिनांक १६.०८.२०२२ रोजी **नांदुरा बु.अमरावती** येथे मयत झाले व **Kamal Wasudev Kawane** या दि. १४/१०/२०१९ रोजी नांदुरा बु.अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Arunrao Vasudevrao Kawane +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Arunrao Vasudevrao Kawane +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२१७/२०२६
**आशा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Asha Bhagwan Bawane, Age 68 Yrs. Occu.: Household
2. Sagar Bhagwan Bawane, Age 41 Yrs. Occu.: Labour
Both R/o. Plot No. 63, Near of Prasanna Jim,
Maratha Colony, Gopal Nagar, Amravati
3. Chandrakant Bhagwanrao Bawane , Age 41 Yrs. Occu.: Labour
R/o Nursing Apartment S.No. 36/1/2, P.No. 59,
F.No. 04 Geeta Nagar, Nanded
4. Sarika Bhagwanrao Bawane, Age 43 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.4, Amani Road Shastri Nagar,
Arni, Tq.Arni Dist.Wardha

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भगवान नागोजी बावणे** हे दिनांक 28.06.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३४४/२०२६
**सुनंदाबाई अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.१४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sunandabai Suryabhan Kalaskar, Age 66 Yrs. Occu.: Housewife
R/o Nanded Khurd, Tq. Dist. Amravati.
2. Harshalata Balu Bagade, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o Near Parwati Nagar, Behind Amber Enclave, Near Mahalaxmi Nagar, Sai Nagar, Amravati
3. Anand Suryabhanji Kalaskar, Age 51 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Near Hanuman Mandir, Amba Vihar, Amravati.
4. Moreshwar Suryabhanji Kalaskar, Age 47 Yrs. Occu.: Service
R/o Near Hanuman Mandir, Amba Vihar, Amravati.
5. Mohandas Suryabhan Kalaskar, Age 64 Yrs. Occu.: Service
R/o Amba Vihar Near Hanuman Mandir Ukali H.V.Nagar, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Suryabhanji Mahadevrao Kalaskar हे दिनांक 13.01.2012 रोजी **नांदेड खुर्द, ता.भातकुली, जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sunandabai Suryabhan Kalaskar+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sunandabai Suryabhan Kalaskar+4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८७०/२०२६
**कमलाबाई अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१७.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. कमलाबाई बाळुजी गाडे, वय ७५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. विलास दशरथ वरघट, वय ५९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.वार्ड नं.१, धानोरा कोकाटे, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत धनराज दशरथ वरघट** यांचे दिनांक **१७.०७.२०२२** रोजी **रा.धानोरा कोकाटे, ता.जि.अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार कमलाबाई बाळुजी गाडे अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमलाबाई बाळुजी गाडे अधिक एक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
**यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज क्र.११७१/२०२६
**अरविंद व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.०३.०८.२०२६

अर्जदार :
1. **Arvind Sitaramji Dewhare (Son),**
Age 62 Yrs. Occu.: Business
R/o. Yashoda Nagar Road, Near Moti Nagar,
Bhagwan Nagar, Amravati
2. **Narendra Sitaramji Dewhare (Son),**
Age 57 Yrs. Occu.: Business
R/o. Ghar No. 22/A, Pimpalgaon Road, Near Balaji Mangal Karyalaya, Govind Nagar, Yavatmal
3. **Lata Ganpat Satpaise (Married Daughter),**
Age 60 Yrs. Occu.: Household
R/o Plot no. 116. Bhawani Nagar, Punapur Road
Bhandewadi, Near Ganesh Nagar, Pardi, Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कमलाताई उर्फ कमलाताई सितारामजी देव्हरे** हे दि.२६.११.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार अरविंद व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार अरविंद व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३८८/२०२६
**कमलाबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Kamalabai Mahadevrao Mohod
Age 92 Yrs. Occu.: Nil
2. Smt. Suvarna Rameshrao Mohod
Age 67 Yrs. Occu.: Household
3. Ratnadip Rameshrao Mohod, Age 45 Yrs. , Occu.: Labour
4. Kuldeep Rameshrao Mohod, Age 43 Yrs., Occu.: Labour
5. Priyanka Rameshrao Mohod, Age 41 Yrs. , Occu.: Household

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश महादेवराव मोहोड** हे दिनांक **१३.०५.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमलाबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार कमलाबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

प्रो.क्र.६३१/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती**
**यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २३२/२०२६ ने.ता.१९.०८.२०२६

अर्जदार :
1. Prakash Shreeramji Vinchurkar, Age 61 Yrs. Occu.: Labour
R/o C/o Pratapsingh Bais, Hajrat Baba Dargah, Juni Shukrawari, Talipura, Mahal Nagpur
2. Satish Shreeram Vinchurkar, Age 58 Yrs. Occu.: Labour
R/o Rajratna Nagar, Cidco Nashik, Cidco Colony, Nashik
3. Maya Diliprao Asare, Age 53 Yrs. Occu.: Housewife
R/o Kurha, Tq. Tiosa, Dist. Amravati.
4. Vandana Ashokrao Thosar, Age 50 Yrs. Occu.: Housewife
R/o C/o Shravaji Bangare, Gajanan Mandir Jawal, 7 Diamond Nagar, Hanuman Nagar, Nagpur
5. Shantanu Sudhakar Vinchurkar, Age 29 Yrs. Occu.: Labour
R/o C/o Bahubali Tiles & Stanitary 8 AD Bhavan, Great Nag Road, Ganesh Nagar, Hanuman Nagar, Nagpur

-- विरुध्द --

गैरअर्जदारः निरंक

ज्यापेक्षा Shreeram Laxman Vinchurkar हे दि.**१०.०८.२००८** रोजी मयत झाले. अर्जदार Prakash Shreeramji Vinchurkar, Age 61 Yrs. Occu.: Labour R/o C/o Pratapsingh Bais, Hajrat Baba Dargah, Juni Shukrawari, Talipura, Mahal Nagpur व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**०८.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Shreeram Laxman Vinchurkar यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Shreeram Laxman Vinchurkar यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १०.०७.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११८६/२०२६
**निर्मला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Nirmala Dadarao Madane, Age 57 Yrs. Occu.: Housewife
R/o Bhoipura At Pardi, Tq. Dist. Amravati
2. Sunita Ramesh Babnekar, Age 76 Yrs. Occu.: Household
R/o.Kazipura At Post Kapustalani, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati.
3. Haridas Ramkrushna Mahore, Age 56 Yrs. Occu.: Labour
R/o Ward No.3, Surwadi Khurd, Tq. Tiosa, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **किसनराव उर्फ रामकृष्ण नारायण आणि शांताबाई किसनराव माहोरे** हे अनुक्रमे दिनांक 21.02.2003 व 27.10.2005 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज १०८६/२०२६
**ललितफुर रहमान व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.२८.०७.२०२६

अर्जदार :
1. **Latifurrahman Mohammad Abdullah**
Age about 76 Yrs. Occu.: Nil
R/o. Pinjari Mohalla Gurunanak Ward, Seoni, M.P.
2. **Saiyad Minhajul Hasan Saiyad Manzurul Hasan**
Age about 60 Yrs. Occu.: Nil
3. **Shaista Injaz Saiyad Manzurul Hasan**
Age about 63 Yrs. Occu.: Household
Applicant no. 2 & 3 R/o. Near Mata Diwala,
Vivekanand Ward, Seoni, Tq. & Dist. Seoni M.P.
4. **Farida Abdul Rafique,** Age about 64 Yrs. Occu.: Household
R/o. Ward No.12, Chacha Mohalla, Chandametta
Chikhali Kala, Dist.Chindwara (M.P.)
5. **Khajista Injaz Mohammad Ataur Rahman**
Age about 61 Yrs. Occu.: Household
R/o. Walgaon Road, Habib Nagar No.1, Amravati
6. **Mohammad Ahasanullah Moh. Salaullah**
Age about 47 Yrs. Occu.: Service
R/o. House No.73, Adarasha Nagar, Loniya Karbal,
Tq. & Dist. Chindawada
7. **Mohammad Noorullah Mohammad Nashaullah**
Age about 42 Yrs. Occu.: Business
8. **Mohammad Nasrulla Mohammad Nashaullah**
Age about 43 Yrs. Occu.: Household
Applicant No. 7 & 8 R/o. House No. 41, Ward No. 34
Neharu Marg, Jaistambh Burhanpur (M.P.)

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अजिझा बानो अझिमुद्रदीन** हे **दिनांक १७.०४.२०१६**रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **लतिफुररहमान व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **लतिफुररहमान व इतर विरुध्द** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज ११६२/२०२६
**अमोल व एक वि.निरंक**
पुढील ता.०१.०८.२०२६

अर्जदार :
1. **Amol Balkrushna Hole**
Age about 49 Yrs. Occu.: Labour
R/o. Saroj Colony, Amravati
2. **Ashish Balkrushna Hole**
Age about 37 Yrs. Occu.: Service
R/o. Arjun Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Shalini Balkrushna Hole** या दिनांक 06.09.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार **Amol Balkrushna Hole +1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Amol Balkrushna Hole +1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---

**महाराष्ट्र शासन**
**महसुल विभाग**
**तहसिलदार, नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालय**

**क्र./प्रस्तु-१/स.म.अ./कावि -५९४/२०२६** **दिनांक २१/०६/२०२६**

**जाहीरनामा**

**विषय :-** **मौजा सिध्दनाथपुर येथील शेत सन २६/१/अ क्षेत्र १ हे ७५ आर या शेताचा इतर अधिकारातील कुळाची नोद कमी करुन मिळणेबाबत.**

---------

प्रस्तुत प्रकरण अर्जदार श्री रविंद्र पांडुरंगजी आखरे रा. साखरा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांनी या कार्यालयात सादर केले असून त्यांनी मौजा सिध्दनाथपुर येथील शेत भुमापन क्रमांक २६/१/अ क्षेत्र १ हे ७५ आर आकार ११ रुपये २५ पै ही शेतजमीन अर्जदार यांचे वडिल मयत भिमराव सखाराम आखरे यांच्या नावाने होती. सदर शेतजमिनीच्या ७/१२ चुकीने अर्जदार यांचे आजोबा सखाराम रामजी आखरे यांच्या नावाची कुळाच्या कोष्टकामध्ये नोंद झालेली आहे. सदर शेतजमीन ही सुरुवातीपासून अर्जदार यांचे वडिल मयत भिमराव सखाराम आखरे यांच्या नावाने होती ते दिनांक ६/१/२०१२ रोजी मयत झाले, त्यानंतर सदर शेतजमीन ही वारसा हक्काने अर्जदार यांच्या ताब्यात, वहीतीत व मालकीत आहे. सदर शेतजमीनीवर चुकीने अर्जदार यांचे आजोबा सखाराम रामजी आखरे (कुणबी) यांच्या नावाची नोंद कुळ कोष्टकात केली आहे. तरी सदर जमीनीच्या ७/१२ वरील इतर अधिकारातील सखाराम रामजी कुणबी ही कुळाची नोंद कमी करुन मिळणेबाबत प्रकरण या न्यायालयात दाखल केली आहे.

करिता याव्दारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणेबाबत सादर करण्यात आलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने कोणतेही हितसंबंधित, आक्षेप/हरकती दाखल करावयाच्या असतील त्यांनी स्वतः किंवा विधी व्यावसायिक अभिकर्ता यांचे मार्फत १५ दिवसाचे आत या कार्यालयामध्ये हजर राहून दाखल करावे, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात येणार नाही याची नोद घेण्यात यावी.

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार,**
**नांदगाव खंडेश्वर**

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१९९/२०२६ ने.ता. ११.०८.२०२६

**अर्जदार :** १. जीजा समाधान चक्रे, रा.धानोरा फसी,
रा.जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. पद्माबाई नागोराव पवार, रा.झोडगा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
३. विमल लक्ष्मण कांबळे
४. रविंद्र समाधान चक्रे, नं.३ व ४ रा.धानोरा फसी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **समाधान शिवराम च**क्रे यांचा मृत्यू दि.**२९.०३.२०२६** रोजी धानोरा फसी,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी अर्जदार नं.२ व ३ ह्या मुली असून अर्जदार नं.४ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०८ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३२६/२०२६
**अन्नपुर्णा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Smt.Annapurna Devidas Borekar, Age 82 Yrs. Occu.: Household
2. Bhushan Devidas Borekar, Age 40 Yrs. Occu.: Business
3. Gaurav Devidas Borekar, Age 38 Yrs. Occu.: HOusehold
1 to 3 R/o Near Mrugendra Math, Amba Gate, Amravati.
4. Vaishali Sunilrao Papadkar, Age 37 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.4, Aashti Wardha.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देविदास विठ्ठलराव बोरेकर** हे दिनांक 08.10.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अन्नपुर्णा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अन्नपुर्णा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## संक्षिप्त



### लायन्स क्लब अचलपूरच्या अध्यक्षपदी डॉ. हर्षद मडघे

**अचलपूर**-लायन्स क्लब अचलपूरच्या ५५ व्या पदग्रहण समारंभात वर्ष २०२६-२७ साठी लॉ. डॉ. हर्षद मडघे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. स्थानिक हॉटेल ज्युबिली येथे झालेल्या या सोहळ्यात व्हाईस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर-एमजेएफ लॉ. निशिकांत प्रतापे यांच्या हस्ते पदग्रहण व नूतन कार्यकारिणीचा शपथविधी पार पडला.यावेळी सचिवपदी लॉ. नवीन दंडाळे,कोषाध्यक्षपदी एमजेएफ लॉ. पंकज गुप्ता यांनी पदभार स्वीकारला. तसेच सहा नवीन सदस्यांचा क्लबमध्ये प्रवेश करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. मडघे यांनी पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि युवा विकासासाठी अधिक सेवा उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. समारंभात गरजू युवतीला स्वावलंबनासाठी शिलाई मशीन भेट देण्यात आली. अमेरिकेतून खास उपस्थित राहिलेल्या क्लबचे चार्टर सदस्य लॉ. डॉ. प्रमोद सावदेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.संचालन लॉ. राजकुमार महल्ले यांनी तर आभार प्रदर्शन लॉ. नवीन दंडाळे यांनी केले.

### अमरावतीत विशेष लोकअदालत आज

**अमरावती**-न्यायप्रक्रियेत सामान्य नागरिकांचा सहभाग वाढवून 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या वतीने शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आयोजित या लोकअदालतीमध्ये परकाम्य संलेख अधिनियम, कलम १३८ (N.I.Act १३८ - चेक बाऊन्स प्रकरणे) अंतर्गत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तडजोडीने निपटारा केला जाणार आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांनी केले आहे.

# दोन कोटींच्या बोगस बांधकामावर संतापाचा स्फोट

## अधिकाऱ्यांच्या मौनामुळे संशय बळावला; चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**
तिवसा येथील कृषी कार्यालयाच्या सुमारे दोन कोटी रुपये खर्चाच्या कंपाउंड भिंतीच्या बांधकामातील कथित निकृष्ट दर्जा व अनियमिततेवरून आता संतापाची लाट उसळली आहे. विविध सामाजिक संघटनांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषी विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेत स्वतंत्र चौकशी, दोषींवर गुन्हे दाखल करणे आणि उर्वरित देयके तात्काळ रोखण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणी यापूर्वी माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे तसेच खासदार बलवंत वानखडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे,या प्रकरणाबाबत प्रतिक्रिया घेण्यासाठी पत्रकारांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिकाऱ्यांनी फोन न उचलणे आणि कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया न देणे यामुळे संशय अधिकच गडद होत असल्याची चर्चा सुरू आहे.



परिवर्तनवादी विचार युवा संघटनेसह विविध सामाजिक संघटनांनी आता या कथित बोगस बांधकामाविरोधात लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप करत संपूर्ण कामाची शासनमान्य प्रयोगशाळेमार्फत गुणवत्ता तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी असा आरोप केला की, कामात अनियमितता स्पष्ट दिसत असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून कारवाई होत नसल्याने ठेकेदाराला कोणाचे अभय आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

'दोन कोटींच्या कामात निकृष्ट दर्जाचे बांधकाम होत असल्याचा गंभीर संशय आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन कारवाई करत नाही आणि अधिकारी प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ करत आहेत. संपूर्ण कामाची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल.

**रोहित गवई,** परिवर्तनवादी विचार युवा संघटना

त्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## इतवारा परिसरातून तीन लाखांचे प्रतिबंधित प्लास्टिक जप्त

**अमरावती/का.प्र.**
महापालिकेमार्फत इतवारा बाजार परिसरात विशेष धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान तब्बल १ हजार ९२५ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले. या प्रतिबंधित प्लास्टिक साहित्याचे अंदाजे बाजारमूल्य सुमारे ३ लाख रुपये असून, दोन्ही आस्थापनाधारकांना एकूण १० हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. 'सुभाष प्लास्टिक' तसेच 'हारूण हाजी प्लास्टिक' या आस्थापनांवर अचानक छापे टाकण्यात आले. याशिवाय सुभाष प्लास्टिक यांच्या दोन स्वतंत्र गोदामांची सखोल तपासणी करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये प्लास्टिक ग्लास, चमचे, तसेच शासनाने प्रतिबंधित केलेल्या विविध प्रकारच्या डिस्पोजेबल वस्तूंचा समावेश होता.

सदर साहित्याचा वापर, साठवण व विक्री ही प्लास्टिक बंदी नियमांचे उल्लंघन असल्याने संबंधितांवर जप्ती व दंडात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई अतिरिक्त आयुक्त (२) शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक डिक्याव, अतिक्रमण विभाग प्रमुख कोल्हे, प्लास्टिक बंदी नोडल अधिकारी गोहर, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, इम्रान खान, दर्शन देशमुख, अनिकेत फुके, निखिल खंगाळे, मेघराज डेंडवाल यांच्या पथकाने केली. दरम्यान, शासनाने प्रतिबंधित केलेल्या प्लास्टिक वस्तूंचा वापर, साठा किंवा विक्री तात्काळ बंद करावी.

## श्वानाच्या हल्ल्यातील जखमी मुलीला सुपर हॉस्पिटलमध्ये हलविले

### आ. संजय खोडके, अविनाश मार्डीकर समवेत अधिकाऱ्यांची रुग्णालयात धाव

**अमरावती/वार्ताहर**
रुख्मिणी नगर स्थित साई हॉस्पिटल जवळ सनिधी सचिन कावरे नामक १० वर्षीय मुलीवर भटक्या श्वानाने हल्ला करून जखमी केल्याच्या घटनेने अमरावती शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर जखमी सनिधी वर एका खाजगी रुग्णालयात दाखल केल्यानंतर आता पुढील उपचारासाठी तिला सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यामध्ये रेफर करण्यात आले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता विधान परिषद आ.संजय खोडके,मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी सुपर हॉस्पिटल गाठून मुलीच्या प्रकृतीविषयी आस्थेने विचारपूस केली. जखमी मुलीवर उपचार करणाऱ्या डॉक्टर्स व सर्व टीम सोबत संवाद साधला.

यावेळी सुपर स्पेशालीटी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक-डॉ. अमोल नरोटे यांनी जखमी मुलीच्या मेडिकल अपडेट बाबत माहिती दिली. यावेळी आ.संजय खोडके यांनी जखमी मुलीची योग्य काळजी घेऊन अतिदक्षतेच्या सर्व आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत स्पष्ट सूचना केली. दरम्यान कुटुंबियांशी सुद्धा भेट घेऊन घटनाक्रम जाणून घेतला.शहरात भटक्या श्वानांचा सुळसुळाट वाढला असून त्यांच्या उपद्रवामुळे नागरिक हैराण झाले आहे. याबाबत मनपा प्रश्नासनाच्या वतीने तातडीने कार्यवाही करून भटक्या श्वानांना पकडण्यासाठी मोहीम राबविण्याची सूचना आमदार महोदयांच्या वतीने मनपा प्रशासनाला करण्यात आली. यावेळी मनपा स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव यांचेसह सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर्स व सहकारी उपस्थित होते.



## आज नागपूर येथे राजगडकर प्रतिष्ठानचा पुरस्कार वितरण सोहळा

### प्राचार्य डॉ.अशोक पळवेकर,डॉ.प्रल्हाद लुलेकर,प्रब्रह्मानंद मडावी ठरणार मानकरी



**नागपूर**- येथील लक्ष्मीबाई राजगडकर स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात साहित्य आणि सामाजिक चळवळ यांचे अनुबंध राखणाऱ्या महत्त्वाच्या आणि वाङ्मयीन दृष्टीने दर्जेदार ठरलेल्या साहित्यकृतींना वर्ष २०२५-२६ या वर्षापासून साहित्य पुरस्कार देण्याचे निश्चित करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानने जाहीर केलेल्या साहित्य पुरस्कारांचे वितरण माजी आमदार नेताजी राजगडकर यांच्या स्मृतिदिनी १८ जुलै रोजी 'अर्पण' सभागृह, मोर भवन, नागपूर येथे दुपारी २ वाजता सन्मानीय पाहुण्यांच्या हस्ते केले जाणार आहे. याप्रसंगी समारंभाचे अध्यक्ष प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ.श्रीनिवास खांदेवाले तर प्रमुख अतिथी म्हणून शेतकरी नेते विजय जावंधिया,दै. लोकमतचे संपादक श्रीमंत माने, बहुजन संघर्षचे संपादक नागेश चौधरी आणि ब्रह्मपुरी येथील नगर परिषदचे माजी उपाध्यक्ष अशोक रामटेके हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. समारंभात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी, समीक्षक व वक्ते प्राचार्य डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांच्या 'असहमतीचे रंग' या काव्यसंग्रहाला 'राजाभाऊ राजगडकर काव्य पुरस्कार' आणि प्रसिद्ध समीक्षक व विचारवंत प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा' या ग्रंथाला 'नेताजी राजगडकर वैचारिक ग्रंथ पुरस्कार' बहाल केला जाणार आहे. साहित्य प्रांतात या दोनही साहित्यकृती बहुचर्चित असून या साहित्यकृतींचे हिंदी भाषेतही अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. तर प्रब्रह्मानंद मडावी यांच्या 'गोंडवन : स्वरूप आणि वास्तव' या संशोधनपर ग्रंथाला 'लक्ष्मीबाई राजगडकर स्मृती प्रोत्साहनपर पुरस्कार' प्रदान केला जाणार आहे.

या तीनही पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, ग्रंथ सन्मानपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ असे राहणार आहे. प्रस्तुत समारंभाला रसिक-वाचक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लक्ष्मीबाई राजगडकर स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभू राजगडकर यांनी केले आहे.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात; ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे प्रदर्शन

**अमरावती/का.प्र.**
परतवाडा येथील भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय,स्व. बाबासाहेब सोमवंशी कनिष्ठ महाविद्यालय व .एच. एस. सी. व्होकेशनल, परतवाडा आणि पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोडी पत्रांचे विविध प्रकार'या विषयावरील ऐतिहासिक कागदपत्रांचे दोन दिवसीय प्रदर्शन महाविद्यालयात संपन्न झाले.



प्रदर्शनाचे उद्घाटक महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रा. भा. महाजन,अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते.गणेश कुमार खोडके पुरालेखागार, कोल्हापूर यांची उपस्थिती व्यासपीठावर होती.कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन,विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी गणेश कुमार खोडके, विक्रम ठमके, अल्केश ठाकरे यांचा सत्कार प्राचार्य तथा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला.गणेश कुमार खोडके यांनी महाराष्ट्र शासनाचा मोडी लिपी प्रशिक्षण मोडी लिपी प्रदर्शन या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाची रूपरेषा आपल्या प्रस्ताविकातून डॉ. स्वाती वानखडे यांनी स्पष्ट केली. व्यासपीठावरून महाजन यांनी मार्गदर्शन केले.गणेश कुमार खोडके यांनी आपल्या वक्तव्यातून मराठा इतिहासातील वेगवेगळी उदाहरणे देऊन मोडी कागदपत्राचे महत्त्व पटवून दिले.

प्रदर्शनामध्ये शिवकालीन, पेशवेकालीन व इतर ऐतिहासिक कालखंडातील विविध प्रकारची मोडी कागदपत्रे, सनदा, पत्रव्यवहार, आदेशपत्रे, वतननामा, महसुली नोंदी आणि इतर दुर्मीळ दस्तऐवज प्रदर्शित करण्यात आले. प्रदर्शनीला विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, इतिहास प्रेमी,शहरातील विविध महाविद्यालय आणि शाळांनी भेटी दिल्या .तसेच सर्वांनी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत ऐतिहासिक दस्तऐवजांची माहिती जाणून घेतली.प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.संचालन प्रा. ईशांत राणे आभार प्रदर्शन डॉ.बी. बी. चिखले यांनी केले.

आयोजन डॉ. एकनाथ तट्टे, डॉ. स्वाती वानखडे, डॉ. भैय्या चिखले, प्रा.प्रीती नवरे, दिनेश भागडकर, ऋषिकेश महल्ले, रुपेश डांगे, रितेश सूर्यवंशी, दर्शना दंडाळे, प्रियंका देवतळे यांनी केले, अशाप्रकारे मोडी पत्रांचे विविध प्रकार ही दोन दिवसीय प्रदर्शनी उत्कृष्टपणे पार पडली. अचलपूर, परतवाडा येथील सर्वच शाळा, महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात करिअर संसद शपथविधी सोहळा

**अमरावती/का.प्र**
अस्मिता शिक्षण मंडळ,अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथे जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्तविद्यमाने करिअर संसद शपथविधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मीनल भोंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून करिअर कट्टा अमरावती तालुका समन्वयक राजेश्वरी कान्होलकर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती व करिअर कट्टा नांदगाव तालुका समन्वयक भूमिका निंघोट,श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,अमरावती ह्या उपस्थित होत्या.



यावेळी महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथे करिअर कट्टा संसद स्थापन करून त्यांना शपथ देण्यात आली. यामध्ये करिअर कट्टा मुख्यमंत्री म्हणून आकाश गौड, रोजगार स्वयंरोजगार मंत्री म्हणून नेहा देशभ्रतार,उद्योजकता विकास मंत्री म्हणून किरण डोंगरे, सामान्य प्रशासन मंत्री म्हणून उर्वशी अंभोरे ,माहिती व प्रसारण मंत्री म्हणून दिपाली कोठेकर, कायदे व शिस्तपालन मंत्री म्हणून राधिका देशमुख, संसदीय कामकाज मंत्री म्हणून ऋषिकेश पाचडे,नियोजन मंत्री म्हणून कुणाल इंगळे, कौशल्य विकास मंत्री म्हणून मुस्कान पांडे, महिला व बालकल्याण मंत्री म्हणून दिपाली इंदुरकर तसेच सदस्य म्हणून अनिकेत सवई यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत आपापल्या पदाची शपथ घेतली. यावेळी महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक म्हणून प्रा.डॉ.सुशांत ठोके व प्रा. डॉ.विद्या अंभोरे यांनी सम्पूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल.मान्यवरांच्या हस्ते त्यांचे व करिअर संसदेतील सर्व मंत्र्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी बोलतांना या सोहळयाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मीनल भोंडे यांनी महाविद्यालयीन स्तरावरील करिअर संसदेतील सर्व मंत्रिमंडळाचे अभिनंदन करून रोजगार प्राप्त करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाद्वारा संचालित हा अत्यंत स्तुत्य असा उपक्रम असून महाविद्यालयामध्ये स्थापन झालेल्या या करिअर कट्ट्याच्या निमित्ताने करिअर संसदेतील या मंत्रिमंडळाने स्वतः रोजगार प्राप्त करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही रोजगार प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगितले.सोहळ्याच्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित अमरावती तालुका करिअर कट्टा समन्वयक राजेश्वरी कान्होलकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा या उपक्रमाविषयी सविस्तर अशी माहिती देऊन करिअर कट्टा अंतर्गत आयोजित विविध योजनांची विद्यार्थ्यांना माहिती दिली.संचालन व आभार करिअर कट्टा समन्वयक डॉ.सुशांत ठोके यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी करिअर कट्टाच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचा सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी बांधव उपस्थित होते.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल ३१ अधिकारी-अंमलदारांचा गौरव

## पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान

**अमरावती/का.प्र.**
गुन्हे प्रतिबंध, मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे, जलदगतीने तपास पूर्ण करणे, मुद्देमाल हस्तगत करणे आणि प्रभावी न्यायालयीन कामगिरी करणाऱ्या अमरावती ग्रामीण पोलीस दलातील ३१ अधिकारी व अंमलदारांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. सत्कार मंथन हॉल येथे आयोजित समारंभात पोलीस अधीक्षक निकेतन कदम (भा.पो.से.) यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेण्यात आली. चोरी व फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आणणे, आरोपींना अटक करून मुद्देमाल हस्तगत करणे, सात दिवसांच्या आत तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करणे तसेच न्यायालयीन खटल्यांमध्ये प्रभावी पैरवी करून दोषसिद्धी मिळविणे या कामगिरीसाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. पोलीस निरीक्षक सुरेश मस्के यांना परतवाडा पोलीस ठाण्यात कार्यरत असताना जून २०२६ मध्ये गुन्हे निर्गती, मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे आणि मुद्देमाल हस्तगत केल्याबद्दल गौरविण्यात आले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज तेलगोटे यांनी आसेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे निर्गती, वॉरंट तामिली आणि मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणून उल्लेखनीय कामगिरी केली. खोलापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने दोन गंभीर गुन्ह्यांचा तपास अवघ्या २४ तासांत पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

या कामगिरीबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुप वाकडे, महिला पोलीस उपनिरीक्षक सुनिता कांगटे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर गावंडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष अढाऊ आणि पोलीस कॉन्स्टेबल उमेश नागदिव यांचा गौरव करण्यात आला. मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र होटे (सेवानिवृत्त) आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल रोशन दुधे यांनी पोक्सो प्रकरणात प्रभावी न्यायालयीन पैरवी करून आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा मिळवून दिल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

वरूड पोलीस ठाण्याच्या पथकाने 'सोने काढून देतो' या बहाण्याने १२.५५ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांच्याकडून ९.२० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपीनाथ वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल अजय काळे आणि सागर शिवणकर यांना गौरविण्यात आले. आसेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने जनावर चोरीचे चार गुन्हे उघडकीस आणून ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज तेलगोटे यांच्यासह पोलीस हेड कॉन्स्टेबल पंकज गावंडे, इजहार साकीब, पोलीस कॉन्स्टेबल विजय गायकवाड, सरफराज शेख, संभाजी टिपरे, जयकुमार वाहाणे आणि चालक पोलीस कॉन्स्टेबल शोयब देशमुख यांचा सन्मान करण्यात आला.

पथ्रोट पोलीस ठाण्याच्या पथकाने बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीकडून देशी कट्टा, दोन मॅगझिन आणि तीन जिवंत काडतुसे जप्त केली. या कारवाईबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक अभय चौथनकर, पोलीस उपनिरीक्षक सिडाम, एएसआय प्यारेलाल जवंजाळ, पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष गिन्हकर, उमेश उघडे, योगेश बोदुले, पोलीस कॉन्स्टेबल विवेक ठाकरे, रुपेश शिंगणे आणि विजय आसोलकर यांचा गौरव करण्यात आला.

तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण औटे आणि महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल कांचन दहाटे यांनी जिल्ह्यात सर्वाधिक १५५ गुन्हे आणि १३१ दोषारोपपत्रांचे ई-साईन व अपलोड करून डिजिटल कामकाजात प्रथम क्रमांकाची कामगिरी नोंदविल्याबद्दल त्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिसांचा सन्मान ही केवळ प्रशंसा नसून संपूर्ण दलासाठी प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले.

नागरिकांचा विश्वास संपादन करत कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी यापुढेही अशीच निष्ठेने सेवा देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# सोयाबीनचे निकृष्ट बियाणे देणाऱ्या पाचही कंपन्यांवर गुन्हे नोंदवा

## पालकमंत्री बावनकुळे यांचे नियोजन बैठकीत निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या जिल्ह्यात वाढत्या तक्रारींवरून जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शुक्रवारी (दि.१७) मोठा संताप व्यक्त झाला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कृषी विभागाला कठोर शब्दांत ताकीद देत जिल्ह्यातील १४ तालुक्यात बियाणे पुरवणाऱ्या पाचही कंपन्यांविरुध्द प्रत्येकी एकाप्रमाणे एकूण ७० एफआयआर ते सुध्दा शुक्रवारी रात्रीपूर्वी दाखल करण्याचे निर्देश दिले. पोलिस अधीक्षकांनी ही कारवाई तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी लगेच दिल्या.



जिल्हा नियोजन समितीची शुक्रवारी बैठक घेण्यात आली. सोयाबीन बियाण्यात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा मुद्दा सर्वच लोकप्रतिनिधींनी लावून धरला. कृषी विभागाने 'बूस्टर' कंपनीविरुद्ध सर्वाधिक तक्रारी आल्याने तिच्यावर गुन्हा दाखल केल्याची माहिती दिली. मात्र इतर कंपन्यांविरुद्ध कारवाई का झाली नाही, असा सवाल करत पालकमंत्री बावनकुळे संतप्त झाले. शेतकऱ्यांचा संपूर्ण हंगाम उद्ध्वस्त झाला असून दोषी कंपन्यांवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कारवाई करावी, गरज पडल्यास ग्राहक मंच किंवा न्यायालयात सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने लढेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात आतापर्यंत ८८ टक्के म्हणजे ५ लाख ९१ हजार ९७८ हेक्टरवर पेरणी झाली असून सोयाबीन बियाण्यांबाबत १,६३९ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही कंपन्यांकडून ☞(पान २ वर)

# नांदगाव पेठमध्ये आढळले दोन दुर्मिळ पोवळा जातीचे साप

## जीवरक्षणम फाऊंडेशनने रेस्क्यू करून दिले जीवनदान

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ परिसरात दुर्मिळ पोवळा जातीचे दोन विषारी साप आढळून आल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, एकाच दिवशी या दुर्मिळ प्रजातीच्या दोन सापांचे सुरक्षितरीत्या रेस्क्यू करून त्यांना जीवनदान देण्यात आले. या मोहिमेमुळे जीवरक्षणम फाऊंडेशनच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जीवरक्षणम फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष संघटना पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोवळा ही सापांची प्रजाती दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालली असून, निसर्गातील बदल आणि मानवी हस्तक्षेपामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

फाऊंडेशनचे सदस्य मनोज हटवार यांनी एका पोवळा सापाचे रेस्क्यू करून त्याला सुरक्षित अधिवासात सोडले.

दरम्यान, त्याच रात्री नांदगाव पेठ येथील रोशन डोईफोडे यांच्या घराजवळ आणखी एक साप आढळून आला. त्यांनी तातडीने सर्पमित्र संघटना पाटील यांच्याशी संपर्क साधला. घटनास्थळी पोहोचलेल्या पथकाने त्या सापालाही सुरक्षितपणे पकडून जंगलात सोडले.





रेस्क्यूदरम्यान संघटना पाटील यांनी सांगितले की, पोवळा हा भारतातील सर्वात लहान विषारी सापांपैकी एक असून, तो कोरल स्नेक या दुर्मिळ प्रजातीमध्ये मोडतो. मराठीत या सापाला 'पोवळा' असे म्हणतात. या सापामध्ये नाग आणि मण्यारप्रमाणे न्यूरो-टॉक्सिक विष आढळते. त्यामुळे तो अत्यंत विषारी मानला जातो. या सापाची लांबी साधारणतः एक ते दीड फूट असते.

दिसायला अतिशय सडपातळ आणि करंगळीएवढ्या जाडीचा असलेला हा साप जमिनीखालील ओलसर माती, पानांचे ढिगारे तसेच विटा आणि दगडांच्या खाली वास्तव्य करतो. त्यामुळे तो सहसा लोकांच्या नजरेस पडत नाही. या सापाच्या पोटाखालचा भाग केशरी रंगाचा असतो, हे त्याचे वैशिष्ट्य आहे.

### नागरिकांनी घ्यावी काळजी

दुर्मिळ आणि विषारी असलेल्या पोवळा सापाला हाताळण्याचा प्रयत्न करू नये. असा साप आढळल्यास तात्काळ सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जीव रक्षणम फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.एकाच दिवशी दोन दुर्मिळ पोवळा जातीच्या सापांचे प्राण वाचवल्याने जीवरक्षणम फाऊंडेशनच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अमरावतीत वाहतूक पोलिसांची व्यापक जनजागृती मोहीम

## -हेल्मेट म्हणजे जीवाचे कवच -गुलाबपुष्प देत सुरक्षित प्रवासाचा संदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुचाकीस्वारांमध्ये हेल्मेट वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अमरावती शहर वाहतूक शाखेने शुक्रवारी (१७ जुलै) विशेष जनजागृती मोहीम राबविली. फ्रेजरपुरा वाहतूक विभागाच्या वतीने बियाणी चौक आणि चपराशीपुरा चौक येथे दुचाकी चालकांना थांबवून हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच प्रत्येक चालकाला गुलाबपुष्प देत सुरक्षित वाहतुकीचा संदेश देण्यात आला. या मोहिमेत वाहतूक पोलिसांनी 'हेल्मेट हा केवळ दंड टाळण्यासाठी नसून स्वतःच्या



आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेचे कवच आहे,' हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. नागरिकांनी प्रत्येक प्रवासात प्रमाणित हेल्मेटचा वापर करून रस्ते अपघातांमधील मृत्यू आणि गंभीर दुखापती टाळाव्यात, असे आवाहन करण्यात आले.

रस्ते अपघातांमधील मृत्यू कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट (ZFD)' उपक्रमांतर्गत ही मोहीम राबविण्यात येत आहे. सन २०३० पर्यंत रस्ते अपघातांतील मृत्यू ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले असून त्याअनुषंगाने जनजागृती, वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि सुरक्षित रस्ते व्यवस्था यावर भर दिला जात आहे.

दरम्यान, ☞(पान २ वर)

# दुचाकी चोराला अटक, ॲक्टिव्हा २४ तासांत हस्तगत

## बडनेरा पोलिसांच्या डीबी पथकाची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा परिसरातून चोरीला गेलेली होंडा ॲक्टिव्हा अवघ्या २४ तासांत शोधून काढत बडनेरा पोलिसांच्या डीबी पथकाने एका आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून सुमारे ५० हजार रुपये किमतीची चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहील लॉन, जुनी वस्ती, बडनेरा येथील रहिवासी व व्यापारी शाहीद माजीद मेमन (वय ५२) यांची एमएच-२७ बीबी-०५०५ क्रमांकाची निळ्या रंगाची होंडा ॲक्टिव्हा १४ जुलैच्या पहाटे साडेतीनच्या सुमारास त्यांच्या घरासमोरून अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. याप्रकरणी त्यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असताना बडनेरा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तांत्रिक माहिती व गोपनीय माहितीच्या आधारे संशयित अक्षय दिलीप बाहाळे (वय २८, रा. किरणापूर, होडकेश्वर, नागपूर) ☞(पान २ वर)

# चाकूच्या धाकावर महिलेची सोनसाखळी लुटणाऱ्या तिघांना अटक

## -गुन्हे शाखेची कारवाई, २.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगावपेठ परिसरातील किराणा दुकानदार महिलेला चाकूचा धाक दाखवून गळ्यातील सोनसाखळी जबरीने हिसकावून नेणाऱ्या तिघा आरोपींना अमरावती शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ ने कौशल्यपूर्ण तपास करून अटक केली असून गुन्ह्यातील १०० टक्के म्हणजेच २ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले आहे. या कारवाईमुळे धाडसी पद्धतीने करण्यात आलेल्या लुटीचा गुन्हा उघडकीस आला असून आरोपींना पुढील तपासासाठी नांदगावपेठ



पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन नगर येथील रहिवासी उषा लक्ष्मण वऱ्हाडे (वय ६०) यांच्या घरालगत किराणा दुकान आहे. ९ जुलै रोजी त्या दुकानात असताना दोन अज्ञात युवक ग्राहकाच्या वेशात आले. त्यांनी चॉकलेट आणि चिप्स मागितल्यानंतर त्यापैकी एकाने अचानक चाकूचा धाक दाखवून त्यांच्या ☞(पान २ वर)

# जिल्हा सहकारी बँक प्रतिनिधीपदी रामभाऊ बोकडे अविरोध

## ममदापूर सेवा सहकारी सोसायटीची बैठक संपन्न

**तिवसा/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून प्राथमिक मातादार याद्यासह तालुक्यातील सर्व सहकारी सोसायट्यांमधून



पुढील पाच वर्षांकरीता बँकेवर प्रतिनिधी पाठवण्याच्या निवडणूक प्रक्रियांना सद्या जिल्ह्याभरत वेग आला आहे.याच पार्श्वभूमीवर वणी येथे बुधवारी निवडणुक प्रक्रिया पार पडली असून ममदापूर सेवा सहकारी सोसायटी अंतर्गत जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांचे अत्यंत निकटवर्तीय विश्वासू रामभाऊ बोकडे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.निवडणूक प्रक्रिया गटसचिव वैशाली देवळे यांनी पार पाडली. प्रसंगी उपाध्यक्ष महेंद्र इंगोले, संचालक सुधीर☞(पान २ वर)

# भटके कुत्रे व रस्त्यावरील जनावरांविरोधात धडक मोहीम

## पाळीव प्राण्यांची नोंदणी करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव, रस्त्यांवरील मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिकेने मोठी कारवाई सुरू केली आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार संपूर्ण शहरात भटके कुत्रे व रस्त्यावरील जनावरे पकडण्यासाठी विशेष धडक मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेला सर्व विभागांत वेग देण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या विशेष पथकांकडून विविध प्रभागांमध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत कारवाई केली जात आहे. आज, दिनांक १७



जुलै २०२६ रोजी या मोहिमेदरम्यान एकूण २१ भटके श्वान पकडण्यात आले. रस्त्यांवर मोकाट फिरणारे कुत्रे, जनावरे तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या प्राण्यांना पकडून नियमानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठा, शाळा, रुग्णालय परिसर आणि वर्दळीच्या भागांमध्ये या मोहिमेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

महानगरपालिकेने पाळीव कुत्रे असलेल्या नागरिकांसाठीही महत्त्वाची सूचना जारी केली आहे. ज्या नागरिकांनी आपल्या पाळीव कुत्र्यांची महानगरपालिकेकडे अधिकृत नोंदणी केलेली नाही, अशा कुत्र्यांना पाळीव म्हणून मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे अशा प्राण्यांवरही नियमानुसार कारवाई होऊ शकते. नागरिकांनी कोणतीही ☞(पान २ वर)

# झाशी राणी चौक परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम

## पोलीस व नगर पालिकेची संयुक्त कारवाई



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील मुख्य राष्ट्रीय महामार्ग तसेच अंतर्गत प्रमुख मार्गावर गेल्या काही दिवसांपासून अतिक्रमणाने कळस गाठला होता. या वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन अपघातांचे प्रमाण वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी अचलपूर नगर परिषद व पोलीस प्रशासनाने संयुक्त कंबर कसली आहे. १७ जुलै रोजी सकाळीच प्रशासनाने 'ॲक्शन मोड'मध्ये येत झाशी राणी चौक परिसरात धडक अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. ☞(पान २ वर)

# मध्यप्रदेशातून परवान्याविना मोर्शीकडे रेतीची वाहतूक

## चार चालकांसह आठ जणांवर गुन्हा

### वरुड पोलिसांचा अवैध रेती माफियांना दणका; १.६९ कोटींचा मुद्देमाल जप्त

**वरुड/प्रतिनिधीः-** वरुड पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे शुक्रवारी (दि.१७) पहाटे अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ६९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मध्य प्रदेशातून परवान्याविना रेती भरून मोर्शीकडे जाणारे चार डंपर जायंट चौक येथे नाकाबंदीदरम्यान पकडण्यात आले. या प्रकरणी चार डंपर चालकांना अटक करण्यात आली असून चार वाहनमालकांसह एकूण आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरुड चे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांना पहाटे ५.३० वाजता गुप्त माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पोलीस हवालदार संतोष वंजारी, मनोज वानखडे आणि पोलीस कॉन्स्टेबल राहुल केंडे यांच्यासह जायंट चौक येथे नाकाबंदी केली. सकाळी सुमारे ७.१५



वाजता पांढुर्णा रोडवरून येणारे चार निळ्या रंगाचे डंपर थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे आढळले. डंपर चालकांकडे रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना किंवा रॉयल्टीची कागदपत्रे नव्हती. चौकशीत मध्य प्रदेशातून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून ती मोर्शीकडे नेत असल्याची माहिती समोर आली. या कारवाईत☞(पान २ वर)

# चायना चाकूसह आरोपी अटक

## -देशपांडे प्लॉटमध्ये चाकूसह धुमाकूळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशपांडे प्लॉट परिसरात हातात प्राणघातक चायना चाकू घेऊन धुमाकूळ घालत नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका आरोपीला राजापेठ पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतले. आरोपीकडून सुमारे १,५०० रुपये किमतीचा चायना चाकू जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्टसह महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना देशपांडे



प्लॉट परिसरात एक इसम हातात चायना चाकू घेऊन नागरिकांना धमकावत धुमाकूळ घालत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ राजापेठ डी.बी. पथकाला आरोपीला पकडण्याचे आदेश दिले.

त्यानुसार डी.बी. पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे व त्यांच्या पथकाने शुक्रवारी (१७ जुलै) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास देशपांडे प्लॉट परिसरात धाव घेतली. तेथे हातात प्राणघातक शस्त्र घेऊन धुमाकूळ घालणारा मनोज हरीहरप्रसाद पाठक (वय ४७, रा. देशपांडे प्लॉट, अमरावती) याला पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आले. झडतीदरम्यान आरोपीकडून एक चायना चाकू जप्त करण्यात आला. या चाकूची एकूण लांबी ११.३ इंच, पात्याची लांबी ६.४ इंच, मुठीची लांबी ४.७ इंच आणि पात्याची रुंदी १.३ इंच असून त्याची अंदाजे किंमत १,५०० रुपये आहे. पोलीस ☞(पान २ वर)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त 'नमो देवा आरोग्य सेवा' अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया अभियान

## आमदार प्रविण पोटे यांची रुग्णांना नवसंजीवनी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णसेवक आमदार प्रवीण पोटे पाटील व खासदार तसेच आमदार यांच्या पुढाकारातून जिल्ह्यातील गरजू नागरिकांसाठी 'नमो देवा आरोग्य सेवा' अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया



अभियान आयोजित करण्यात आले आहे. आज अनेक नागरिक गंभीर आजारांशी झुंज देत असून आर्थिक अडचणींमुळे महागड्या उपचारांपासून वंचित राहतात. अशा गरजू रुग्णांना दर्जेदार व अत्याधुनिक आरोग्यसेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या सेवा आठवड्यातील अभियानाअंतर्गत प्रत्येक शस्त्रक्रिया ही साधारणपणे ४ लाख ते २२ लाख रुपये खर्च अपेक्षित असलेल्या नऊ प्रकारच्या महत्त्वाच्या शस्त्रक्रिया आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या विशेष☞(पान २ वर)

# बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## हेक्टरी १ लाखांच्या मदतीची पालकमंत्र्यांकडे मागणी

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** खरीप हंगामात बोगस आणि निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आज शुक्रवार १७ जुलै रोजी महसूल मंत्री आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देऊन बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई



देण्याची मागणी केली आहे. पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे ☞(पान २ वर)

# अमरावती जिल्ह्यातील ७.५० मीटर रस्त्यावरील ले-आऊटधारकांसाठी दस्त नोंदणीची प्रक्रिया पूर्ववत सुरु

## आ.सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्याला यश

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती जिल्ह्यातील सन २०२० नंतर मंजूर ७.५० मीटर रस्त्यावरील ले-आऊटधारकांसाठी खरेदी-विक्री व दस्त नोंदणी प्रक्रिया केवळ ईडब्लूएस राखीव आरक्षणाच्या नावाखाली बंद करण्यात आल्याने भूखंडधारकांमध्ये रोष व्यक्त होत आहे. सदरची दस्त नोंदणीची प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच विनाविलंब पूर्ववत सुरु करण्यासंदर्भात अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी



नुकत्याच झालेल्या राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. याबाबत शासनाने तात्काळ दखल घेत कार्यवाही केल्याने आता सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी ७.५० मीटर रस्त्यावरील ले-आऊटधारकांसाठी खरेदी-विक्री व दस्त नोंदणी प्रक्रिया पुर्ववत सुरु केली असल्याने शेकडो भूखंडधारकांना दिलासा ☞(पान २ वर)